# साम्राज्य व स्वराज्य

लेखक :
श्री. दामोदर नरहर शिखरे एम्. ए.,
उपसंपादक-केसरी, पुणें

किंमत १ रुपया

प्रकाशक—
शंकर वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथभांडार,
कोल्हापूर.

(पुनरावृत्ति, भाषांतर, वगैरे हक्क लेखकाकडे)

मुद्रक—
बा. ना. ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

सातारा

ज्यांच्या निरपेक्ष साहाय्यावाचून माझें शिक्षण
पूर्ण झालें नसतें

– ते करारी व परोपकारी –

गु. श्री. विश्वनाथ केशव खाखनीस

यांस

❀ कृतज्ञभावानें अर्पण ❀

—दा. न. शिखरे

# प्रस्तावना

सर्व जगाला ग्रासून टाकणारें महायुद्ध येत्या उन्हाळ्यांत सुरू होणार असें भाकित हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील राजकारणी पुरुष जाहीर करीत आहेत. त्यांच्या अंदाजाप्रमाणें महायुद्ध उन्हाळ्यांत होवो वा त्यानंतर होवो, पण एक गोष्ट निश्चित आहे आणि ती ही कीं, अॅबीसिनिया, चीन, स्पेन व झेकोस्लाव्हाकिया यांच्यावरील अन्याय्य आक्रमणांतून महायुद्ध उद्भवावयाचें असतांनाहि तें जसें टाळण्यांत आलें, तसें यापुढें तें टाळणें केवळ अशक्य आहे. जर्मनी, इटाली व जपान यांचें चढाईचें धोरण स्वदेशांतील वाढत्या लोकसंख्येमुळें, बेकारीमुळें व यादवीमुळें अधिकाधिक उग्रच बनत आहे आणि त्याचें पर्यवसान जागतिक युद्ध हेंच आहे.

या महायुद्धाच्या प्रसंगीं ब्रिटिश साम्राज्याची स्थिति गेल्या महायुद्धा इतकीहि सुदृढ नाहीं. इंग्लंडची आर्थिक स्थिति, त्याचा व्यापार, त्याचें लष्करी बळ, त्याचें वसाहतींवरील प्रभुत्व, इत्यादि बाबतींत इंग्लंडची क्षीणता वाढत्या प्रमाणावरच आहे आणि महायुद्धांतून शीरसलामत बाहेर पडण्यासाठीं त्याला अंकित राष्ट्रांशीं–विशेषतः हिंदुस्थानाशीं–पुष्कळच मिळतें, किंबहुना नमतें घ्यावें लागणार आहे.

महायुद्धाची पूर्ण संभवनीयता व ब्रिटिश साम्राज्याचें दौर्बल्य, ही संधि हिंदी स्वातंत्र्याचे दृष्टीनें अत्यंत महत्वाची आहे. गेल्या महायुद्धाच्या संधीचा फायदा घेण्याचें धोरण हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनीं आंखलें नाहीं, व लो. टिळकासारख्यांनीं कांहीं प्रयत्न आरंभिले असतां सरकारानें ते मोडून काढले. आतां म. गांधींच्या वीस वर्षांच्या आंदोलनांनीं हिंदी राजकारण अधिक जागृत व संघटित झालें आहे आणि पं. जवाहरलालांच्या कार्यामुळें त्याला आंतरराष्ट्रीय दृष्टिहि प्राप्त झालेली आहे. अशा स्थितींत महायुद्धाच्या सुवर्णसंधीचा फायदा घेण्यासाठीं हिंदुस्थानानें इंग्लंडशीं कोणतें

धोरण ठेवावें याचा थोडाफार विचार प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. या विषयाचें सर्वसामान्य ज्ञान मराठी वाचकवर्गाला पुरविणें हीच या पुस्तकाची मुख्य भूमिका होय.

यापूर्वी १९३२ सालीं "ब्रिटिश साम्राज्याचा उदयास्त" या नांवाची लेखमाला मी 'केसरींत' लिहिली होती. तिच्यापेक्षां अधिक व्यापक पण मुख्यतः माहितीपर असें हें पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे. याहून अधिक मोठ्या प्रमाणावर तात्त्विक व विवेचक स्वरूपाचा ग्रंथ निर्माण व्हावा इतका हा विषय महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा आहे.

हें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल मी श्री. कुलकर्णी यांचा आभारी आहें. 'श्रीसिद्धेश्वर प्रेस'नें त्वरेनें व व्यवस्थितपणें मुद्रणकार्य केल्याबद्दल त्यांचें कौतुक करावेसें वाटतें. इतक्या जलदीनें व सफाईनें छपाईचें काम कोल्हापुरास होत असेल अशी मला कल्पना नव्हती! प्रो० ओतुरकरांसारख्या हितचिंतकांनीं केलेल्या साहाय्याबद्दल मी ऋणी आहें.

'सुवास'—देशमुखवाडी
ता० १ मार्च १९३९.

दा० न० शिखरे.

# अनुक्रमणिका

पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| १ | साम्राज्याची मुख-परीक्षा | १ |
| २ | साम्राज्य घटकांची स्वातंत्र्य-स्थापना | १६ |
| ३ | हिंदुस्थानावरील स्वामित्व | ३४ |
| ४ | ब्रिटिशांच्या स्वामित्वास ओहोटी | ४० |
| ५ | महायुद्धाची सिद्धता | ४५ |
| ६ | इंग्लंडची वाढती क्षीणता | ५५ |
| | वेस्ट मिन्स्टर कायदा ( परिशिष्ट ) | ६७ |
| ७ | समाजवादाचा शह | ७२ |
| ८ | हिंदुस्थानचा युद्धकालीन कार्यक्रम | ७९ |
| | विचार-सूत्रें | ९७ |

# आमचें प्रकाशन

१ आजचें स्वराज्य-ले. वा. वा. जोशी, B. A. B. T. ०-६-०
(१९३५च्या कायद्याची समग्र माहिती असलेलें व सामान्य माणसांना विशेषत: कॉंग्रेस कार्यकर्त्यांना अत्यंत उपयुक्त)

२ काम आणि कामिनी—ले. कु० प्रेमा कंटक. २-८-०
(गांधी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारी एकमेव कादंबरी.)

३ जीवन-प्रकाशन-मोठ्यांच्या छोट्या गोष्टी. ले.साने गुरुजी. ०-२-०

४ सीतास्वयंवर—ले. प्रो० द. सी. पंगू, M. A.

५ पूजन (कथासंग्रह)—ले. वि. स. खांडेकर १-८-०

६ करवीराच्या कळ्या (कथासंग्रह) १-४-०

७ मावळता चंद्र (सामाजिक कादंबरी) ले. बा. भ. बोरकर १-४-०

८ पुष्पपराग (लघुकथा संग्रह)—ले. कु० कुमुदिनी प्रभावळकर B. A. १-४-०

९ चौपाटीवर (कथा व प्रबंध)—ले. डॉ. श्री. वाळिंबे १-४-०

१० बेसूर संगीत (सामाजिक कादंबरी)—ले. कु. कुमुदिनी शंकर प्रभावळकर.

११ भडकत्या ज्वाला अर्थात् अगामी महायुद्ध
ले. श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस, एम्. ए. एल्‌एल्. बी. १-८-०

१२ सम्राज्य व स्वराज्य—ले. दा. न. शिखरे, एम्. ए. १-०-०

**—महाराष्ट्र ग्रंथ भांडार,**
**महाद्वार रोड, कोल्हापूर.**

# १

# साम्राज्याची मुख–परीक्षा

" Every treaty is torn to ribbons. The League of Nations is wrecked. The idea of disarmament has gone like a dream in the night, and the world is one vast arsenal preparing for a catastrophe beyound all human reckoning. "

*A. G. Gardiner.*

"सध्यां जगाच्या राजकारणाला रानटीपणाची कळा आलेली आहे व ती सुसंस्कृत जगाला भय उत्पन्न करीत आहे. या स्थितीचें कारण म्हणजे गेलीं शंभर वर्षें आपल्या नीतीचा भयंकर ऱ्हास होत आहे. " हें सद्यः-स्थितीचें निदान एकाद्या मैदानी सभेंतील भावनाशील वक्त्यानें केलेलें विधान नव्हे. आपल्या सापेक्षतेच्या सिद्धांतामुळें सर्व जगभर न्यूटनच्या बरोबरीचा मान मिळविणारे प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. आइन्स्टिन यांनीं एका कॉलेजांतील विद्यार्थ्यांना, आपण लिहून आणलेल्या निबंधांतून, अगदीं हलक्या आवाजांत, हवेंत हातवारे न करतां, निश्चलपणें व निर्विकारतेनें वरील निर्णयात्मक सिद्धांत निवेदन केला. जगाला रानटीपणाच्या मगर-मिठींतून मुक्त करण्यासाठीं बंधुता, समता व स्वतंत्रता यावर आधारलेली फ्रेंच राज्यक्रांति झाली, जगड्व्याळ महायुद्ध होऊन गेलें, राष्ट्रसंघाची अभिनव कल्पना मूर्त स्वरूप पावली, आणि शस्त्रनियंत्रण–परिषद्, शांतता-परिषद, त्रिराष्ट्र-करार, नवराष्ट्र-करार इत्यादि उपायामागून उपाय योजिले जात आहेत; तरी दूर राहून व सूक्ष्म विचार करून डॉ. आइन्स्टिन-

सारखा शास्त्रज्ञ निकाल असाच देतो कीं, जग रानटीपणाकडे झुकत आहे आणि जगाची संस्कृति लयाला जात आहे.

अठराव्या शतकांत अमेरिकेनें स्वातंत्र्याचा जो जाहीरनामा काढला त्याचा बीजमंत्र

**" सर्व मानवांना समान हक्क आहेत. "***

हा होता. पण मानवाच्या मूलभूत हक्कांना बलाढ्य साम्राज्यशाहींनीं पायाखालीं तुडविलें आणि अंकित प्रजेचें सर्व बाजूंनीं शोषण चालविलें. हें कार्य चालू असतां परस्पर–कलह निर्माण होऊन युद्धामागून युद्धें होऊं लागलीं. त्यामुळें ओढवणारे अनर्थ लक्ष्यांत घेऊन युद्धांचा संहार करण्यासाठीं १९१४ सालीं ' शेवटचें युद्ध ' म्हणून महायुद्ध पुकारण्यांत आलें. त्यांत हानि किती भयंकर झाली ? सारें जग चार वर्षें तापल्या तेलाच्या कढईत टाकल्यासारखें झालें. एक कोटीवर सैनिक कामास आले आणि दोन कोटी जखमी झाले. शिवाय अडीच कोटीवर नागरिक प्राणास मुकले आणि एक कोटी लोकाना देशांतर करावें लागलें. पन्नास लाख " बांगडी फुटली " आणि नव्वद लाख पोरकीं पोरें जन्मास आलीं.

## जागतिक युद्धांतील प्राणहानि

( आंकडे हजारांचे )

| खंड | लष्करी | नागरिक | एकूण |
|---|---|---|---|
| युरोप | १२६३७ | १२२१९ | २४८५६ |
| अमेरिका | १७४ | १५०० | १६७४ |
| आशिया | ६९ | १३७०० | १३७६९ |
| आफ्रिका | ९९ | ९०० | ९९९ |
| इतर | ७६ | ६० | १३६ |
| एकूण | १३०५५ | २८३७९ | ४१४३४ |

या चार कोटीवर ठार झालेल्या माणसांत सैनिकापेक्षां नागरिकांची संख्या दुप्पट आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या रणयज्ञांत मानवी

* Men are created equal.

प्राणांची ही जशी आहुति पडली, तशाच द्रव्यधाराहि सारख्या ओतल्या जात होत्या. दोन्ही पक्षांनीं मिळून ८००० कोटी पौंड या बकासुराला चारले. ही द्रव्य–हानि किती प्रचंड आहे याचें स्पष्ट चित्र उभें करणारें वर्णन एका हिशेबी लेखकानें केलें आहे. त्याच्या मतें, एवढ्या पैशांत अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम्, जर्मनी व रशिया या आठ राष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबास पांचशें पौंड किंमतीचें घर, दोनशें पौंड किंमतीचें लांकडी सामान आणि शंभर पौंड किंमतीचें शेत हीं संसार–सुखाचीं साधनें पुरवितां आलीं असतीं! पण या सुखाची होळी करून महायुद्धानें कर्जाचे डोंगर मात्र त्या राष्ट्रांच्या माथीं मारलें. सोळा राष्ट्रांनीं अमेरिकेचे ९९० कोटि डॉलर कर्ज म्हणून घेतलें. त्यांतील शें. ९६ कर्ज इंग्लंड, फ्रान्स, इटाली व बेल्जम यांनींच उचललें असून शें. ७५ भाग इंग्लंड व फ्रान्स, या दोघांनींच घेतला आहे! जर्मनी-सारख्या पराभूत राष्ट्राला व्हर्साइलच्या तहानें करकचून बांधण्यांत आलें आणि जमिनीवरून त्यानें पुनः उठूं नये म्हणून ८० वर्षेंपर्यंत फेडावयाच्या कर्जहप्त्यांचा धोंडा त्याचे उरावर ठेवण्यांत आला. दोस्त राष्ट्रांनीं सुटकेचा निःश्वास टाकला आणि सरळ स्वभावाचे, प्रेसिडेंट वुइल्सन यांनीं जगांत लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं कंबर कसली.*

या जगड्व्याळ खटाटोपाची फलश्रुति गेल्या वीस वर्षांत काय दिसून आली? लोकशाहीचा प्रसार तर राहोच, पण संकोच मात्र झाला. रशि-यांत स्टॅलिनची, इटालींत मुसोलिनीची व जमनींत हिटलरची सर्वाधि-कारशाही नंगा नाच घालूं लागली व इतर राष्ट्रांना भिववूं लागली. " शेवटच्या युद्धाचा " शेवट झाल्यापासून आतांपर्यंत जगांत लहानमोठीं एकवीस युद्धें झालीं. इटालीनें अॅबीसिनिया व जपाननें मांच्युको घशाखालीं घातला तो केवळ लांडगा मेंढराला खातो त्याच न्यायानें. याच लांडगे-शाहीच्या धमकीनें जर्मनीनें ऑस्ट्रिया व सुडेटन हे देश काबीज केले; आणि आपल्या वसाहती परत मिळविण्यासाठीं पुनः मोठें रणकुंड पेटवि-ण्याचा हव्यास त्याला सुटला आहे. जपान, इटाली व जर्मनी यांच्या

* "World must be made safe for democracy."

या लांडगेशाहीचा निषेध सारीं राष्ट्रें व त्यांचें प्रतिनिधित्व घेतलेला राष्ट्र-संघ यांनीं जळजळीतपणें केला; पण निषेधच तेवढा त्यांनीं केला, सक्रिय प्रतिकार मात्र शून्य. असंतोष व अशांतता यांनीं सारें जग गेल्या वीस वर्षांत उभें-आडवें चिरीत आणलें आहे. इंग्लंडचे माजी प्रधान मि. लॉईड जॉर्ज यांनीं इंग्लंडच्या एकसारख्या होत जाणाऱ्या अधोगतीचें स्पष्ट स्वरुप जगापुढें मांडलें आहे. जगांतील हे अत्याचार उघड्या डोळ्यांनीं इंग्लंड पहात बसेल तर शेवटीं स्थिति अशी निर्माण होईल कीं, "जगांत शांतता तर नाहींच नाहीं, पण प्रचंड युद्ध पेटलेलें आहे आणि त्यावेळीं इंग्लंडचा पाठीराखा मात्र कोणी नाहीं."*

इटाली, जर्मनी किंवा जपान हे जगांतील शांततेचे जितके शत्रु असतील त्यापेक्षां भयंकर शत्रु कोणी असेल तर तें ब्रिटिश साम्राज्य. इटालीला ॲबीसीनियांत किंवा जपानला चीनमध्यें घुसण्याचा जितका हक्क, ते देश बळकावण्यासाठीं त्यांनीं आचरिलेले मार्ग जितके सरळ आणि त्यांचा भोगवटा त्यांनीं आपलेकडे घेणें जितकें न्यायाचें ; तितक्याच हक्काच्या, सरळपणाच्या व न्यायाच्या तत्त्वावर ब्रिटिश साम्राज्याची उभारणी झालेली आहे.§ मागासलेले देश सुधारण्याचा बोजा 'गोऱ्या खांद्यावर' पडलेला आहे आणि परतंत्र देशाचे आम्हीं "विश्वस्त" आहों ही बतावणी आतां कोणीहि ऐकून घेत नाहीं. इंग्रजांचें आगमन ही 'ईश्वरी योजना' (Divine Dispensation') होय असें मानण्याचा काळ हिंदुस्थानांतून केव्हांच निघून गेला. जगाच्या कल्याणाचें ध्येय ब्रिटिशांच्या ओंठावर खेळत असलें, तरी अंतःकरणांत कधींच नव्हतें अशी ग्वाही इंग्रज लेख-

---

* We have descended during these years the ladder of dishonour rung by rung—can we go any lower? In the end there would be no peace. There wonld be war and war without friends.

§ Mussolini has in Abyssinia and Spain been reconstructs ing before our eyes the type of crime by which most our own empire was acquired. —*Leonard Barnes.*

कहि देत आहेत.§ कार्ल मार्क्स तर म्हणतो—

England in causing a social revolution in Hindustan was actuated only by the vilest interests and was stupid in her manner of enforcing them

फार काय, सिंधप्रांत जिंकून घेणारा इंग्रजांचाच सेनापति सर चार्लस् नेपियर हा अमीराचा पराभव बदमाषगिरीनें केल्यावर अशी स्वच्छ कबुलीच देतो कीं—

We have no right to seize Sind, yet we shall do so, and a very advantageous, useful, human piece of rascality it will be.

व्यापाराची हाव हा ब्रिटिश साम्राज्याचा हेतु आणि मिशनऱ्याच्या बायबलापासून सोजिराच्या बंदुकीपर्यंत सर्व सूक्तासूक्त साधनें वापरणें हा त्याच्या पूर्ततेचा मार्ग. असे "दिव्य जन्मकर्म" असलेलें ब्रिटिश साम्राज्य, परराष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या नरडीवर पाय देऊन उभें असतांना जगांत शांतता नांदेल असें स्वप्नहि कोणा विचारी माणसास कसें पडेल? भूतकाळांतीलच नव्हे तर भविष्यकाळांतीलहि जगाच्या नाडीचे ठोके मोजणारे मि. एच्. जी. वेल्स यांनीं आपला भ्रमनिरास झाल्याची स्वच्छ कबुली दिली आहे.* "स्वातंत्र्यसंपन्न राष्ट्रांचें आदर्श संघटन" असें ब्रिटिश साम्राज्याचें स्वरूप राहील अशी आपली आशा भग्न झाल्याचें त्यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे. आयर्लंडचें स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या शृंखलेंतील दुवे निखळण्याचा प्रारंभ होय असें मत त्यांनीं दिलें आहे. जोंवर ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानाला पारतंत्र्याच्या स्थूल वा सूक्ष्म पाशांनीं बांधून ठेवीत आहे; तोंवर जगावर शांततेचें छत्र उभारलें जाणें शक्यच नाहीं. § चाळीस कोटी लोकांच्या स्वातंत्र्याचें प्रेत

---

§ The British Empire has never held before itself any conception of a universal good. —*Leonard Barnes.*

* Outline of History (Page 580.)

§ "Peace will come to Europe from Asia when Asia becomes free, not before......Without India, there is no real Asia." —*Dr. Sunderland.*

मध्यभागीं कुजत–सडत पडलेलें असतांना शांततेच्या मेजवानींत कोण, कसा भाग घेऊं शकेल? ब्रिटिश साम्राज्याचाच नव्हे तर जागतिक राज्यशासनाचाहि हिंदुस्थान हा मेरु-मणि आहे. याला वगळून जगाच्या कारभाराची घडी बसविणें अशक्यच आहे. हिंदुस्तानचें हें महत्त्व ओळखूनच रशियाच्या प्रतिनिधीनें १९१८ सालीं प्रे. वुइल्सन यांचें राष्ट्रसंघाच्या स्थापनेसाठीं निमंत्रण आलें असतांना असा रोकडा सवाल टाकिला कीं, "पोलंड, सर्विया, बेल्जम् यांना स्वातंत्र्य द्यावें असें तुम्ही म्हणतां, पण हिंदुस्थानच्या मुक्ततेसंबंधीं कांहींच बोलत नाहीं, हें कसें?"

ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानचें महत्त्व ओळखलें जातें तें केवळ 'मंडपशोभे' पुरतें. त्यानें महायुद्धाचे वेळीं मनुष्यबळ व द्रव्यबळ यांचें जें बहुमोल साहाय्य ब्रिटिश साम्राज्यास पुरविलें, त्याचा मोबदला म्हणून त्याला जगन्मान्यतेचे हक्क देण्यांत आले असा पुकारा केला जातो. १४ लक्ष ५७ हजार हिंदी माणसें हिंदुस्थानाचा किनारा सोडून महायुद्धाचे कामीं मदत करण्यास गेलीं; त्यांपैकीं ५ लाख ३२ हजार तर रणांगणावर सैनिक म्हणून ठाकले होते. युरोपांतील एका छोट्या राष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं, खुषीच्या सक्तीनें असो वा सक्तीच्या खुषीनें असो, लाखों हिंदपुत्रांनीं धारातीर्थीं प्राण अर्पण केले. या आहुतीबरोबर द्रव्याच्या घृतधाराहि हिंदुस्थानानें या रणयज्ञांत सढळ हातानें ओतल्या. नेहमींचा डोईजड लष्करी खर्च सोसून त्याशिवाय चार कोटि पौंडांचा जादा भार त्यानें सोसला, एवढेंच नव्हे तर दहा कोटि पौंड युद्धकर्ज म्हणून दिलें. इतकी मनुष्यहानि व द्रव्यहानि हिंदुस्थाननें एकजुटीनें व स्वयंप्रेरणेनें आपल्या मुक्ततेसाठीं व उद्धारासाठीं सोसण्याचें ठरविलें असतें, तर त्याच्या स्वातंत्र्य-लाभाच्या आड कोण येऊं शकला असता?

महायुद्धाच्या ऐन आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थानापासून अधिक मदत पिळून काढतां यावी म्हणून १९१७ सालीं 'वसाहतीचें स्वराज्य' या शब्दाचें केवळ आंबोण त्याच्यापुढें बादशहांच्या हस्तें ठेवण्यांत आलें; एवढेंच नव्हे, तर वाघाच्या जबड्यांतून मालकाला सोडविण्यासाठीं प्राणावर उदार झालेल्या

सेवकाला रावसाहेब, रावबहादूर अशा कागदी किताबाच्या घोड्यावर बसवावें त्याप्रमाणें १९१७ सालीं भरलेल्या ' साम्राज्यपरिषदें ' त हिंदुस्थानाचे चार प्रतिनिधि म्हणून सरकारनें आपलीं चार बाहुलीं बसविलीं. त्यांतील दोघे जण हिंदी असले तरी ब्रिटिश सरकारच्या हातास हात लावण्यापलीकडे कांहीं करण्याची धमक त्यांचे ठिकाणीं नव्हती. युद्धसमाप्तीनंतर शांतता परिषद भरली, तींतहि हिंदुस्थानासाठीं पाट मांडण्यांत आला होता. फार काय शांततेचा तह जो झाला तो पाहिला तर, त्यावरहि हिंदुस्थानातर्फे सही केलेली आढळेल. आणि महायुद्धाच्या अग्निकुंडांतून बाहेर पडलेला जो राष्ट्रसंघ, त्यावरहि हिंदुस्थानाचा प्रतिनिधि घेण्यांत आला व तो मान अद्याप चालू आहे. इतक्या मानसन्मानानें व समान दर्जानें ब्रिटिशसाम्राज्य हिंदुस्थानला जगभर नाचवीत असतांहि हिंदी प्रजा असंतुष्ट ती असंतुष्टच ! साम्राज्यसेवेचें पारितोषिक म्हणून १९१९ सालीं मॉंट-फर्ड सुधारणा बहाल केल्या, तर त्यावर राष्ट्रसभेनें अपुऱ्या, असमाधान-कारक व अस्वीकार्य असाच शिक्का मारला ! या सुधारणांच्या योगें लंडनमधील हिंदुस्थानाच्या हायकमिशनरला वसाहतींच्या हायकमि-शनरचा दर्जा देण्यांत आला, तरी हिंदुस्थानचें समाधान नाहीं तें नाहींच ! भल्याला भलें म्हणण्याइतकाहि सद्गुण परतंत्र प्रजेंत रहात नाहीं असेंच म्हटलें पाहिजे.

प्राप्त परिस्थितींत संतोष न मानतां हिंदुस्थानाचे राष्ट्रीय पुढारी म्हणूं लागले, आमचें रक्त ज्या महायुद्धांत सांडलें, त्यांतून निर्माण झालेलें ' स्वयंनिर्णयाचें ' तत्त्व आम्हांला लावा व हिंदुस्थानांतील प्रजेनें स्वराज्य–प्राप्तीला अनुकूल असें मतदान केलें तर त्याला स्वराज्य भोगूं द्या. हिंदुस्थानाचा हा हावरेपणा त्याचीं दीडशें वर्षें काळजी वहात आलेलें ब्रिटिश सरकार कसा मान्य करील ? ' स्वराज्य दिलें आहे, देऊन चुकलें आहे, तें अंमलांतहि आलें आहे' अशी नाटकी भाषा एकीकडे चालू असतांच ब्रिटिश सरकारनें ' गरज सरो; वैद्य मरो. ' या न्यायानें, महायुद्ध संपतांच वसाहतीच्या स्वराज्याचा नारळहि पोखरून–पोखरूनच हिंदुस्थानाच्या पदरांत टाकण्याचा कुटिल डाव सुरू केला.

वजवुड बेनसारखे मजूरपक्षीय भारतमंत्री मारे बढाई मारीत होते कीं, हिंदुस्थानांत वसाहतीचें स्वराज्य चालूच आहे ( Dominion Status in action ) आणि हिंदुस्थानांतील त्यांचे हस्तक हिंदी प्रजेला राज्यकारभारापासून बारा हात दूर ठेवीत होते. लॉर्ड रीडिंग यांनीं आपली कुशाग्र बुद्धि चालवून १९२४ सालीं वसाहतीचें स्वराज्य व जबाबदारीची राज्यपद्धति यांमध्यें भेद करण्यास सुरुवात केली. हिंदुस्थानाला द्यावयाची ती जबाबदार राज्यपद्धति, वसाहतीचें स्वराज्य नव्हे अशी प्रतिगामी भाषा त्यांनीं चालू केली. त्यांचीच री ओढून लॉर्ड अर्विन यांनीं प्रवास व अंतिम स्थान ( Journey and its Destination ) यांत फरक करून अशी धूळफेक केली कीं, वसाहतीचें स्वराज्य हें हिंदुस्थानाचें ध्येय आम्हांला मान्य असलें, तरी तें त्याला आतांच प्राप्त झालें पाहिजे असें मात्र नाहीं. प्रवास सुरू झालेला आहे, शेवटचा मुक्काम गांठण्यास अवधि लागणारच. हिंदुस्थानाच्या राज्यघटनेचा विकास होतां होतां तिला " वसाहतीच्या स्वराज्याचें स्वरूप प्राप्त होईल. "* बोटावरील थुंकीचा हा खेळ पाहून व सायमन कमिशनचें एकजात गोरेपण पाहून हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पुढाऱ्यांचा क्षोभ अधिकच पेटला. त्याचें शमन करण्यासाठीं गोलमेज परिषदा आल्या व त्यांतून श्वेतपत्रक बाहेर पडून १९३७ च्या एप्रिलपासून प्रांतिक स्वराज्य सुरू झालें. मध्यवर्ती सत्ता देणाऱ्या संयुक्त घटनेचा अजून पत्ताच नाहीं.

हिंदुस्थानाला 'स्वराज्यास पात्र' करण्याचा पतकर घेतलेल्या इंग्रजांनीं दीडशें वर्षांनंतर दिलेलें हें स्वराज्य-दान किती मर्यादित, निःसत्त्व व अकिंचित्कर आहे याच्या अनुभवाचे बोल निरनिराळ्या प्रांतांतील दिवाण वर्षभराच्या आंतच काढूं लागले आहेत. जी दुर्दशा राजकारणांत, तीच इतरत्रहि. हिंदुस्थानाचें आरोग्य घ्या, शिक्षण घ्या, संपत्ति घ्या, सर्वत्र इंग्रजांनीं हाःहाःकारच उडवून दिलेला आहे.जपान व जर्मनी यांनीं पांचपन्नास वर्षांच्या कालांत आणि रशियानें तर अवघ्या पंधरा वर्षांत, निरक्षरतेचें निर्मूलन

* The natural issue of India's constitutional progress is the attainment of Dominion Status.

करून शेंकडा नव्वद स्त्रीपुरुष साक्षर केले, त्यांना लष्करी शिक्षणाचें कवच चढविलें, त्यांच्यांतील रोगराई व बालमृत्यु निम्याहून कमी केले, शेतीचें उत्पन्न व राष्ट्राची एकंदर संपत्ति द्विगुणित केली, धान्य, यंत्रें वगैरे बाबतींत देश स्वावलंबी केला व त्याला जगाच्या दराऱ्याचें व म्हणूनच आदराचें स्थान बनविलें. उलट ब्रिटिश साम्राज्याचे अंकित असलेले देश, त्यांतले त्यांत हिंदुस्थान, हें चोहोंबाजूंनीं झपाट्यानें खालीं आणि खालींच जात आहे.

या अधोगतीचें डोळे उघडणारें चित्र गेल्या वर्षी ग्लासगो येथें 'वर्कर्स एंपायर एक्झिबिशन'मध्यें मांडण्यांत आलें होतें. त्या प्रदर्शनांत ब्रिटिश साम्राज्यामध्यें दैन्य, दारिद्य व दडपशाही यांचेंच प्राबल्य कसें पसरलें आहे हें कुशलतेनें दाखविलें होतें. त्यांत एकीकडे ईस्ट इंडिया कंपनीच्या जुलमाचें चित्र रंगविलें होतें, तर दुसरीकडे मुंबईसारख्या अव्वल प्रतीच्या शहरीं हजारों कामकरी १२ चौरस फुटांच्या एका खोलींत सहा सहा माणसांचें कुटुंब कोंडून कसा काळ कंठीत आहेत याचें वर्णन केलेलें होतें. हिंदुस्थानांत ब्रिटिशांच्या मालकीच्या ज्या कोळशाच्या खाणी आहेत, त्यांच्या कारभारांत शें. ११२ डिव्हिडंड भागीदारांना मिळत असतां, तेथें काम करणाऱ्या पुरुषाला रोज आठ पेन्स व स्त्रीला चार पेन्स मिळतात हा विरोध त्या प्रदर्शनांत स्पष्ट रीतीनें दाखविलेला होता. साऱ्या जगाच्या तागाचा मक्ता हिंदुस्थानाकडे आहे. त्यामुळें तागाच्या कारखान्यांतील भागीदारांना शें. १०० डिव्हिडंड मिळावें हें साहजिकच आहे; पण त्या कारखान्यांत घाम गाळणाऱ्या हिंदी मजुरांना त्याचा काय लाभ? तर आठवड्याला चार शिलिंग पगार व आठवड्यांतील कामाचे तास ५४ होते त्यांची ६०पर्यंत वाढ! हीच कहाणी साम्राज्याच्या इतर अंकित देशाची. त्रिनिदादमध्यें ब्रिटिशांचें राज्य १३५ वर्षे आहे. त्याची फल-श्रुति काय? कोणाला पोटभर खावयास नाहीं, शें. ४३ लोकांना शिक्षणाचा गंध नाहीं आणि शें. ८० लोक नारूनें पिडलेले. अशीच स्थिति आफ्रिकेंतील वसाहतींची व सीलोन, पॅलेस्टाइन यांचीहि गत तीच.

ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं म्हणतात, तें विस्ता-

राच्या दृष्टीनें यथार्थ आहे, कारण प्रत्येक खंड व प्रत्येक महासागर यांमध्यें त्याचें सत्तास्थान आहेच आहे. पण ब्रिटिशांचा राज्यकारभार पाहिला तर मात्र त्याचें वर्णन उलट शब्दांनीं म्हणजे असें करावें लागेल कीं, ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधींच उगवत नाहीं. सरकारी कागदपत्राच्याच आधारानें कै. सर रमेशचंद्र दत्त यांनीं लिहिलेले तीन ग्रंथ वाचावे, म्हणजे हिंदुस्थानांत ब्रिटिशांनीं पसरलेल्या अंधारावर चांगला उजेड पडेल. इंग्लंडांतील प्रत्येक माणसाचे सरासरी उत्पन्न १०० पौंड आहे; तर तेंच हिंदुस्थानांत जास्तींत जास्त ७ पौंड आहे. तेथील लोकांचें सरासरी आयुर्मान ५५ वर्षें आहे, पण तेंच येथें २५ आहे. हिंदुस्थानांतील पुरुषांपैकीं शें. ८६ व स्त्रियांपैकीं शें. ९८ साक्षरतेलाहि पारख्या आहेत. शिक्षणासाठीं हिंदुस्थानांमध्यें दर माणशीं दरसाल ९ पेन्स सरकार खर्च करतें, पण इंग्लंडांत हा खर्च ७५ पट आहे. बरें, राज्यव्यवस्था तरी न्यायावर उभारलेली, कायद्यानें चाललेली आणि 'शांततेची व सुव्यवस्थेची' आहे म्हणावें; तर अन्याय्य जातिनिर्णयानें प्रजेची राजकीय चीरफाड केलेली, न्यायमंदिरांतहि वर्णवैषम्याचा विटाळ कालवलेला, लष्करांत काळा–गोरा भेद राष्ट्राच्या जिव्हारी लागण्याइतका तीव्र, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टसारखे दडपशाहीचे कायदे आणि सर्वांवर कळस म्हणून सहस्रावधि कार्यकर्त्यांना विनाचौकशी स्थानबंदी! लष्कर, खजिना व परराष्ट्रसंबंध या खात्यावर हिंदी लोकांची सावलीहि पडावयाची नाहीं!! रशियामध्यें १८७३ ते १८७७ या चार वर्षांत २००० विद्यार्थी जसे फाशीपर्यंतच्या शिक्षेखालीं भरडले गेले तसे बंगालमध्यें १५०० तरुण विनाचौकशींत अटकेंत गेले, अंदमानला डांबले गेले, फांसावर लटकवले गेले! राजबंद्यांच्या मुक्ततेची मागणी ड्यूमा सभेंत रशियन राष्ट्र–भक्तांनीं जशी प्रथम केली, तशीच हिंदुस्थानांतील स्वतंत्र प्रांतांनींहि राजबंद्यांच्या मुक्ततेचा प्रश्न प्रथम हातीं घेतला व पेंचप्रसंगाचा शह लावून तडीस नेला. १९०५ सालीं झारच्या चुलत्यानें गोळीबार करून १५०० निःशस्त्र शेतकरी ठार केले, त्याचीच पुनरावृत्ति १९१९सालीं अमृतसर येथें जनरल डायरनें तितक्याच भयंकर रीतीनें काढली.

हिंदुस्थानांतील दारिद्र्याचें एका वाक्यांत वर्णन केलेलें पाहावयाचें असेल तर बंगाल सरकारचा १९२७।२८ चा 'हेल्थ रिपोर्ट' पहावा. त्यांत 'उंदराचें जीवनहि चालूं शकणार नाहीं इतकी अपुरी धान्यसामुग्री हिंदी माणसाला मिळते' असें पुढील विधान आहे.

The present peasantry of Bengal are, in very large proportion, taking to dietary on which even rats could not live for more than five weeks.

एका इंग्रज अंमलदारानें हिंदी शेतकऱ्याचें वर्णन They do not live they only exist असें केलें होतें. खुद्द मॉंटफर्ड रिपोर्टांत काय म्हटलें आहे पहा!—

The immense masses of the people are poor, ignorant and helpless far beyond the standard of Europe.

हिंदुस्थानांतील बहुजनसमाज कंगाल, अडाणी व दुबळा आहे. याला जबाबदार इंग्रजी राज्याशिवाय दुसरें कोण आहे?

I do not hesitate to say that half the agricultural population do not know, from one year's end to another, what it is to have a full meal.

पोटभर जेवण म्हणजे काय चीज असते हें निंम्या शेतकरी वर्गाला माहीतहि नाहीं असें आसामचे चीफ कमिशनर असलेले सर चार्लस इलियट यांनीं १८८० तच निःसंदिग्धपणें म्हटलें आहे.

## हिंदी प्रजेचे व्यवसाय

| | | | शेंकडा |
|---|---|---|---|
| शेती | ... | ,, | ७३·३५ |
| उद्योगधंदे... | ... | ,, | १०·३८ |
| सैन्य व राज्यकारभार | ... | ,, | १·२५ |
| वहातूक | ... | ,, | १·६५ |
| व्यापार | ... | ,, | ५·५३ |
| संकीर्ण | ... | ,, | ७·८४ |

यावरून हिंदुस्थानांतील शेतकऱ्याची अन्नान्नदशा होणें म्हणजे सबंध

हिंदुस्थानच भिकेस लागणें होय हें उघड होतें. त्याचेवरील कर्ज हें राष्ट्राची सांपत्तिक आबादीआबाद कितपत आहे हें अजमावयाचें मापच म्हटलें पाहिजे. सर विश्वेश्वरअय्या यांच्या हिशेबाप्रमाणें हिंदी शेतकरी-वर्गाच्या डोक्यावर १५०० कोटी रुपयांचा डोंगर उभा आहे. शेतकी कमिशननें हा आंकडा ९०० कोटीपर्यंतच दाखविला होता. पण कमिशनच्या वेळेपासून आतांपर्यंत तें कर्ज सारखें फुगतच आहे; कमी होत नाहीं. पंजाबमध्यें १९३० सालीं १३० कोटी कर्ज होतें, तें १९३५ त २७० कोटी झालें. इतकी ही वाढ झपाट्याची आहे. हिंदी माणसाचें वार्षिक सरासरी उत्पन्न जगांतील इतर देशांमधील उत्पन्नाशीं तोललें म्हणजे हिंदी दारिद्र्याची कल्पना चटकन् ढळढळीतपणें येते.

## हिंदी माणसाचें सरासरी वार्षिक उत्पन्न

| अंदाज करणारे | वर्ष | रुपये |
|---|---|---|
| दादाभाई नवरोजी | १८७० | २० |
| लॉर्ड क्रोमर | १८८१ | २७ |
| डिग्बी | १८९९ | १८·९ |
| लॉर्ड कर्झन | १९०० | ३० |
| फिंडले शिरास | १९११ | ५० |
| सायमन कमिशन | १९२८ | ११० |
| विश्वेश्वरअय्या | १९३३ | ६० |
| के. टी. शहा | १९३७ | ५४ |

## जगांतील वार्षिक सरासरी उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| अमेरिका | रु. | १०८० |
| ऑस्ट्रेलिया | ,, | ८१० |
| इंग्लंड | ,, | ७५० |
| कॅनडा | ,, | ७५० |
| फ्रान्स | ,, | ५७० |
| जर्मनी | ,, | ४५० |

परराष्ट्रांचें स्वातंत्र्य, समृद्धि व सौख्य यांना पायाखालीं घालून उभारलेलें ब्रिटिश साम्राज्य हें जागतिक शांततेचें खरें वैरी आहे. लंडनमधील राज्यसत्ता म्हणजे गुलाममालकांची सत्ता होय* या विधानांत अतिशयोक्ति किंवा असत्य असें काय आहे? गुलामगिरीवर उभारलेल्या व जुलूम-जबरदस्तीनें चालविलेल्या अशा साम्राज्याच्या छत्राखालीं नांदणें कोणता जागृत व स्वाभिमानी देश मान्य करील? परक्याची लूटमार, दडपशाही व परस्वापहरण यांनीं इंग्लंडचा गेल्या तीन शतकांचा इतिहास रंगलेला आहे असा स्पष्ट अभिप्राय ट्रॉट्स्की यांनीं व्यक्त केला आहे.§

अशा गुलामगिरींत यापुढें स्वाभिमानी हिंदुस्थान रहाणार नाहीं अशी आपली खात्री मि. सी. एफ्. अँड्रूज यांनीं जगजाहीर केली आहे. मि० एस्. ई. स्टोक्स् या महायुद्धांत भाग घेतलेल्या अमेरिकन लेखकाच्या—The failure of European civilization as a World Culture. या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत मि. अँड्रूज यांनीं म्हटलें आहे,

We have come to the same conclusion as to the impossibility of India remaining with self respect within the British Empire as it now stands.

केवळ हिंदुस्थानांत नव्हे तर ब्रिटिश साम्राज्याच्या प्रत्येक घटकांत अन्यायाची प्रतिकारबुद्धि धुमसत असल्यानें आणि स्वातंत्र्याची लालसा खेळूं लागल्यानें, ब्रिटिश साम्राज्याच्या तक्ताखालीं पेरला गेलेला सुरुंग, महायुद्धाचीं डांबरबत्ती शिलगावली जातांच, गाय फॉक्सच्या 'गन् पॉव-

---

* The London parliament is a Slave-holders parliament
*Leon Trotsky in " Whither England."*

§ " For three centuries England has waged an unbroken chain of wars, aiming at an expansion, by the methods of piracy and force against other nations, of its theatre of exploitation, seizing the wealth of others killing foreign commercial competition, destroying foreign naval forces, and thus enricling the British ruling classes."
*Whither-England ?—Trotsky.*

डर प्लॉट ' प्रमाणें अपेश न घेतां, एकदम स्फोट पावून सर्वच्या सर्व ब्रिटिश साम्राज्य उध्वस्त केल्यावांचून रहाणार नाहीं.

महायुद्ध आज ना उद्यां होणार हें निश्चित. राष्ट्रसंघ आणि फ्रान्स व ब्रिटन प्रभृति त्याचे पाठीराखे यांनीं मँच्युको, ॲबीसीनिया, ऑस्ट्रिया किंवा झेकोस्लाव्हाकिया यांचेवरील ' अत्याचाराचे ' वळीं कितीहि डोळे झांकले व हात जोडले; तरी जपान, इटाली व जर्मनी यांची वाढती भूक ही त्यांना व त्यामुळें फ्रान्स ब्रिटनांना स्वस्थ बसूं देणार नाहीं. लोकसंख्येसाठीं म्हणा कीं व्यापारासाठीं म्हणा, वसाहतींची वांटणी करण्याचा प्रश्न उग्र स्वरूपांत पुढें आल्यावांचून रहात नाहीं आणि तो आला कीं महायुद्ध होण्याचें कांहीं टळत नाहीं. § आणि यापुढील महायुद्ध म्हणजे युरोपियन संस्कृतीचा व त्याबरोबरच ब्रिटिश साम्राज्याचा प्रलय. जर्मनींतील हेर हिटलेरचा उजवा हात असलेला गॉबेल्स यानें १९३६ सालींच साऱ्या जगाला अशी धमकी देऊन ठेवलेली आहे कीं, ' कच्चया मालाचा पुरवठा होण्यासाठीं आम्हांला वसाहती पाहिजे आहेत, त्या जगानें आम्हांला घेऊं न दिल्या तर, याद राखा! युद्धाचा भडका उडेल.' * यापूर्वींच्या बोअर युद्धानें गोऱ्या माणसाचें वजन जगाच्या दृष्टीनें कमी झालें आणि गेल्या महायुद्धानें तर तें छिन्नविच्छिन्न झालें असें डॉक्टर ब्रॉन् या ग्रंथकारानें म्हटलें आहे.‡ यापुढें होणाऱ्या युद्धानें गोऱ्या राष्ट्रांचें वजनच नव्हे तर त्यांचें वर्चस्वच नष्ट होणार आहे. पण इंग्लंडचे माजी प्रधान मि० बाल्डविन् यांनीं कांहींहि आडपडदा न ठेवतां असें भाकित केलें आहे कीं,

§ Any general redistribution of the vast existing colonial empires without war is out of question.

—*R. Palme Dutt in World Politics.*

* We are poor nation. We have no colonies, no raw materials. But time will come when we must demand our colonies back. It is dengerous for the world not to concede such damands, because some day the bomb will explode. —*Gobbels.*

‡ The Boer War had lowered the white man's prestige, the Great War shattered it.

" One more war in the West and the civilization of the ages will fall with as great a shock as that of Rome ?

आगामी महायुद्धाचा धक्का युरोपला जितका घातक व भीतिदायक तितकाच तो हिंदुस्थानासारख्या परतंत्र राष्ट्राला संजीवक व आशादायक ठरणार आहे. १९१४ च्या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्याचें हिंदुस्थानांतील प्रभुत्व किती डळमळीत झालें होतें हें प्रसिद्धच आहे. या अवाढव्य राष्ट्रांतील साम्राज्यसत्तेच्या रक्षणासाठीं फक्त १५००० शिपाईच जाग्यावर होते. या बिकट स्थितीची कल्पना लॉर्ड हार्डिंज यांनीं मेसापोटेमियन कमिशन पुढें दिलेल्या साक्षीवरून येतें. त्यांनीं तेव्हां असे उद्गार काढले कीं " हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा अढळ म्हणून एवढ्या मूठभर लष्कराच्या बळावर महिनेच्या महिने आम्ही हिंदुस्थानांत शांततेनें राज्य चालवूं शकतो." पुढील युद्धाच्या वेळींहि ब्रिटिश साम्राज्य असेंच पेंचांत येईल.

गेल्या महायुद्धाप्रमाणें हें येतें महायुद्ध तसेंच वांया जाऊं न देत हिंदुस्थाननें आत्मोद्धारासाठीं कोणकोणत्या योजना कराव्यात याचें विवेचन पुढील भागांत करण्यांत येईल. प्रत्येक क्षण, प्रत्येक संधि हिचा उपयोग आपल्या राष्ट्रस्वातंत्र्याकडे कसा करून घेतां घेईल याचें अवधान प्रत्येकानें ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराचीं सूत्रें लॉर्ड कर्झन यांनीं हातीं घेतलीं तेव्हां त्यांना आपल्या साम्राज्यशाहीची मगरमिठी दृढ करण्यासाठीं पांच वर्षें थोडीं वाटलीं व वर्ष क्षणाप्रमाणें व क्षण हा पळाप्रमाणें धांवत आहे अशी भावना करून हिंदुस्थानाच्या हातापायांत दडपशाहीच्या शृंखला भराभर ठोकण्याचा सपाटा त्यांनीं लावला;§ त्याप्रमाणें पण त्याच्या उलट हेतूनें, म्हणजे त्या ृंखला तोडण्यासाठीं, युद्धापर्यंतचा अवधि अल्प आहे हें लक्ष्यांत घेऊन प्रत्येक हिंदवासियानें, क्षुद्र भेदाभेद विसरून जाऊन, ब्रिटिश साम्राज्टाशीं टक्कर देण्याइतकें सामर्थ्य राष्ट्रांत निर्माण करण्याकडे आपला सर्व वेळ, आपलें सर्व बळ वेंचलें पाहिजे.

§ " I have only five years. For such a task, every year seems a minute, every minute a second."

—*Lord Curzon.*

# २

# साम्राज्य घटकांची स्वातंत्र्य--स्थापना.

Like a bubble, Greater Britain expanded rapidly and then burst. It has since been expanding again. Can we avoid the obvious inference ? —*Sir, J. R. Seeley.*

१९१४च्या महायुद्धानंतर 'स्वयंनिर्णया' चें तत्त्व जगभर अंमलांत न आलें, तरी तें अंमलांत येण्याची आशा मात्र सर्व परतंत्र राष्ट्रांच्या डोळ्या-पुढें खेळूं लागली. आणि परतंत्र राष्ट्रांचा उद्धार म्हणजे त्यांचेवर स्वामित्व गाजविणाऱ्या साम्राज्यांचा मृत्युच. वर्षानुवर्षे पारतंत्र्यांत खितपत पड-लेल्या राष्ट्रांना संजीवनी देणारे स्वातंत्र्याचे जे पहाट-वारे सुटले, तेच साम्राज्यशाहीच्या भक्तांना "दक्षिण दिशेचे वारे" वाटूं लागले. म्हणूनच इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान सर स्टॅन्ले बाल्डविन् यांनीं असे निराशेचे उद्गार काढले कीं, महायुद्ध संपल्यापासून सैतानाचे खेळ मोठ्या प्रमाणा-वर सुरू झाले आहेत.* आपल्या मुठींतून एकेक देश सुटून जाणें हाच, ब्रिटिश प्रधानांच्या मतें, "सैतानाचा खेळ !" पण खरोखर पाहतां हा निसर्गाचाच खेळ नव्हे काय ? एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला, त्याच्या संमतीविरुद्ध, अंकित करून ठेवणें हा वास्तविक सैतानाचा खेळ; गुलाम-गिरी ही अनैसर्गीक स्थिति होय, ती घालवून स्वतःचे स्वामी स्वतः होण्याची इच्छा बळावणें हा निसर्गधर्मच होय. वसाहती या फळासारख्या होत आणि त्या पक्वावस्थेनंतर झाडापासून गळून पडतात असें जें अमेरिकन

* Since the war, the manifest forces of Satan have been more conspicuously at work.

स्वातंत्र्य-स्थापनेपूर्वी टगार्ट यानें म्हटलें आहे § त्याचा पडताळा ब्रिटिश साम्राज्याचा आजवरचा इतिहास स्पष्टपणें देत आहे.

ब्रिटिश साम्राज्य अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. रोमन साम्राज्य काय किंवा मोंगल साम्राज्य काय, हीं त्यापुढें अगदीं ठेंगणीं वाटतात. अशोक, समुद्रगुप्त वगैरे साम्राज्यें तर त्याच्याशीं तुलनेला उभींच करणें चुकीचें. प्रवासाचीं साधनें जितकीं जितकीं जलद होत गेलीं, तितकीं तितकीं साम्राज्यें विस्तृत होत गेलीं. शिडाच्या जहाजाऐवजीं वाफेच्या आगबोटी आल्या आणि आतां तर विमानें त्यांच्या डोक्यावरच बसलीं! एका उड्डाणांत विमानें ८००० मैलांची मजल मारूं लागलीं—म्हणजे उंच पर्वत व खोल समुद्र यांची आडकाठी न जुमानतां पृथ्वीचा एक-तृतीयांश भाग एका दमांत आक्रमण करूं लागलीं. त्यामुळें दूरदूरचे देश पण अंगणा—परसा-इतके जवळ झाले. हिंदुस्थानासारख्या खंडप्राय देशावर एकछत्री राज्य चालू रहाण्याची अपूर्वाई या शीघ्र वाहतुकीमुळेंच शक्य झाली.

' समुद्र—स्वामिनी ' म्हणून आंग्लभूमीची सत्ता चालत असल्यानें नाविक वाहतुकीचा फायदा तिला जास्तींत जास्त घेतां आला. फ्रान्स, स्पेन, जपान, इटाली, अमेरिका, रशिया, जर्मनी वगैरे राष्ट्रांनींहि आपापल्या साम्राज्याचा विस्तार केला, पण तो ब्रिटिश साम्राज्याच्या मानानें फारच थोडा. १९ वे शतकाचे शेवटीं जगांत जीं पांच प्रमुख साम्राज्यें होतीं, त्यांचा विस्तार पुढील कोष्टकावरून तुलनेनें लक्ष्यांत येईल.

| साम्राज्य | प्रदेश ( चौरस मैल ) | | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| | कोटी | लक्ष | कोटी |
| १ ब्रिटिश | १ | २५ | ४० |
| २ रशियन | ० | ८५ | १३ |
| ३ अमेरिकन | ० | ३५ | १३ |
| ४ फ्रेंच | ० | ४५ | ९ |
| ५ जर्मन | | ५० | ७ |

§ Colonies are like fruits which cling to the tree only till they ripen.

जगाच्या क्षेत्रफळाचा व लोकसंख्येचा सुमारें पाव हिस्सा त्यावेळीं ब्रिटिश साम्राज्याच्या छत्राखालीं होता. सध्यांची स्थिति पाहिली तरी इंग्लंडची अफाट सत्ताच दिसून येते.

| देश | मूळ वस्ती कोटी | लक्ष | ताब्यांतील प्रदेशाचें क्षेत्रफळ स्वदेशाच्या किती पट |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ४ | ७० | १४० |
| फ्रान्स | ४ | ० | २१ |
| हॉलंड | ० | ८० | ६० |
| इटाली | ४ | ३० | १० |
| बेल्जियम् | ० | ८० | ८० |
| पोर्तुगाल | ० | ७० | २६ |

'निरनिराळ्या राष्ट्रांनीं बनलेल्या व एका मध्यवर्ती सत्तेखालीं चाललेल्या'* भूप्रदेशालाच साम्राज्य ही संज्ञा प्राप्त होते. या व्याख्येप्रमाणें अमेरिकेंत भिन्नभिन्न राष्ट्रें असलीं तरी त्यांपैकीं कोणी कोणाचे अंकित नसल्यानें त्या सर्वांचें, म्हणजे युनायटेड स्टेट्सचें, मिळून एक साम्राज्य बनलें आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. उलटपक्षीं जर्मनीमध्यें एकसूत्र राज्यकारभार चाललेला असला तरी त्याला आतां, म्हणजे महायुद्धानंतर त्याचे अवयव तोडले गेल्यानंतर, हाताखालीं मांडलिक राष्ट्रें नसल्यानें साम्राज्यपद मिरवितां येणार नाहीं. इंग्लंडनें मात्र आपल्या मुठींत व बगलेंत इतके देश ठेवले आहेत कीं, साम्राज्याचें सारें इष्टानिष्ट वैभव त्याला प्राप्त झालेलें आहे. फ्रान्स, जर्मनी, स्पेन वगैरे इतर सर्व साम्राज्यापेक्षां ब्रिटिश साम्राज्याचें आदिपीठ आकारानें फारच लहान आहे. डच साम्राज्याचें मूलस्थान जें हॉलंड, तेंच काय तें इंग्लंडपेक्षां छोटें आहे; बाकी एवढ्या वामनस्वरूपी बेटानें इतकें विराटस्वरूपी साम्राज्य चालविलेलें दुसरें उदाहरण पृथ्वीच्या व इतिहासाच्या पृष्ठभागावर आढळत नाहीं. ब्रिटिश बेटें आणि ब्रिटिश साम्राज्य या दोहोंचें परस्पराशीं प्रमाण पाहिलें म्हणजे

---

* Empire is composed of various distinct national units subject to centralized will. —*Dr. M. J. Bonn.*

शतपुत्रा गांधारीहि तोंडांत बोटेंच घालील! युरोपखंडाच्या खांद्यावर तिळा-प्रमाणें शोभणारें चिमुकलें ब्रिटिश बेट कोठें आणि एकीकडे ऑस्ट्रेलियापर्यंत तर दुसरीकडे कॅनडापर्यंत पांची खंडांत ऐसपैस हातपाय पसरलेलें ब्रिटिश साम्राज्य कोठें!! जमीन व लोकवस्ती यांच्या दृष्टीनें पाव जग ब्रिटिश साम्राज्याच्या अंकित आहे. त्याच्या आधारावर इंग्लंडचें तळहाताएवढें बेट साऱ्या जगाला आज तळहातावर खेळवीत आहे! ख्रिस्तपूर्व ५४ ते ख्रिस्तोत्तर १२१५ पर्यंत हजार दीडहजार वर्षें रोमन, अँगल्स्, सॅक्सन्, नॉर्थमेन्स व डेन्स यांनीं थोडथोडा काळ इंग्लंडवर वर्चस्व चालविलें व नॉर्मन लोकांनीं बराच काळ आपली सत्ता इंग्लंडवर गाजविली.

सुमारें दीड हजार वर्षांपूर्वीं ग्रेट ब्रिटनच्या रहिवाशांच्या संरक्षणाचा सर्व भार रोमन लोकांवर होता. पण रोमवर जेव्हा परक्यांची टोळधाड येऊन पडली, तेव्हां रोमन लोकांनीं ब्रिटनमधील आपलें सैन्य परत बोला-विलें व ब्रिटनच्या रहिवाशांना असहाय अवस्थेंत टाकून दिलें. रोमन लोक ब्रिटनमधून निघून गेल्यानंतर जर्मनींतील रानटी लोकांनीं ब्रिटनवर स्वारी करून तेथील राजकीय सत्ता बळकावली आणि त्या देशांत आपली कायमची वस्ती करून त्याला आतांचें इंग्लंड हें नांव दिलें.

पांचशें वर्षांपूर्वीं इंग्लंडला स्वराज्य नव्हतें व तीनशें वर्षांपूर्वीं त्याला साम्राज्य नव्हतें. आजचा त्याचा राज्य-परिवार पुढीलप्रमाणें आहे.

| | क्षेत्रफळ (चौरस मैल) | | | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी | लक्ष | हजार | कोटी | लक्ष | हजार |
| ब्रिटिश साम्राज्य (United Kingdom) | १ | ८० | | ५१ | ४९ | |
| इंग्लंड | ० | | ९४ | ४ | ६८ | ० |
| स्वतंत्र वसाहती (Dominions) | | | | | | |
| कॅनडा | ० | ३७ | ३० | १ | १० | ० |
| ऑस्ट्रेलिया | ० | ३० | ० | ० | ६७ | ० |
| न्यूझीलंड | ० | १ | ५ | ० | १५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दक्षिण आफ्रिका | ० | ४ | ७२ | ० | ९५ | ० |
| आयरिश फ्री स्टेट | ० | ० | २६ | ० | २९ | ० |
| **अंकित देश** | क्षेत्रफळ चौरस मैल | | | लोकसंख्या | | |
| **( Dependency )** | कोटी | लक्ष | हजार | कोटि | लक्ष | हजार |
| हिंदुस्थान | ० | १८ | | ३५ | | |
| ब्रह्मदेश | ० | २ | ६१ | १ | ५० | |
| **बादशाही वसाहती** | | | | | | |
| **( Crown Colonies )** | | | | | | |
| एडन | ० | ० | ४२ | ० | ० | ५२ |
| सीलोन | ० | ० | ४५ | ० | २ | ५० |
| माल्टा | — | फक्त ९५ चौरस मैल | | | | |
| फिजी | — | ( २५० बेटें आहेत ) | | ० | २ | ० |
| जमेका | ० | ० | ५ | ० | १० | ० |
| मॉरिशस् | ० | ० | १ | ० | ४ | ० |
| जिब्राल्टर | फक्त २ चौ. मैल | | | ० | ० | २१ |
| सायप्रस | ० | ० | ४ | ० | ३ | ५० |
| ऱ्होडेसिया | ० | ४ | ४० | ० | १३ | ० |
| स्ट्रेट्स सेटलमेंट्स् | ० | ० | २ | ० | ९ | ० |
| न्यू फाउंडलंड | .० | ० | ४२ | ० | २ | ९० |
| **आज्ञापित प्रदेश** | | | | | | |
| **( Mandated Territories )** | | | | | | |
| पॅलेस्टाईन | ० | ० | ९ | ० | १२ | ५० |
| मेसापोटेमिया | ० | १ | ४३ | ० | २८ | ० |
| टांगानिका | ० | ३ | ६५ | ० | ४१ | ० |

याशिवाय झांझीबार, मलाया, वगैरे 'संरक्षित संस्थानें' ( Protectorates ) किती तरी आहेत.

यापैकीं जिब्राल्टर, माल्टा व सायप्रस हीं तीन स्थानें अत्यंत लहान असलीं तरी आरमारी ठाणीं या दृष्टीनें त्यांचें महत्त्व फार मोठें आहे.

युरोप, आशिया व आफ्रिका या तीन खंडांच्या सरहद्दीवरील हीं तीन नाकीं म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या कटीच्याच जागा होत. आशियाखंडांतील एडन व सिंगापूर यांचें जें साम्राज्यांत महत्त्व, तेंच वरील तीन स्थानांचें युरोपांत. इंग्लंडपासून ऑस्ट्रेलियापर्यंत एकछत्री सत्ता चालविण्यास याच मेखा उपयोगी पडतात. १८८१ सालीं डिझरालीनें इंग्लंडसाठीं सुवेझ कालव्याचे शेअर विकत घेतले त्यांतहि साम्राज्य-स्थैर्याचाच हेतु होता. हिंदुस्थानाचें व पूर्वेचें तें प्रवेश-द्वार असल्यानें त्यावरील सत्ता सोडण्यास इंग्लंड कदापि कबूल होत नाहीं. १८७८ सालीं सायप्रस बेट इंग्लंडनें तुर्कांच्या ताब्यांतून घेतलें. मात्र त्याचा कायदेशीर ताबा इंग्लंडनें १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें घेतला. आरमारी ठाणें म्हणून सायप्रसचें महत्त्व इंग्लंडाला फार मोठें आहे.

१८७५ सालापर्यंत आफ्रिकेचा दहावा हिस्सा कांहीं परराष्ट्रांच्या वर्चस्वाखालीं नव्हता. पण आतां १ कोटि १५ लाख चौरस मैलांचा टापू गोऱ्या राष्ट्रांनीं बळकावलेला आहे. इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, पोर्तुगाल, इटाली व स्पेन या सहा राष्ट्रांनीं आफ्रिकेंतील खनिज संपत्तीची लूट चालविली आहे.

ब्रिटिश साम्राज्याचा एवढा विस्तार लहानशा इंग्लंडांतून कसकसा होत गेला हें कांहीं ठळक घटनांवरून लक्षांत येण्यासारखें आहे. १७०७ सालीं इंग्लंडनें स्कॉटलंडला जोडून घेतलें व त्यामुळें ' संयुक्त राज्य ' ( United Kingdom ) अस्तित्वांत आलें. त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं, १८०१ मध्यें आयर्लंडची पार्लमेंट रद्द करण्यांत आली आणि ' ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड ' या नांवाचा देश नांदूं लागला. पण आयर्लंडनें जिवावर उदार होऊन आपल्या २६ प्रांतांना ( Counties ) स्वायत्त वसाहतींचा दर्जा १९२२ त मिळवून घेतला आणि ' आयरिश फ्री स्टेट 'जन्मास आलें. या योगानें आतां आयर्लंडमधील उत्तरेकडील ६ प्रांतांचा(Counties) चा अल्स्टर हा भाग आणि इंग्लंड, वेल्स व स्कॉटलंड एवढा प्रदेश 'युनायटेड किंग्डम्' मध्यें मोडतो. याच वटबीजांतून जगड्व्याळ साम्राज्याचा विकास झालेला आहे. सुमारें शंभरपट मोठा भूप्रदेश व दसपट मोठी

लोकसंख्या यावर इंग्लंड आज अधिराज्य चालवीत आहे. सर्व जगाची लोकसंख्या १९३७ सालीं २०९ कोटि ५० लक्ष होती. आणि राजकीय दृष्ट्या अस्तित्व असलेला भूभाग ५ कोटी ७५ लाख चौरस मैल होता. यांपकीं एकतृतीयांश भूप्रदेश य एकचतुर्थांश लोकसंख्या ब्रिटिश साम्राज्यांत मोडतें. एवढें प्रचंड स्वरुप ब्रिटिश साम्राज्याला पुढील क्रमानें प्राप्त झालें आहे.

| सन | भूप्रदेश ( चौ. मैल ) | | लोकवस्ती | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| १८७५ | ० | ८५ | २८ | ५० |
| १९३० | १ | ८१ | ४८ | ४६ |
| १९३८ | १ | ८० | ५१ | ४९ |

१८७५ ते १९१४ या कालांत ४० लाख चौरस मौलांचा टापू ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला व १९१८ नंतर महायुद्धाचा प्रसार म्हणून ८५ लाख लोकवस्तीचा प्रांत त्याच्या ताब्यांत गेला. १९१४ सालीं कोणत्या देशाच्या ताब्यांत किती प्रदेश होता हें लोकसंख्येच्या प्रमाणावरून पुढें दिलें आहे.

## लोकसंख्या

| देश | मूळ देश | | वसाहती | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| इंग्लंड | ४ | ६० | ३९ | ३० |
| रशिया | १३ | ६० | ३ | ३० |
| फ्रान्स | ३ | ९० | ५ | ५० |
| जर्मनी | ६ | ४० | १ | २० |
| अमेरिका | ९ | ७० | ० | ९० |
| जपान | ५ | ३० | १ | ९० |

महायुद्धानंतर तर दोस्त राष्ट्रांचीं पोटें तुडुंब भरलीं. एकट्या इंग्लंडला 'संरक्षण–समीक्षण' इत्यादि नांवांनीं ८० लाख चौरस मैलांचा प्रदेश बळकावतां आला !

नगर बाचनालय सातारा
संगणकीकृत


१८७० ते १९०० या तीस वर्षांत किती लोकवस्तीचा भूभाग युरोपांतील राष्ट्रांनीं आपल्या घशाखालीं घातला हें पुढील आंकडे सांगतात.

| देश | चौरस मैल | | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष | हजार | कोटी | लक्ष |
| इंग्लंड | ४७ | ५४ | ८ | ८० |
| फ्रान्स | ३५ | ८३ | ३ | ६५ |
| जर्मनी | १० | २६ | १ | ६६ |

हा प्रदेश युद्धाचे नगारे न वाजवितां शांत रीतीनें जिंकण्यांत आला हें विशेष. आपापसांत संगनमत करून गुपचूपपणें जगाचें शोषण करणारी ही टोळी महायुद्धाचे वेळीं फुटली.

राज्यशासनाच्या दृष्टीनें साम्राज्याच्या या घटकांमध्यें एक प्रकारचें ' चातुर्वर्ण्य ' आढळतें. इंग्लंड—किवा युनायटेड किंग्डम्–यांमध्यें संपूर्ण स्वायत्ततेचा उच्च 'वर्ण' आहे, स्वतंत्र वसाहती–किंवा Dominions —यांना स्वायत्तता परिपूर्ण असली तरी बादशहाशीं एकनिष्ठ रहाण्याचें बंधन आहे. हिंदुस्थानासारख्या अंकित देशांना ( Dependencies ) अंतर्गत स्वातंत्र्यहि मर्यादित स्वरूपांत दिलेलें आणि सीलोन वगैरे बादशाही वसाहती—Crown Colonies—यांचा चौथा वर्ण. आज्ञापित ( Mandated ) प्रदेश हे ब्रिटिश साम्राज्याचे वास्तविक घटक नव्हत, त्यांचें 'पालकत्व' ब्रिटिश साम्राज्याकडे तात्पुरतें आलेलें. वरील चार ' वर्णांपैकीं ' कोणत्याहि वर्णाचा प्रदेश स्वतःच्या सामर्थ्यानें व तपःसिद्धीनें वरच्या वर्णांत प्रवेश करूं शकतो. आयर्लंडचा वाढत्या अधिकाराचा इतिहास म्हणजे राजर्षीचा ब्रह्मर्षि झालेल्या विश्वामित्राच्या वर्णांतरासारखाच आहे. ही वर्ण-व्यवस्था ' गुणकर्मविभागशः ' झालेली आहे.

जो जो प्रदेश ब्रिटिशांनीं जिंकला वा जोडला, त्याला सपाट करून गुलामगिरीच्याच पातळीवर ठेवण्याचें साम्राज्यशाही धोरण ब्रिटिशांनीं सर्वत्र चालविलें; पण जेथील प्रजाजनांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची लालसा अनावर व मनगटांत ती पुरी करण्याची शक्ति जबर होती; त्यांचेवरील आपल्या दडपणाचा, जरूर तो एक एक थर ब्रिटिश सरकार, अपरिहार्य झालें तेव्हां,

उचलीत गेलें. अडचणींत आलें, तेव्हां ब्रिटिश सरकारानें कांहीं देशांना राज्याधिकार दिले; पण पुनः मोकळे होतांच ते काढून घेऊन त्या देशाच्या प्रगतीचे काटे मागेहि सारले.आपखुषीनें व कर्तव्यबुद्धीनें ज्याचे त्याला राज्याधिकार देण्याचें औदार्य व सरलत्व इंग्रजांनीं कोणाशींहि व केव्हांहि आचरिलें नाहीं—मग ते आपल्या हाडामांसाचे अमेरिकन असोत कीं उशाशीं बसलेले आयरिश असोत. An Englishman never acts generously हेंच त्यांचें स्तुतिस्तोत्र होऊन बसलें आहे. सव्वा लाख चौरस मैलांचा व सव्वा कोटि लोकवस्तीचा फिलिपाईन्स देश आपल्या ताब्यांत पस्तीस वर्षें असतांना व तो तसा ठेवण्याचें सामर्थ्य अंगीं असतांना, अमेरिकेनें त्या देशाला १९३५सालीं स्वातंत्र्य बहाल केलें आणि फिलिपाइन्समधील लोकांच्या सोईसाठींच दहा वर्षानंतर आपला संबंध निःशेषपणें सोडण्याचें मान्य केलें, असें स्वातंत्र्य-प्रेम व उदार-वृत्ति इंग्लंडच्या इतिहासांत एकदाहि प्रगट झालेली आढळावयाची नाहीं. खुद्द इंग्लंडच्या जनतेला ज्याप्रमाणें स्वतःसाठीं अधिकार संपादन करण्याचे कामीं संगिनीच्या पहाऱ्यांत एका राजाला पकडून त्याचेकडून महाशासन ( Magna Charta ) लिहवून घ्यावें लागलें किंवा दुसऱ्या एका राजाचा तर शिरच्छेदच करावा लागला; तसेच कष्ट, आपत्ति व अडचणी इतर देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्गांत इंग्रजलोक पेरीत आहेत. त्यांतूनहि कोणकोणत्या राष्ट्रांनीं स्वातंत्र्यमंदिराकडे कसकशी व कोठवर मजल मारली आहे याचे कांहीं नमुने आतां पाहूं.

**अमेरिका**—आज साऱ्या जगाचा सावकार व सूत्रधार बनलेला हा देश इंग्लंडच्या टांचेखालीं चिरडला जात होता हें केवढें आश्चर्य! १६२० सालीं ' मे-फ्लॉवर ' या गलबतांतून शंभर इंग्रज माणसें इंग्लंडचा किनारा सोडून अमेरिकेस गेलीं व त्यांनीं तेथें आपलें राज्य स्थापलें. ' हिंदुस्थानांतील साम्राज्य-संस्थापक ' या पदवीला पोंचलेल्या क्लाइव्हसारखे हे लोक लुचे ( ' Swindler ' ) किंवा उनाडटप्पू नव्हते. इंग्लंडांतील सतराव्या शतकामधील धर्मच्छल सोसवेना म्हणून स्वधर्मरक्षणासाठीं स्वदेशत्याग करणारे हे ध्येयनिष्ठ ( प्युरिटन ) लोक होते. इंग्लंडांतील वाढत्या लोकसंख्येमुळें फेकले गेलेले किंवा सोनें-हिरे वगैरे

वा. क्र. ... ग्रं. क्र. ...

खाणींच्या वा मसाल्याच्या व्यापाराच्या वासावर निघालेले हे भुकेकंगाल, पोटभरू इसम नव्हते. धर्मस्वातंत्र्यासाठीं मायभूमीचाहि ज्यांनीं त्याग केला, त्यांना राजकीय स्वातंत्र्यहि किती प्रिय असेल हें सांगावयास नको. मायदेशाचा ळळा म्हणून त्यांनीं आपल्या नव्या देशांत न्यू इंग्लंड, न्यू यॉर्क अशीं इंग्लंडची स्मृति देणारींच नांवें ठेवलीं. नुसतीं नांवेंच घेतलीं असें नव्हे तर इंग्लंडला कर-भार पोंचविण्याची जोखीमहि घेतली. पण इंग्लंडच्या तक्तावर तिसरा जॉर्ज असतांना त्या स्वातंत्र्यप्रिय लोकांवर आर्थिक जुलूम होऊं लागला. आपल्या मताविरुद्ध असह्य कराचा बोजा सोसण्यास त्यांचें उमदें मन तयार होईना. ज्या राज्यसंस्थेंत आपले प्रतिनिधि नाहींत तिनें बसविलेल्या कराला मान वाकवावयाची नाहीं असा त्यांनीं निर्धार केला. इंग्लंडनें त्यांचेवर ' स्टँप डयूटी ' बसविली असतां ती न देऊन कर-बंदीचें शस्त्र त्यांनीं उपसलें. या चळवळीचें त्यांचें सूत्र

**' ना कार-भार; ना कर-भार '**

No Taxation without Representation हें होतें. पण फुसकें तत्त्वज्ञान कोण ऐकतो ? पुढें पोलादी फाळ नसलेला बाण आणि मागें संघटित शक्ति नसलेलें तत्त्व– दोहोंचा परिणाम सारखाच. गुरुत्वाकर्षणाचा नियम जितका अबाधित; तितकाच दंडनीतीचाहि नियम निरपवाद आहे असें क्रांतिशास्त्रज्ञ सांगतात.* हें मत भावी इतिहासांत खोटें पडो वा न पडो, पण अमेरिकन लोकांना तरी त्याची प्रचीति आली.

' खाविंदांचें चरणीं ' अशी नम्रतेची भाषा वापरून आपल्या न्याय्य हक्काची मागणी त्यांनीं इंग्लंडच्या बादशहाकडे केली असतां ती फेटाळण्यांत आली. त्यामुळें सारे अमेरिकन प्रक्षुब्ध झाले आधींच त्यांचेवर व्यापारी निर्बंधाचे पाश करकचून आवळण्यांत आले होते. त्यांत नवीन जुलमी कराची व दडपशाहीच्या कायद्याची भर पडली. वसाहतींत कोठूनहि माल आला तरी तो प्रथम इंग्लंडमध्यें गेला पाहिजे व तेथें त्यावर कर

* A disbelief in violence is equivalent to a disbelief in gravitation. —*Trotsky*.

दिला पाहिजे, इंग्लिश जहाजांतूनच सर्व वहातूक झाली पाहिजे, विशिष्ट जिन्नस वसाहतींनीं तयार करूंच नयेत असे निर्बंध अमेरिकेवर इंग्लंडनें घातले होते. आर्थिक आंचीमुळें लोकांचीं मनें पेटलीं होतीं आणि त्यांत स्टँप ॲक्टाचें तेल पडलें. वसाहतींतील खरदीखते, करारनामे वगैरे दस्तऐवज इंग्लडच्या स्टँपकागदावरच नोंदले पाहिजेत अशी सक्ती या कायद्यानें करण्यांत आली. तिचा निषेध करून अमेरिकन लोकांनीं 'ना कार-भार, ना कर-भार' या तत्त्वाची घोषणा केली; तर 'वसाहतीसंबंधीं कोणताहि कायदा करण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटास आहे' असा 'डिक्लेरेटरी ॲक्ट' मंजूर करून अमेरिकन लोकांच्या नसांतील स्वातंत्र्य-प्रिय रक्त इंग्लंडनें अधिकच तापविलें..

या प्रक्षोभाचें प्रतीक म्हणून चहावरील कर न देण्याचें त्यांनीं ठरविलें. तेव्हां इंग्लंडनें त्यांची समजावणी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतून ईस्टइंडिया कंपनीनें पाठविलेलीं चहाचीं गलबतें अमेरिकेकडे पाठवलीं. त्यावर इंग्लंडनें जकात घेतलेली नसल्यानें तो चहा अमेरिकनास आर्थिक दृष्ट्या स्वस्त पडला असता, पण राजकीय दृष्ट्या तो महाग पडेल हें जाणून दोनशें अमेरिकन लोकांनीं १७७३ सालीं रेड इंडियनांचा पोषाक करून रात्रीं चहाच्या गलबतावर चढून बोस्टन बंदरांतून तो तीन लाख रुपये किंमतीचा सारा चहा समुद्रांत फेंकला. म. गांधींच्या स्वातंत्र्य पथकानें दांडी येथें मीठ उचलणें आणि अमेरिकन लोकांनीं बोस्टन येथें चहा ओतणें हीं दोनहि लोक–प्रक्षोभाचीं सारखींच प्रतीकें होत. कमींत कमी मागणी मांडावी व तिच्यावर जास्तींत जास्ती शक्ति खर्च करावी या म. गांधींच्या धोरणाचाहि दाखला अमेरिकेच्या स्वातंत्र्य–युद्धांत पहावयास मिळतो. स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्याचे थोडे आधीं '१७७४सालीं वाशिंग्टन यानें जाहीर केलें कीं, उत्तर अमेरिकेंतील कोणताहि विचारी माणूस पूर्ण स्वातंत्र्याची इच्छा करीत नाहीं. 'स्वातंत्र्याचें सारसर्वस्व' (Substance of Independance) म्हणून म. गांधींनीं आपली मागणी कमी करण्यांतील इंगित वरील उद्गारांत दिसून येतें. गंमत ही कीं, ती घोषणा करणारा वॉशिंग्टन हाच १७८८ सालीं अमेरिकन रिपब्लिकचा पहिला अध्यक्ष झाला! इतिहासाला पुनरा-

वृत्ति करण्याची हौस आहे म्हणतात !!

स्वातंत्र्य-युद्ध पुकारलें तेव्हां अमेरिकेची लोकवस्ती फक्त ४० लाख होती. त्या अमेरिकनांजवळ सैन्यहि नव्हतें. एकी म्हणावी तर, युद्ध सुरू झाल्यावरहि कलोनिअल कॉंग्रेसमधील ४६ सभासदांनीं तिसऱ्या जॉर्जकडे नम्रतेचा खलिता ( Olive Branch Petition ) पाठवून अंतर्गत स्वायत्ततेची मागणी केली. पण साम्राज्य-सत्ता ही चीजच अशी आहे कीं, तिला आपला एक अधिकार देणें म्हणजे एक प्राण देणें असें वाटतें आणि त्या भ्रमांत राहून तिला शेवटीं पांचहि प्राण गमवावे लागतात. वरील खलिता पाठवून वर्ष होण्याचे आंतच २५ सभासदांनीं इतिहासप्रसिद्ध "स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्या" वर सह्या केल्या. ता. ४ जुलै १७७६ रोजीं प्रसिद्ध झालेल्या राजीनाम्यांत पुढील सिद्धांतप्राय वचन आहे.

"Men are created equal (and have right to) assure amongst the powers of the earth the separate and equal station to which the Laws of Nature and Nature's God entitle them."

या जाहीरनाम्यानंतर सहा वर्षांनीं १७८२ सालीं युद्धाची समाप्ति झाली, अमेरिका फत्ते झाली व स्वतंत्रता दृढमूल झाली. केवळ स्वार्थामुळें व दुराग्रहामुळें इंग्लंडनें आपल्या हाडामांसाची अमेरिका हातांतून गमावली.

आयर्लंड—अमेरिकेसारखेंच सक्रिय स्वातंत्र्यप्रेम इंग्लंडच्या या शेजाऱ्यानें दाखविलें आहे. गेलीं चार शतकें इंग्लंडशीं सतत निकरानें लढून या देशानें आतां संपूर्ण स्वातंत्र्य मिळविलें आहे. १४९४ सालीं सातव्या हेन्रीनें आयरिश राज्यकारभार इंग्लंडच्या ताब्यांत आणला, तेव्हांपासून तेथें स्वातंत्र्याचा झगडा सनदशीर–बेसनदशीर, अर्ज–विनवण्यांनीं व व अत्याचारांनीं चालू होता. "इंग्लंडच्या गरजा, येती आमच्या काजा"* हें धोरण त्यांनीं आपल्या चळवळीचें ठेवलें होतें. अठराव्या शतकांत अमेरिकेच्या स्वातंत्र्य-युद्धांत इंग्लंड अडकलेलें पाहून आयर्लंडांत स्वयंसेवकांचीं पथकें उभारण्यांत आलीं. त्याचें फल म्हणजे १७८२मध्यें आयरिश पार्लमेंट स्वतंत्र झाली. स्पेन, फ्रान्स वगैरे देशांतील सैन्यांत दाखल

* England's difficulties are our opportunities.

होऊन आयरिश तरुणांनीं इंग्रजांना पराभवाची धूळ चारली. अठराव्या शतकाचे अखेरीस आयर्लंडनें बंड केलें व १८०० सालीं स्वतंत्र आयरिश पार्लमेंट मोडून त्याचें इंग्लिश पार्लमेंटशीं एकीकरण करण्यांत आलें. त्यामुळें युनियन जॅक या निशाणामध्यें आयरिश संत सेंट पॅट्रिक याचा क्रॉस घालण्यांत आला व पार्लमेंटमध्यें सभासद निवडून पाठविण्याचा हक्क मिळाला. पण या एकीकरणाचे फायदे आयर्लंडच्या पदरांत पडूं न देण्यासाठीं इंग्लंडनें वचनभंगहि केला. त्यामुळें १८३४ पासून एकीकरण रद्द करून घेण्याची चळवळ सुरू झाली. १८७० सालीं डब्लिन येथें 'होमरूल लीग' स्थापन झाली. या संस्थेचें नांव आपल्या चळवळीला देऊं नये असा 'पोक्त' सल्ला कांहीं लोकांनीं लोकमान्य टिळकांना दिला होता म्हणतात! आयरिश सभासदांनीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें विरोधाचें पद्धतशीर धोरण चालविल्यामुळें व त्याला आयर्लंडमधील उग्र चळवळीचें पाठबळ मिळाल्यामुळें अनेक ब्रिटिश मंत्रिमंडळें गडगडलीं. ग्लॅडस्टननें होमरूल बिल दोनदां मांडलें, पण तें प्रथम १८८६ सालीं कॉमन्स सभेंत व दुसऱ्या खेपेस १८९३ सालीं लॉर्डांच्या सभेंत फेटाळण्यांत आलें. १९१२ मध्यें मात्र आस्किथ यांनीं तें बिल कॉमन्स सभेंत मंजूर झाल्यावर लार्डांच्या विरोधास न जुमानतां १९१४ मध्यें राजाची संमति मिळवून कायद्याच्या पदास पोंचविलें. पण दुर्दैव असें कीं, याचवेळीं महायुद्ध सुरू झाल्यानें त्या बिलाची अंमलबजावणी झाली नाहीं.

साम्राज्यावरील महायुद्धाच्या संकटाचा फायदा घेऊन 'सिनफेन' (आमचे आम्हीं) या पक्षानें सशस्त्र चळवळीचा धूमधडाका उडविला. ती चळवळ मोडून काढण्यासाठीं 'ब्लॅक अँड टॅन्स' नांवाच्या ब्रिटिश सैन्यानें तेथें अनन्वित अत्याचार केले. १९१९च्या निवडणुकींत सिनफेन पक्ष प्रबळ झाला व १९२० सालीं अल्स्टरचा वेगळा भाग करून बाकीच्या आयर्लंडला 'होमरूल' देण्यांत आलें. फाशीच्या वाटेवर पावलें टाकीत असलेला डी व्हॅलेरा यानें १९३३ सालीं 'आयरिश फ्रीस्टेटच्या' अध्यक्षपदावर पाऊल ठेवल्यापासून राजनिष्ठेची शपथ रद्द केली, जमिनीवरील खंडणी बंद केली, गव्हर्नर जनरलची जागा खलास केली व राजाचें नांवहि अंत-

-र्गत कारभारांतून वगळलें. आतां अल्स्टरहि जोडून घेऊन आयर्लंडची ' फाळणी ' रद्द करून पारतंत्र्याचे सर्व पाश तोडून टाकण्याच्या तयारींत तो आहे. ' आयरिश फ्री स्टेट 'च्या करारनाम्यांत महत्त्वाचें वाक्य असें आहे:—

' सर्व कायदेशीर हक्क प्रजेला परमेश्वरापासून प्राप्त झाले आहेत. '

या विधानांत वरवर दिसतो तसा वेदांत भरलेला नाहीं. त्याचा ध्वन्यर्थ व मुख्यार्थ हाच आहे कीं, सर्व अधिकारांचें उगमस्थान आयरिश लोकच होत, साम्राज्याचे पार्लमेंट नव्हे. आयर्लंडचें निशाण, नाणें, तिकिटें सर्व कांहीं पृथक् आहेत. हाकेच्या अंतरावर असलेल्या व आपल्या धर्माचे व संस्कृतीचे बांधव असलेल्या आयरिश प्रजेला स्वराज्य मिळविण्यास इंग्लंडनें शतकानुशतकें रक्ताच्या नद्या वहावयास लावलें हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे इंग्लंडची मनोवृत्ति कशी आहे व त्याचेपासून स्वातंत्र्य मिळणें किती सुलभ आहे याची कल्पना येते.

**कॅनडा**—दि हडसन् बे कंपनी १६७० सालीं स्थापन होऊन कॅनडांत गेली आणि हिंदुस्थानांतील ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणेंच आधीं आलेल्या फ्रेंच लोकांशीं झुंजून–झगडून तिनें आपलें जाळें पसरलें. बरोबर दोनशें वर्षांनीं म्हणजे १८७० मध्यें ती कंपनी विकत घेण्यांत आली. १८७१ मध्यें जबाबदार राज्यपद्धति देण्यांत आली. ' रिफॉर्म पार्टीनें ' विधिमंडळांत विरोधी धोरणाचा मारा चालू ठेवला व त्याचें पर्यवसान बंडांत झालें. १८९५ मध्यें कॅनडाची स्वायत्त वसाहत ( Dominion ) बनली. तिचे नऊ प्रांत पाडण्यांत आले असून त्यांपैकीं प्रत्येकाला स्वतंत्र पार्लमेंट व स्वतंत्र राज्यव्यवस्था आहे. प्रांताप्रांताला मताधिकाराचें क्षेत्र बदलत जातें. कित्येक प्रांतांत तर फ्रेंच सिव्हिल लॉ चालू आहे. त्या प्रांतांतील माणसालाच लेफ्टनंट गव्हर्नर नेमण्यांत येतें. त्याची नेमणूक गव्हर्नर–जनरल इन् कौन्सिल करतो. सर्व वसाहतीची एक " पार्लमेंट " असून तिचें सीनेट व लोकसभा असे भाग आहेत. कॅनडानें प्रथम जेव्हां संरक्षक जकातीची भिंत उभी केली, तेव्हां त्याविरुद्ध इंग्लंडमध्यें खूप गवगवा झाला. पण त्याला कॅनडानें रोखठोक उत्तर दिलें कीं, " आमच्या प्रजेच्या

आकांक्षापेक्षां साम्राज्याच्या गरजा मोठ्या मानावयाच्या म्हणजे स्वराज्याचें मूळच खणून काढण्यासारखें आहे." साम्राज्यानें पुकारलेल्या युद्धांत भाग घ्यावयाचा कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार कॅनडानें संपादन केलेला आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी डयूक ऑफ कॅनॉट हे राजघराण्यांतील पुरुष गव्हर्नर जनरलचे जागेवर होते. कॅनडाची वस्ती १९११ सालीं ७२ लाख होती, ती आतां १ कोटी ११ लाखावर गेली असून तेथील सरकारचें सालीना उत्पन्न १० कोटी ५९ लाख पौंड आहे.

**ऑस्ट्रेलियाः**–मुबलक प्रदेश पण तुरळक वस्ती हें या देशाचें वैशिष्ट्य आहे. एका चौरस मैलांत दोन माणसें इतकी विरल लोकवस्ती आहे. 'खास गोऱ्यासाठीं' ही वसाहत राखून ठेवण्यांत आली आहे. शं. ९७ वस्ती ब्रिटिशांची आहे. १८९२ सालीं न्यू साउथ वेल्स या भागाला जें कायदे–मंडळ देण्यांत आलें त्यांत लोकनियुक्त सभासदांचीच बहुसंख्या होती. इतर भागांनाहि हळुहळू स्वायत्तता देण्यांत येऊन १९०१ सालीं स्वायत्त भागांचें फेडरेशन स्थापण्यांत आलें. १९३४ सालीं पश्चिम ऑस्ट्रेलिया या भागानें ब्रिटिश पार्लमेंटकडे या फेडरेशनमधून विभक्त होण्यासाठीं अर्ज केला. सध्यांच्या बादशहांचे बंधु डयूक ऑफ केंट हे गव्हर्नर जनरल आहेत.

ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या १९११ सालीं ४४ लाख २५ हजार होती, ती आतां ६८ लाख ६६ हजार झाली आहे व तेथील सरकारचें वार्षिक उत्पन्न १९ कोटी १९ लक्ष पौंड आहे. खुद्द युनायटेड किंग्डमचें उत्पन्न ९४ कोटि पौंडांवर आहे व त्याचे खालोखाल या चिमुकल्या बेटाचें उत्पन्न आहे यावरून तेथील प्रत्येक माणसाची संपन्नता किती मोठी आहे हें दिसून येतें.

**न्यूफाउंडलंडः**—ब्रिटिशांच्या सर्वांत जुन्या अशा या वसाहतीचा शोध कॅबट यानें १४९७ त लावला. तिच्यावर इंग्लंडचें निशाण फडकविल्याबद्दल सातव्या हेन्रीनें त्याला दहा पौंड बक्षिस दिलें. १८३२ त प्रातिनिधक व १८५३ त जबाबदार राज्यपद्धति सुरू झाली. १९३३ सालीं बादशाही कमिशन नेमण्यांत आलें. त्यानें केलेल्या शिफारशीप्रमाणें राज्य-

घटना देण्यांत आली. इंग्लंडचे तीन व न्यूफाउंडलंडचे तीन अशा सहा सभासदांच्या कमिशनचा सल्ला घेऊन गव्हर्नर राज्यकारभार चालवितो. लोकनियुक्त प्रतिनिधींना या राज्यघटनेंत स्थान नाहीं. राष्ट्रसंघाचें सभासदत्वहि या वसाहतीला दिलेलें नाहीं. १९३० सालीं ५० लाख डॉलरांचें कर्ज या वसाहतीनें उभारलें व तें मिळालेंहि; पण पुढील वर्षींच ३० लाख डॉलरांचेंहि कर्ज उभें राहीना. ही आर्थिक नापत पाहून इंग्लंडनें पैसे पुरविले.

**माल्टा:**—हिंदुस्थानाशीं दळण-वळण कायम ठेवण्यासाठीं हें आरमारी ठाणें आपल्या हातीं असणें अवश्य आहे अशी खूणगांठ इंग्लंडनें मनाशीं बांधली आणि नेपोलियनशीं माल्टाच्या प्रजाजनांचा झगडा चालू असतां त्यांना साहाय्य केलें. परचक्रांतून मुक्त केल्याची बक्षिशी म्हणून इंग्लंडनें माल्टा आपल्या साम्राज्याला १८१४ सालीं जोडून घेतलें. यानंतर चारच वर्षांनीं संबंध हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याच्या घशाखालीं उतरला. १९२१ सालीं माल्टामध्यें लोकनियुक्त सभासदांचें कायदेमंडळ स्थापन करून इंग्लंडनें जबाबदार राज्यपद्धति सुरू केली पण १९३३ पासून ती रद्द करण्यांत आली.

**सीलोन:**—१७९६ सालीं सीलोनला मद्रासचा भाग म्हणून जोडण्यांत आलें; पण १८०२ मध्यें त्याला विभक्त करून 'बादशाही वसाहत' बनविण्यांत आलें. १९३१ सालीं लॉर्ड डूनोमोर यांनीं तयार केलेली नवी राज्यघटना देण्यांत आली. तिच्याअन्वयें प्रौढांना मताधिकार मिळाला व प्रातिनिधिक राज्यकारभारास प्रारंभ झाला. विशेष हें कीं, हिंदुस्थानांतल्याप्रमाणें जातवारीचें घातुक तत्त्व येथील राज्यघटनेंत समाविष्ट केलेलें नाहीं.

**ईजिप्त**—ईजिप्त हा पूर्वपश्चिमेचा दुवा ( Gateway between East and West ) आहे. इंग्लंडचा इजिप्तशीं संबंध एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस सुरू झाला असला; तरी साक्षात् संबंध असा गेल्या महायुद्धानंतरच प्रस्थापित झाला. लॉर्ड किचनेर यांनीं १८९८ त सुदान प्रांत जिंकला. फ्रान्स, इटाली, जर्मनी, बेल्जम, पोर्तुगाल व स्पेन या युरोपीय देशांनींहि आफ्रिकेचे एक एक घास करून गिळण्यास आगेमागें

प्रारंभ केला. फ्रान्सनें तर १९१४ सालीं त्याच्या स्वतःच्या वीसपट विस्तीर्ण मुलूख आफ्रिकेंत आपल्या ताब्यांत ठेविला होता आणि १९१८ नंतर आज्ञापित प्रदेश ' म्हणून आणखी भाग मांडीखालीं घालावयाला मिळाला तो निराळाच. फ्रेंचाशीं कधीं झगडून तर कधीं नमतें घेऊन पण इंग्रजांनीं इजिप्तमध्यें आपलें वर्चस्व स्थापिलें व तें १९०४ पर्यंत चाललें. त्या अवधींत त्यांनीं तेथील गुलामांचा व्यापार बंद केला. तेथील आर्थिक व्यवहारावर १९०४ पर्यंत आंतरराष्ट्रीय मंडळाचें नियंत्रण असे. तें १९०४ च्या अँग्लो–फ्रेंच तहानें दूर झालें. महायुद्धाच्या कालांत ईजिप्त हा ' संरक्षित-प्रदेश ठरविण्यांत आला. १९२२ त मिल्नर कमिशन इजिप्तमध्यें राजकीय सुधारणांची चौकशी करण्यासाठीं गेलें होतें पण त्याला, हिंदुस्थानांतील सायमन कमिशनप्रमाणेंच, बहिष्कार खात परत फिरावें लागलें. त्यानंतर ईजिप्तला मर्यादित राजकीय स्वातंत्र्य देण्याचें पोकळ औदार्य ब्रिटिश-साम्राज्यशाहीनें दाखविलें, पण त्यामुळें ईजिप्तमधील जनता संतुष्ट झाली नाहीं. तिनें चालविलेल्या निकराच्या चळवळीमुळें १९३६ सालीं इंग्लंडनें इजिप्तशीं तह करून त्याला बव्हंशीं पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे.

**आफ्रिका**— ' सुवर्णभूमि ' हें नांव धारण करणाऱ्या हिंदुस्थानावर युरोपीय राष्ट्रांनीं जर धाड घातली; तर प्रत्यक्ष सोन्याच्या व हिऱ्याच्याहि खाणींनीं संपन्न असलेली आफ्रिका त्यांच्या नजरेंतून कशी सुटावी? केप कॉलनी ही वसाहत ब्रिटिशांनीं १८०६ मध्यें स्थापन केली. तेथील ब्रिटिश गव्हर्नर व ब्रिटिश मिशनरी यांच्या दुष्कृत्यांमुळें तेथें आधींच स्थाईक झालेले डच शेतकरी–म्हणजेच बोअर–हे खूप खवळून गेले; आणि १८८० व १८९९ या दोन वर्षी त्यांनीं युद्ध पुकारून इंग्रजांना अनेकवार पराभवाची धूळ चारली. पण शेवटीं ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड वगैरे वसाहतींचें साहाय्य मिळाल्यानें १९०० सालीं इंग्रजांना बोअरांचा पराभव करतां आला व त्यांचें एकछत्री राज्य केप टाउनपासून कायरोपर्यंत चालू झालें. त्यानंतर बोअर लोकांनीं ' गनिमी कावा ' सुरू करून इंग्रजांना सळो का पळो करून सोडलें. त्यानें जेरीस येऊन इंग्रजांनीं १९०२ सालीं तह केला व ट्रॅन्सव्हाल आणि ऑरेंज फ्रीस्टेट या वसाहती आपल्या

साम्राज्याशीं जोडल्या. त्यांना १९०९ सालीं स्वराज्याचे अधिकार इंग्रजांनीं दिले. १९१० मध्यें केप कॉलनी, नाताळ, ट्रॅन्सव्हाल, व ऑरेंज फ्रीस्टेट यांचा मिळून ' दक्षिणआफ्रिका संघ ' (Union of South Africa) स्थापन झाला. त्या संघाचा मुख्य मंत्री बोअर लोकांचा पुढारी जनरल बोथा हा झाला.

१८८० सालीं स्थापन झालेल्या ' ईस्ट आफ्रिका कंपनी'नें हिंदुस्थानांतील ' ईस्ट इंडिया कंपनीच्या ' पावलावर पाऊल टाकून १८८५ सालीं पूर्व आफ्रिका हस्तगत करून घेतली. झांझीबार ही सध्यां गाजणारी ब्रिटिश वसाहत १८९१ मध्यें स्थापन झाली. पूर्व आफ्रिकेंतील युरोपियन रहिवाशांनीं जबाबदार पद्धतीची मागणी केली असतां १९२९ सालीं हिल्टन यंग कमिशननें चौकशी करून आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यांत संघ ( Union ) स्थापण्याचा काल अजून आला नाहीं, म्हणून हायकमिशनर नेमावा अशी मुख्य शिफारस केली होती. त्यानंतर जॉइंट कमिटी नेमली गेली व संयुक्त परिषद् भरली. पण संघ स्थापण्याचें जमलें नाहीं. प्रत्येक भागाचा कारभार गव्हर्नर पृथक्पणें पहात असतो व केनिया, टांगानिका व युगांडा यांचे गव्हर्नर दरसाल एकत्र जमून विचार–विनिमय करतात. केनियामध्यें ४० हजार हिंदी लोक असून १७००० गोरे आहेत. पण खास गोऱ्यासाठीं चांगला प्रदेश राखून ठेवलेला असल्यामुळें तेथील हिंदी प्रजेच्या हृदयांत गोऱ्यांचें वास्तव्य हें शल्यच होऊन राहिलें आहे. १९३१ सालापासून कांहीं जमिनींत सोन्याच्या खाणी लागल्या. तेथील हिंदी लोकांची तेथून उचलबांगडी करण्यांत आली.

पश्चिम आफ्रिकेची हवा युरोपियनांना मानवतच नसल्यानें त्यांचा उपद्रव तेथील रहिवाश्यांना होत नाहीं. १९२० सालीं, हिंदुस्थानांतील राष्ट्रसभेप्रमाणें, तेथें ' नॅशनल कॉंग्रेस ऑफ ब्रिटिश वेस्ट आफ्रिका ' या नांवाची संस्था स्थापन झाली असून ती राजकीय हक्कासाठीं मागणी करीत आहे. त्याचा परिणाम म्हणून, कायदेमंडळांत व सिव्हिल सर्व्हिसमध्यें त्यांना थोडथोडा प्रवेश मिळूं लागला आहे.

---

# ३

# हिंदुस्थानावरील स्वामित्व

" So small a European dog will not be capable indefinitely of wagging so very large an Indian tail. —*Leonard Barnes.*

ब्रिटिश साम्राज्याच्या कमानींतील ' मधला चिरा ' जर कोणता असेल तर तो म्हणजे हिंदुस्थान.* ' साम्राज्याचें हृदय ' या संज्ञेनें एका लेखकानें हिंदुस्थानचें वर्णन केलें आहे. आणि याचें कारण एकच आहे. तें म्हणजे इंग्लंडचें जीवित व्यापारावर अवलंबून आहे व तो व्यापार मुख्यतः हिंदुस्थानच्याच जीवावर चालतो. इंग्लंडच्या पक्क्या मालाचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक व कच्च्या मालाचें सर्वांत मोठें कूळ अशी भूमिका हिंदुस्थानाची आहे. म्हणूनच त्याला " बादशहाच्या मुकुटांतील सर्वांत तेजस्वी रत्न " ( The Brightest Jewel in the Crown ) असें म्हटलें जातें. इंग्लंडांतील प्रत्येक पौंडाचें पोट फाडलें तर, साप चिरल्यानंतर त्याच्या पोटांत दिसणाऱ्या बेडकीप्रमाणें, त्यांत हिंदुस्थानचे ४ शिलिंग आढळतील ! इंग्लंडचें सुमारें चतकोर पोट हिंदुस्थानच्या शिदोरीवर भरत आहे. ४० कोटि पौंडांचें भांडवल ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत मुरविलें आहे. त्याचें व्याज आणि विमा, पेढ्या, जहाजवहातूक वगैरेंचें उत्पन्न या दोन साध-

---

* The principal condition of the strength of the British throne is the possession of the Indian Empire.

—*Lord Curzon in Delhi Durbar*

नांनींच इंग्लंड हिंदुस्थानांतून दरसाल १० कोटि पौंड लुबाडीत आहे. इंग्लंडांतून निर्यात होणाऱ्या मालपैकीं ५२ कोटि ९४ लाख पौंड किंमतीचा माल १९३० सालीं हिंदुस्थानानें घेतला व इंग्लंडच्या गिऱ्हाईकांचे यादींत पहिलें स्थान पटकावलें! इंग्लंडच्या व्यापारापैकीं शें. १०$\frac{3}{4}$ निर्यात माल हिंदुस्थान विकत घेतो आणि इंग्लंडमध्यें आयात होणाऱ्या मालपैकीं शें. ४$\frac{1}{2}$ हिस्सा हिंदुस्थानापासून इंग्लंडला मिळतो. हिंदुस्थानाचा कच्चा माल घेऊन आपला पक्का माल त्याला देण्याचा 'घटोत्कची' बाजार इंग्लंडनें मांडलेला आहे व त्यावर तें एकसारखें गब्बर होत आहे.

लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तरी, ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानच अग्रस्थान पटकावतो. साम्राज्यांतील सुमारें पाऊणपट लोकवस्ती एकट्या हिंदुस्थानांत सामावलेली आहे; फार काय पण, गेल्या पन्नास वर्षांत हिंदुस्थानाच्या लोकसंख्येंत जी वाढ झाली आहे, ती साम्राज्यांतील साऱ्या गोऱ्या प्रजेपेक्षां अधिक आहे. म्हणूनच 'इंग्रजी कुत्र्याला फार वेळ झेपणार नाहीं एवढें प्रचंड हें हिंदी शेपूट आहे' असें म्हटलें जातें. एका विनोदी लेखकानें तर असें भविष्य वर्तविलें आहे कीं, ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें 'साम्राज्य' हा विषमता-दर्शक शब्द वापरावयाचा नाहीं! हिंदुस्थानाला बरोबरीचा दर्जा मिळाला म्हणजे बहुसंख्येच्या बळावर त्याला 'इंडियन कॉमनवेल्थ' चेंच स्वरूप येईल! ऑस्ट्रेलियाची किंवा कॅनडाची वस्ती पाहिली तर प्रत्येकीं एक कोटीच्या आसपास; आणि न्यूझीलंडमधील लोकसंख्या तर कलकत्ता शहराएवढीच. न्यूफाउंडलंड, ऱ्होडेशिया वगैरे देश-देश कसले? शहरेंच तीं! साठ वर्षांपूर्वी कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूफाउंडलंड व न्यूझीलंड या चारी वसाहतींची लोकसंख्या अवघी साठ लाख होती! हिंदुस्थानाच्या एका प्रांतापेक्षां अधिक लोकसंख्या बाळगणारा एकहि घटक साम्राज्यांत नाहीं.

हिंदुस्थानांतील कोट्यवधि प्रजा आपल्या अंकित ठेवण्यांत इंग्लंडचा व्यापाराच्या दृष्टीनें जसा फायदा आहे, किंबहुना त्याचें जीवनच जसें अवलंबून आहे; त्याचप्रमाणें सैन्याचा पुरवठा करण्यालाहि हिंदी प्रजा इंग्लंडला उपयोगी पडण्यासारखी आहे. (The only consider-

able reserve of active troops in the Empire is in India) रक्षण व पोषण अशा उभय रीतींनीं हिंदुस्थानावरील स्वामित्व इंग्लंडला उपकारक आहे. हें जाणूनच इंग्रज इतिहासकार स्वच्छ लिहितात कीं, हिंदुस्थान कबजांत ठेवण्यासाठीं कितीहि प्रयत्न केले, कितीहि कष्ट सोसले तरी ते थोडेच होतील. §

हिंदुस्थानचें आर्थिक शोषण हेंच ब्रिटिश साम्राज्याचें मुख्य चरितार्थ साधन आहे. हिंदुस्थानच्या जीवावर इंग्लंडचा व्यापार चालण्याचें बंद झालें; तर इंग्लंडला जीवंत रहाणेंच कठीण होऊन बसेल. इंग्लंडला लागणाऱ्या खाद्य पदार्थांपैकीं शें.६० परदेशांतून येतात; म्हणजे इतर देशांनीं बहिष्कार टाकला तर इंग्रज लोकांना दोन वेळां जेवून राहणेंहि मुष्कील होईल. हिंदुस्थानांत इंग्रज आले ते तागडी घेऊनच. पुढें प्रसंग साधून त्यांनीं तरवार हातीं घेतली व तक्त गांठलें तरी तेंहि आपली तागडी शाबूत रहावी म्हणूनच. अगदीं ईस्ट इंडिया कंपनीच्या नियमापासून परवाच्या १९३५ च्या घटनाकायद्यापर्यंत इंग्रजांचें धोरण पाहिलें तर, आपला व्यापार सुरक्षित ठेवणें हें त्यांतील आद्यतत्त्व असल्याचें दिसून येईल. व त्यासाठीं येथील कोष्टयांना आपले आंगठे तोडावयास भाग पाडण्यापासून ब्रिटिश मालावर जादा जकात बसविण्याला बंदी करण्यापर्यंत सर्व क्रूर–सौम्य उपायांचा अवलंब केल्याचें आढळेल. अशा सूक्तासूक्त मार्गांनीं इंग्रज व्यापाऱ्यांनीं आपलें उखळ पांढरें करून घेण्याची परंपरा प्रारंभापासूनच पाडलेली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं तर लाचलुचपतीच्या द्वारेंहि लूटमार केलीच, तरी पण कंपनीला इतका फायदा झाला कीं, तिच्या शेअरची किंमत दुप्पट–तिपटीवर गेली. आश्चर्य हें कीं, न्यायाचा कैवार घेऊन पार्लमेंटांत जीभ मोकळी सोडणारे वाग्वीर, बर्क व फॉक्स, यांनीं २६३ पौंडास एक याप्रमाणें कंपनीचे क्लाइव्हच्या अन्यायानें विटाळलेले शेअर खरदी करण्यासाठीं आपापल्या थैल्यांचें तोंड आधीं मोकळें केलें होतें !

§ No effort, no sacrifice, has been considered too great to retain the splendid prize.

—*Cambridge Modern History.*

इंग्लंडची साम्राज्यशाही ही मुख्यतः वैश्य शाहीच आहे. हिंदुस्थानांतील धनधान्य लुटून आपल्या देशाला नेण्यांत इंग्लंडइतका अधाशीपणा आजवर कोणीच दाखविला नाहीं. इतिहासाकडे फार लांबवर नजर टाकली तरी, अलेक्झांडर, गझनीचा महमूद, तैमूरलंग, बाबर, नादिरशहा, अहमदशहा अबदाली अशा लोकांच्या स्वाऱ्या कितीहि क्रूरपणें झालेल्या असल्या; तरी त्यांचा ताप हिंदुस्थानला अल्पकाल सोसावा लागला आणि मोंगल बादशहा येथेंच वास्तव्य करून राहिल्यामुळें त्यांनीं खर्च केलेला पैसा देशांतल्या देशांतच राहिला. पण इंग्रजांच्या रियासतींत हिंदुस्थानांतून घेतलेला गव्हर्नराचा पगार व सनदी अधिकाऱ्यांचें पेन्शन हेंहि इंग्लंडमध्येंच खर्च केलें जातें. हिंदुस्थानाची आर्थिक पिळणूक इंग्लंडइतकी दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रानें केलेली नाहीं.

हिंदुस्थानाला इंग्रजी सत्तेनें गिळलें असें म्हणणें इंग्रज इतिहासकारास रुचत नाहीं. त्यांचें मत असें कीं, हिंदुस्थान आपण होऊनच इंग्रजांच्या गळयांत पडला आणि तो भार ते ' विश्वस्त ' या नात्यानें वहात आहेत व हिंदुस्थान स्वराज्याला पात्र होईतों त्यांनीं हा भार सहन करावयाचें ठरविलें आहे. अवघें ब्रिटिश साम्राज्य अस्तित्वांत आलें तेंच मुळीं अभावितपणें, निर्हेतुकपणें आलें असें म्हणण्याइतकीहि मजल कांहीं साम्राज्याभिमानी लेखकांनीं गांठली आहे. § आणि हिंदुस्थानासंबंधी तर इंग्रज इतिहासकार ठांसून सांगतात कीं, इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकला असा नाहींच. ते व्यापारासाठीं आले, व्यापाराकरितां त्यांनीं वखारी घातल्या, वखारींच्या रक्षणासाठीं फौजा ठेवल्या, तैनाती फौजा म्हणून त्यांची मदत देशी राजांना यादवीचे वेळीं दिली, त्या मदतीचा मोबदला म्हणून एक एक प्रांत ताब्यांत आला अशा या आंग्लसत्तेच्या विकासांत स्वारी कोठें आहे, जुलूम कोठें आहे आणि अन्याय तरी कोठें आहे, असा साळसूदपणाचा प्रश्न इंग्रज इतिहासकार करीत असतात व ऑक्सफर्ड-केंब्रिजच्या महाविद्यालयांत शिकणाऱ्या

---

§ The British Empire was founded in the state of absent-mindedness.

तरुण इंग्रज पिढीला तो पढवीत असतात.* याच भट्टींतून निघालेले इंग्रज येथें सिव्हिल अधिकारी म्हणून अंमल चालवितात. आपल्या पूर्वजांच्या 'गोऱ्या' कार्यांना पार्श्वभूमि म्हणून ते लेखक आर्यांना कसे 'रानटी' व मराठ्यांना लुटारू' म्हणून काळीकुट्ट पार्श्वभूमि चितारीत असतात. 'हिंदवीसाठीं फकिरी' घेतलेल्या, गोब्राह्मणप्रतिपालक अशा हिंदुपदपादशहा छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांची सारी कारकीर्द लूट व पुंडाई यांची मूर्ति होती व तिच्यांत देशभक्ति वगैरे उदात्त गुणांचा लवलेशहि नव्हता; §असें सीलीच्या व्याख्यानांतील विचार अद्याप इंग्लंडांतील तरुण शिरसामान्य समजतात. इंग्लंडचे राहो, पण हिंदुस्थानांतील स्वाभिमानी लोकांनीं, विशेषतः मनुस्मृतीचें दहन करणाऱ्या स्वाभिमान-भास्करांनीं असलीं असत्य व अपमानकारक पुस्तकें आधीं जाळावयास पाहिजेत; स्वायत्त प्रांतिक सरकारांनीं तर त्यांना देशांत येण्याची बंदीच केली पाहिजे.

एका अर्थानें, 'हिंदुस्थानला हिंदुस्थानानेंच जिंकलें' असें म्हणणें सयुक्तिक वाटतें. इंग्रजांनीं अर्काट, प्लासी, बक्सार वगैरे ठिकाणीं ज्या निर्णायक लढाया जिंकल्या, त्यांत त्यांच्या बाजूनें जितके युरोपियन होते, त्याच्या चौपट हिंदी शिपाई होते. आजमितीलाहि इंग्रजांचें अधिराज्य हिंदुस्थानांत चाललें आहे तें लष्कराच्या जोरावर आणि त्या लष्करांतहि बहुसंख्य आहेत भाडोत्री हिंदी शिपाईच.* शिस्तीची फौज व नवीन शस्त्रास्त्रें

---

* Nothing great that has ever been done by Englishmen was done so unintentionally, so accidently as the conquest of India.

The Expansion of England.
*—Sir. J. R. Seeley.*

§ The Maratha Power was but an oraganization of pillage; In the Maratha movement there never was anything elevated or patriotic, but that it continued from first to last to be an oraganization of plunder. P. 262.

* It remains then that our power rests on an army, and on an army of which two thirds are in relation to us mere mercenaries. *—Expansion of England.*

यांच्या बळावर हिंदुस्थान इंग्रजानें कसा गिळला हें अनेक हिंदी इतिहासकारांनीं साधार सिद्ध केलें आहे. आपली कापडधंद्याची मक्तेदारी टिकविण्यासाठीं ईस्टइंडिया कंपनीनें हिंदी विणकऱ्यांचे आंगठे कसे कापले, क्लाइव्हनें उमीचंदाला कसे हातोहात फसविलें, वॉरन हेस्टिंग्जनें बेगमांवरहि किती जुलूम केले, डलहौसीनें न्यायान्याय न पाहतां एकामागून एक संस्थानें कशीं खालसा केलीं आणि देशी राजांमध्यें भेदनीतीची पिंपळमुळी रोवून इंग्रजांनीं हिंदुस्थान किती निर्दयतेनें व अन्यायानें गिळंकृत केला याचें वर्णन नव्यानें करावयास नको.

---

# ४

# ब्रिटिशांच्या स्वामित्वास ओहोटी

१८७६ सालीं डिझरॅलीनें राणी व्हिक्टोरियाला "कैसर–इ–हिंद" म्हणजे हिंदुस्थानची सम्राज्ञी बनविलें; तेव्हांपासूनच ब्रिटिशांचें साम्राज्य-विषयक धोरण रंगारूपास चढूं लागलें. त्यानंतर नऊच वर्षांनीं, म्हणजे १८८५ मध्यें राष्ट्रीय सभा स्थापन झाली. १८५७ च्या क्रांति-युद्धाची धग अद्याप राष्ट्रांत धुगधुगत होती आणि स्वातंत्र्य–स्फूर्ति देशभर पेटलेली होती. तिला रक्षण–द्वार ( Safety–Valve ) करून द्यावें म्हणून ह्यूम वगैरे युरोपियनांनीं राष्ट्रसभेच्या कल्पनेला चालना दिली व गव्हर्नरासारखे सरकारी अधिकारीहि तिला हजर राहूं लागले. पण तीच राष्ट्रसभा स्वराज्याची भाषा बोलून खरें लोकमत प्रगट करूं लागली, तेव्हां सरकारची तिच्यावर कृपा–दृष्टि होती ती वक्र-दृष्टि झाली. स्वराज्य शब्द उच्चारणें हेंहि गुन्हा होऊन बसलें.

पण तशाहि परिस्थितींत स्वातंत्र्य-देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं हिंदु-स्थाननें चतुर्वेदांच्या द्वारें आपली उपासना अखंड चालू ठेवली आहे. अर्ज–विनंत्यादि रूपानें प्रागतिक पक्ष ऋग्वेदांतल्यासारखी इंग्रजांची प्रार्थना करीत आहे. आत्मयज्ञ करून आपली मागणी सरकारच्या गळीं उतरविण्याची पराकाष्ठा करणारा राष्ट्रीय पक्ष यजुर्वेदाप्रमाणें कर्म–कांड आचरीत आहे. ऋग्वेदांतीलच प्रार्थना–मंत्र संगीताच्या पद्धतीनें गाणारा सामवेद शिष्टमंडळें व गोलमेज परिषदा यांच्या द्वारें प्रगट झाला आहे आणि जारण–मारण करणारा क्रांतिकारकांचा अथर्ववेदहि गेलीं तीस वर्षें

अनुष्ठिला जात आहे. एकानंतर एक अशा क्रमानें हे उपाय अंमलांत आणले गेलें असें नसून एकाच वेळीं, कमीअधिक प्रमाणांत, पण चारी उपासना–मार्ग चालू आहेत. त्या सर्वांचें संकलित फल म्हणजे १९०९ च्या मोर्ले–मिंटो सुधारणा, १९१९ च्या मॉटफर्ड सुधारणा व १९३५ चा सुधारणा–कायदा. यांतील एकएक हक्क पदरांत पाडून घेण्यासाठीं हिंदुस्थानाला आपले थोरथोर पुढारी कारागृहांत कष्टवावे लागले, फासावर लटकवावे लागले, घरेंदारें बेचिराख बनवावीं लागलीं.

हिंदी प्रजेच्या स्वातंत्र्य–लालसेला दडपून टाकण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हस्तकांनीं किती भीषण व क्रूर उपाय योजले हें कर्झनशाही किंवा डायरशाही यांचीं नुसतीं नावें स्मरतांच ध्यानीं येण्यासारखें आहे. तसेंच लो. टिळकांचा मंडालेंतील बंदिवास, लाला लजपतरायांची अमेरिकेंत हद्दपारी, बॅ. सावरकरांना दोन जन्मठेपींच्या शिक्षा, जतींद्रनाथाचें तुरुंगांतील प्रायोपवेशन, म. गांधींचा अनेकवार कारागृहवास, कायदेभंगाच्या चळवळींत लाख–पाऊणलाख लोकांना तुरुंगवास, कोट्यवधि लोकांना लाठीमार वगैरे घटनांची नुसती नामावलि ऐकली, तरी ब्रिटिश सरकार हें स्वातंत्र्याचे कसें कट्टे वैरी आहे याची कल्पना स्पष्टपणें येतें. अमृतसर येथें सभेसाठीं जमलेल्या निरपराधी नागरिकांपैकीं ३७९ माणसें डायरनें ठार केलीं व १२०० जखमी केलीं आणि दारुगोळा शिल्लक नाहीं म्हणून त्यानें पुढें हात आटोपता घेतला असे खुद्द सरकारी वृत्तांत बोलतात! अशा हिंस्र अधिकाऱ्याला इंग्लंडांतील जनतेनें शासन काय केलें? तर हेस्टिंग्जप्रमाणें केवळ दोषमुक्त न करतां डायरला रत्नजडित तलवार बक्षीस दिली, सन्मानपूर्वक थैली अर्पण केली, आणि लॉर्डांच्या सभेनें जाहीर सत्कार केला, आणि एका वर्तमानपत्रानें तर १४००० पौंड बक्षीस दिले!

यावरून इंग्लिश लोक हिंदी स्वातंत्र्याला आपखुषीनें व कर्तव्यबुद्धीनें कितपत साहाय्य करीत आहेत हें कळून येतें. हिंदुस्थानानें नाक दाबल्याशिवाय इंग्लंडचें तोंड कधींच उघडलें नाहीं व त्यांतून स्वराज्याची भाषा कधींहि बाहेर पडली नाहीं. गेल्या वीस वर्षांत हिंदुस्थानांतील प्रक्षोभानें जसें सामुदायिक व संघटित स्वरूप प्रगट केलें, तसें आशिया-

खंडांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांत दिसून आलें नाहीं हें सत्य आहे. पण त्याचें श्रेय ' जगाचा इतिहास ' लिहिणारे मि. सी. डिलाइल बर्न्स म्हणतात त्याप्रमाणें ब्रिटिश सरकाराकडे नसून म. गांधी, पं. जवाहरलाल प्रभृति लोकनायकांकडे आहे. § ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं रौलट कायद्यासारखे ' सैतानी ' कायदे केल्यामुळें प्रजेंत असंतोष पेटला म्हणून त्यांना चळवळीचें श्रेय द्यावयाचें असलें तर मात्र तें देतां येईल ! मिठावरील कर, लोकप्रतिनिधींच्या निषेधास न जुमानतां, सरकारनें १९२३ सालीं दुप्पट केला त्यामुळें लोकमत किती तीव्रपणें खवळलें हें मिठाच्या सत्याग्रहाचे रूपानें दिसण्यास सात वर्षें लागलीं असलीं; तरी दूरदर्शी मुत्सद्यांनीं तेव्हांच ओळखलें कीं, अमेरिकेंतील चहाप्रमाणें हिंदुस्थानांतील मीठ हें ब्रिटिश सत्तेला विष ठरणार. राजनीति व आंतरराष्ट्रीय कायदा यांचे तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले प्रो. नॉर्मन ड्वाइट हॅरिस यांनीं मिठावरील कर ही भयंकर घोडचूक आहे असें स्पष्टपणें लिहिलें आहे.* अशा घोडचुका करून इंग्लंडांतील बर्कनहेड प्रभृतींनीं व हिंदुस्थानांतील वुइलिंग्डनप्रभृतींनीं हिंदी स्वातंत्र्याची चळवळ व्यापक, संघटित व प्रभावशाली करण्यास मोठीच मदत केली असें म्हटलें पाहिजे !

एकराष्ट्रीयत्वाची प्रबळ भावना हिंदुस्थानभर उत्पन्न होणें यांतच ब्रिटिश साम्राज्यशाहीचें मरण आहे. पन्नास साठ वर्षांपूर्वीच सर जे. आर्. सीली या इतिहासकारानें असें भाकित करून ठेवलें आहे कीं, सबंध राष्ट्र एकमुखानें स्वातंत्र्याची मागणी करूं लागलें कीं साम्राज्याचा अंत ठेवलेलाच आहे§

§ That he national movement (during the past ten years i. e. 1918–28 ) is more vigorous in India than elsewhere in Asia may be due to the excellent work done there by the British.
— *A Short History of world.*

* Salt tax is an example of these stupid blunders which seem to imperil the existence of the British Empire.
—*Europe and the East.*

§ The moment a mutiny is but threatened which shall be no more mutiny, but the expression of a universal feeling of nationality, at that moment all hope is at an end, as all desire ought to be at end of preserving our Empire.

याची कारणमीमांसा ते अशी करतात कीं, शतकानुशतकें केवळ पारतंत्र्यांत व दारिद्र्यांत लोक राहिले तरी ते कांहीं कृति करतील असें नाहीं. त्यांना जगतां आलें नाहीं तर ते मरतात आणि कसेंबसें जीवंत रहातां येत असेल, तर तसेच राहून ते काळ कंठतात. त्यांच्या आकांक्षा लोपलेल्या असतात व भावना मेलेल्या असतात. पण त्या आकांक्षांना व भावनांना संजीवन देऊन जर कोणी त्या प्रजेपुढें स्वातंत्र्यसंपादनाचें ध्येय खेळतें ठेवलें; तर मात्र तिच्या प्रगतीच्या आड येण्याची कोणाची छाती नाहीं. १८५७च्या स्वातंत्र्य-युद्धांत सैनिक व संस्थानिक यांनींच भाग घेतला होता; त्यामुळें तें ब्रिटिश सरकारास त्यांच्याच भाऊबंदांकरवीं मोडून काढतां आलें. पण लो. टिळक व म. गांधी या राष्ट्रीय विभूतींनीं बहुजनसमाजाला जागें केलें, खडें केलें व स्वातंत्र्याच्या मार्गानें पावलें टाकावयासहि लावलें. आतां ही स्वातंत्र्य-सेना हटवणें ब्रिटिश साम्राज्यासच काय पण जगांतील कोणत्याहि शक्तीला शक्य नाहीं. सतत दडपशाही करून, सैन्याच्या बळावर स्वातंत्र्याकांक्षी हिंदुस्थानाला दडपून ठेवणें इंग्रजांना सुतराम् अशक्य आहे. अशा लष्करी अंमलांचा खर्च इंग्लंडला डोईजड होईल व त्याचा व्यापार बुडेल तो निराळाच ! *

हिंदुस्थानांतील स्वातंत्र्य–ज्योत विझविण्यासाठीं साम्राज्य-सरकारानें प्रत्येक आणीबाणीचे वेळीं कांहीं ना कांहीं क्लृप्ति योजलेलीच आहे. मोर्ले-मिंटो सुधारणांत विभक्त मतदारसंघ, मॉंटफर्ड सुधारणांत द्विदल राज्यपद्धति आणि नव्या घटना-कायद्यांत जातिनिर्णय अशा पाचरी ठोकलेल्या असून संयुक्त घटनेच्या गळ्यांत बेजबाबदार संस्थानिकांचें लोढणें अडकविलें आहे. हिंदु–मुसलमानांचा भेद तर सारखा जळता ठेवलाच आहे, पण त्याशिवाय संस्थानें व खालसा अशी चीरफाडहि नव्या कायद्यानें करून ठेवली आहे, आणि ख्रिश्चनांना व स्त्रियांना न मागतांहि वेगळे मतदार-संघ दिले ते निराळेच! या सर्वांच्या बुडाशीं 'भेदा व नांदा' हें कुटिल

---

* We cannot rule her as conquerors;—for we should assuredly be ruined financially by the mere attempt.

—*J. R. Seeley.*

धोरण असून त्यामुळें आतांपर्यंत ब्रिटिश साम्राज्यशाहीचें आयुष्य लांबलें आहे, पण यापुढें एकाद्या महायुद्धाचा धक्का ब्रिटिश साम्राज्याला लागला तर ही भेद-नीति त्या साम्राज्याला वाचवूं शकणार नाहीं असें जी. डी. एच्. कोल यासारखे जगप्रसिद्ध राजनीतिशास्त्रज्ञहि सांगतात. *

मुसलमानांतहि राष्ट्रीयत्वाचें व संस्थानांतहि लोकशाहीचें वारें थोडथोडें पण शिरूं लागलें आहे हें कोणास नाकारतां येणार नाहीं. गेल्या महायुद्धाचे सुरुवातीचे वेळीं, पं. जवाहरलाल नेहरु यांनीं Glimpses of World History मध्यें म्हटल्याप्रमाणें, हिंदी राजकारणाला फारच ओहोटी लागलेली होती; त्यामुळें साम्राज्याच्या आपत्तीचा हिंदुस्थानाला म्हणण्यासारखा कांहीं फायदा झाला नाहीं. नाहीं म्हणावयास जर्मनी व युरोपांतील इतर देश यां-मधील हिंदी लोक यांनीं बर्लिनमध्यें जमून थोडीफार हालचाल केली. त्यांनीं नेमलेल्या समितीशीं जर्मन सरकारानें असा करारहि केला होता कीं, युद्धांत आमचा विजय झाला तर हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्याचा आग्रह आम्ही धरूं. त्या हिंदी समितीनें 'इंग्लंडचा शत्रु तो आपला मित्र' या न्यायानें जर्मनीला मदत करण्याचें ठरविलें आणि हिंदी फौजेंत बेदिली उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला व हिंदुस्थानांत शस्त्रास्त्रें पाठविण्याचाहि व्यूह रचला. कॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांनीं आपल्या वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी ३० हजार बंदुका, काडतुसांच्या ४०० पेट्या व २ लाख रुपये यांनीं भरलेलें जहाज हिंदुस्थानांत आणविलें व बंगाल्यांत बंड उभारण्याचा चंग बांधला; पण तो फसला. कै. आण्णासाहेब पटवर्धनांनींहि वऱ्हाडांत बंड उभारण्याचा व्यूह रचला होता. यापुढील महायुद्धाचे वेळीं वैयक्तिक किंवा गुप्त प्रयत्न न होतां बहुजनसमाजच सामुदायिक प्रमाणावर असहकारिता, बहिष्कार, संप वगैरे उपाय योजून इंग्रजी सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करील व म्हणून तो यशस्वी होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

---

* Indian opinion is so divided, especially over the differences between Mohammedans and Hindus, as to make at least a temporary compromise more likely than an open rupture, unless Great Britain becomes involved in a new European War. —*Europe Today*.

# ५

# महायुद्धाची सिद्धता

Britons will be made to obey foreign lords as they have never done since 1066.

*Prof. Banse*

ब्रिटिश साम्राज्य हा आजमितीला विरोधाभासाचा विलक्षण नमुना आहे. युरोपच्या सांदीकोपऱ्याला पडलेलें चिमुकलें इंग्लंड युरोपखंडाच्या पांचपट विस्ताराचें साम्राज्य आपल्या मुठींत ठेवीत आहे. लोखंड व कोळसा याहून अधिक मौल्यवान् पदार्थ इंग्लंडच्या पोटांत नसतांना सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या खाणींचें स्वामित्व मात्र त्याकडे आहे. चोहोंबाजूंनीं समुद्रानें कोंडलेलें असलें तरी त्याच्या प्रभुत्वाची पताका नगाधिराज हिमाचलावर रोवलेली आहे आणि नाईल नदीच्या चार हजार मैल लांबीच्या प्रवाहावरहि फडकत आहे. जगाचें क्षेत्रफळ, मानवसंख्या व खाद्य पदार्थ यांच्या पाव हिश्शावर इंग्लंडची सत्ता चालते; पण आपल्या साम्राज्यांतील प्रत्येक घटक स्वातंत्र्य भोगीत आहे असा बहाणा तें करीत आहे. फार काय, आज 'ब्रिटिश साम्राज्य' या नांवाची चीजच जगांत उरलेली नाहीं; 'ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ् नेशन्स' ( ब्रिटिश राष्ट्रसंघ ) हें स्वातंत्र्य–द्योतक अभिधान आतां रूढ होत चाललें आहे. शब्दांपुरतें पाहिलें तर 'ब्रिटिश साम्राज्य' केव्हांच नामशेष झालें आहे; पण वस्तुतः मात्र साऱ्या जगाचीं सूत्रें अजून तेंच हालवीत आहे.

इंग्लंडचें सारें जीवन व वैभव साम्राज्य–सत्तेवरच आधारलेलें आहे.

जगांतील दूरदूरचे देश जणूं त्याच्या सेवेला सिद्ध आहेत. इंग्लंडला गहूं पुरविण्याचा मक्ता ऑस्ट्रेलियानें घेतला आहे. जगांतील एकंदर मेंढ्यांपैकीं शें. २० एकट्या ऑस्ट्रेलियांत आहेत; म्हणजे तेथें लोंकरीची एक मोठी खाणच आहे म्हटलें तरी चालेल. तीच स्थिति सोन्याची. जगांतील सोन्याच्या ५ व्या हिश्शाची जन्मभूमि ऑस्ट्रेलिया ही आहे. शिवाय चांदी, तांबें, शिसें वगैरे खनिज पदार्थ मुबलक आहेत ते वेगळेच. कॅनडांतूनहि गहूं व लांकूड जातें. आफ्रिकेंतील सोन्याच्या व हिऱ्याच्या खाणी इंग्लंडच्याच मालकीच्या आहेत. वेस्ट इंडीज् व मॉरिशस या बेटांतील साखर, सीलोनमधील चहा व रबर आणि हिंदुस्थानांतील चहा, कापूस व खनिज संपत्ति यांचेहि धनी इंग्लंडच आहे. त्याला लागणाऱ्या अन्नसामुग्रीपैकीं ८० टक्के साखर, ८५ टक्के गहूं व कणीक, ५५ टक्के मांस, ८५ टक्के लोणी आणि १ कोटि टन पेट्रोल हें सर्व परदेशांतून यावें लागतें.

जगांतील आट्यापाट्याच्या खेळांत साम्राज्यसत्तेचा सूर धरण्याचें भाग्य १६व्या शतकांत पोर्तुगीज व स्पॅनिश यांचेकडे गेलें होतें; १७व्या शतकांत तें डचलोकांना प्राप्त झालें आणि १८व्या शतकांत तें फ्रेंचांना लाभलें. ब्रिटिशांनीं १९वें शतकभर आपलें साम्राज्य गाजविलें; पण आतां त्यांचे दिवस भरत आले आहेत. आतां ब्रिटिश साम्राज्याची स्थिति कोळ्यासारखी झाली आहे. एकाद्या बारक्याशा कोळ्यानें आपल्या तोंडांतून भराभरा धाग्यामागून धागे काढून त्यांचें भलें-मोठें जाळें भिंतीवर पसरून द्यावें व त्यांत जवळ-दूरच्या दोन-चार माशांना अडकवून आपण बढाई मिरवूं लागावें; तोंच घरधनीण येते आणि उंचशी केरसुणी हातांत घेऊन तें जाळें झटाझट झटकून टाकते, तेव्हां तो बिचारा कोळी आपण विणलेलें जाळें व त्यांतील सुग्रास माशा यांचा लोभ सोडून भिंतीच्या कोपऱ्यांत धूम ठोकतो आणि पुनः पूर्ववत् एकटा व दुबळा असा रहातो; तशी स्थिति सध्यां ब्रिटिश साम्राज्याची होत आहे आणि ती यापुढें सुधारणें शक्य नाहीं असेंच काळाचा ओघ सुचवीत आहे.

मि. जॉर्ज बर्नार्ड शॉ यांना कोणी इंग्लंडच्या भवितव्याबद्दल पृच्छा केली असतां त्यांनीं उत्तर दिलें कीं, इंग्लंडपेक्षांहि उच्चतर संस्कृतीचीं

मोठमोठीं राष्ट्रें आतांपर्यंत रसातळास गेलीं आहेत आणि इंग्लंडचीही लवकरच तीच गत होणार. याचें कारण विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, "समाजांत संपत्तीची व कामाची वांटणी कशी होते यावर त्या समाजाची शाश्वती अवलंबून आहे. इंग्लंडमध्यें संपत्तीची वाटणी अशी होतच नाहीं. रस्त्यावर पैसा फेकलेला असतो आणि बलिष्ठ असेल त्याला तो हस्तगत करतां येतो."

समाजरचनेंतील या विषमतेमुळें इंग्लंड क्षीणबल झालेलें आहे. राष्ट्राच्या सर्व संपत्तीपैकीं शें. ६४ भाग फक्त शें. २ लोकांच्या हातांत आहे; उरलेली शें. ३६ संपत्ति शंभरांतील ९८ लोकांनीं वाटून घ्यावयाची. या वैषम्याच्या भूमींत समाजवाद वाढीस लागणें सोपें असतें. इंग्लंडांत आज जरी राजशाही, भांडवलशाही व लोकशाही यांचा मेळ घातलेला दिसत असला; तरी त्या तिघांचे जागीं समाजशाही तेथें लवकरच निर्माण होईल अशीं काळाचीं लक्षणें दिसत आहेत. खुद्द इंग्लंडांतील जनता कितीहि पुराणप्रिय (Conservative) असली, तरी जगांतील घडामोडीचे धक्के तिला जाणवल्याशिवाय व जागविल्याशिवाय रहात नाहींत. त्या धक्क्यामुळें इंग्लिश जनतेचें अंतःस्थ दौर्बल्याकडे लक्ष जाणें अपरिहार्य आहे. फ्रान्स, अमेरिका व रशिया या देशांतील प्रचंड क्रांत्यांचे निनाद इंग्लंडमध्यें उमटल्याशिवाय राहिले नाहींत. रशियामध्यें १९१७ सालीं क्रांति होऊन झारशाहीच्या ऐवजीं मजूरशाही आली नसती; तर इंग्लंडांत १९२४ सालीं मजूरपक्ष राज्याधिकारावर चढलाच नसता. इंग्लंडमधील राजकारणाचा सारा विकास बाहेरच्या क्रांत्यामुळेंच झाला आहे असें मत ट्रॉट्स्की यांनीं मांडलें आहे.§ अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं, इंग्लंडमधील परिस्थिति पूर्ण निकोप असतां क्रांतीचे जंतु बाहेरून आले आणि म्हणून इंग्लंडमध्यें परिवर्तन झालें. स्टॅलिननें म्हटल्याप्रमाणें, क्रांति ही आयात होणारी चीज नव्हेच.ʃ इंग्लंडमध्यें उद्योगधंदे वाढत होते, पण

§ The entire recent evolution of England has taken place on the shoulders of European rovolutions–*Whither England*?

ʃ Export of revolution is nonsense.

त्यांतील नफ्याचें लोणी फस्त करी भांडवलवाल्यांचा वर्ग. त्यामुळें सर्वसामान्य जनता व विशेषतः मजूरवर्ग अधिकाधिक दरिद्री बनत चालला आणि बेकारीची कीड एकदां लागली ती कायमचीच चिकटली. पंधरा-वीस लाख तरुण कामाशिवाय स्वस्थ रहावे व त्यांना पोसण्यासाठीं सरकारी खजिन्यांतून भत्ता ( Dole ) दिला जावा हा क्रम दहापंधरा वर्षें अखंड चालावा हें राष्ट्राच्या सुस्थितीचें लक्षण खास नव्हे. ( Chronic unemployment is the most crying expression of an unsatisfactory system.) असें १९२५ सालींच ट्रॉट्स्कीनें म्हटलें आहे. भांडवलशाहीच्या समाजांत उत्पादन कितीहि वाढलें तरी नफेबाजीचा बकासुर तें सारें गट्ट करून टाकतो आणि त्यामुळें आर्थिक पेंचप्रसंग ( crisis ), बेकारी व युद्ध हे त्रिदोष भांडवशाहीप्रधान समाजरचनेंत अंगभूत असेच राहतात. इकडे बेकारी वाढत असतां इंग्लंडचें उद्योगधंद्याचें उत्पादनहि सारखें वाढतच होतें हें पुढील आंकड्यांवरून लक्ष्यांत येईल.

जगांतील उद्योगधंद्यांतील उत्पादन

| देश | सन १९२८ ( शेंकडा ) | १९३२ |
|---|---|---|
| अमेरिका | ४४·८ | ३४·५ |
| रशिया | ४·७ | १४·९ |
| इंग्लंड | ९·२ | ११·२ |
| जर्मनी | ११·६ | ८·९ |
| फ्रान्स | ७ | ७ |
| जपान | २·४ | ३·७ |

१९१८ सालीं महायुद्ध थांबलें पण तेव्हांपासूनच त्यानें दिलेल्या धक्क्यामुळें सर्व जग हादरूं लागलें. प्रत्यक्ष महायुद्धांतील हानि डोळ्यानीं दिसणारी व मोजमाप करून सांगतां येण्यासारखी होती; पण महायुद्धानंतर हे परिणाम फार दूरवर व सर्व जगभर सूक्ष्म रीतीनें होत राहिले. मोडकळीस आलेल्या भांडवलशाहीची घटका भरली असून नव्या समाजवादाचें युग उदयास येत आहे अशी सूचना महायुद्धानें सर्व जगाला

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



दिली.§ ब्रिटिश साम्राज्यांतील घटकांचे जे संबंध होते, त्यावरहि महायुद्धाचा मोठाच परिणाम झाला. लोखंडी सांखळदंडानें ज्या वसाहती इंग्लंडनें साम्राज्य–सत्तेशीं बांधून ठेवल्या होत्या, त्या रेशमी धाग्यानें गुंतविल्या गेल्या. 'ब्रिटिश साम्राज्य' ही अधिराज्याची बिरुदावळ जाऊन 'ब्रिटिश राष्ट्रसंघ' ही बंधुतेची भाषा आली व आयरिश फ्री स्टेटच्या कायद्यांत ती रूढ झाली. या परिवर्तनाचें बीज महायुद्धाच्या परिणामांतच सांपडतें. महायुद्धाच्या झंझावातांत प्रबळ राष्ट्रें सांपडून त्यांचें सामर्थ्य क्षीण झालें असतां त्यांच्या टांचेखालीं वर्षानुवर्षें चेंगरत असलेल्या लोकांनीं आपल्या उद्धारासाठीं निर्वाणीचे प्रयत्न केले. रशियांत शतकानुशतकें चाललेल्या राजकीय, आर्थिक व धार्मिक जुलमाचा व अन्यायाचा प्रचंड स्फोट १९१७ सालीं झाला आणि 'जगांतील कामगारबंधूंनो! एक व्हा, शृंखला तोडा व समता स्थापा' असा संदेश जगाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत निनादत गेला. देशोदेशीचे मजूर जागृत झाले, संघटित झाले, आत्मोद्धारासाठीं झटूं लागले. इंग्लंडांतील त्याचा पहिला बहर म्हणजे १९२४ मधील मजूरपक्षाचें मंत्रिमंडळ. ते रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्या नेतृत्वाखालीं जानेवारीपासून नोव्हेंबरपर्यंत, म्हणजे कसेंबसें एक वर्ष टिकलें. पण त्यानंतर पांच वर्षांनीं त्यांनींच १९२९ च्या जूनमध्यें मजूर मंत्रिमंडळ बनविलें असतां तें १९३१ च्या ऑगस्टपर्यंत दोन वर्षें टिकून राहिलें.

या दुसऱ्या अमदानींतच गोलमेज परिषदेची हिंदुस्थानची जुनी मागणी पूर्ण झाली. इंग्लंडांतील मजूरपक्ष हिंदुस्थानला स्वराज्य देण्यास वचनबद्ध आहे. लो. टिळकांच्या वेळेपासून त्या पक्षाशीं येथील राष्ट्रीय पक्षानें संगनमत ठेवलेलें आहे. मजूरपक्षाच्या जाहीरनाम्यांत हिंदुस्थानला स्वराज्य देण्याचेंच नव्हे तर स्वयंनिर्णयाचेंहि तत्त्व अंतर्भूत आहे. हिंदुस्थानांतील प्रौढांना मताधिकार देऊन त्यांच्या मतानें निवडलेल्या 'जानपद

---

§ The year 1914 sounded the historic signal for basic change from the old bankrupt imperialist order to the New World Socialist order. —*R. Palme Dutt.*

पाने १०४
दा. नं. ८८८०१
शज ९३४

समितीनें ? ( Constituent Assembly ) आपली राज्यघटना आपल्या इच्छेनुरूप बनवावी म्हणजे ती आम्ही अधिकारारूढ झाल्यावर पार्लमेंटांत मंजूर करून घेऊं असें लॅन्सबरीप्रभृति मजूरपुढारी स्पष्टपणें अभिवचन देत आहेत. अर्थात् ' नानाश्रान्तस्य सख्याय देवाः ' या वचनानुसार हिंदुस्थानानें स्वतःचें बल वाढविल्याविना हीं सारीं अभिवचनें म्हणजे पाण्यावरील रेघा ठरतील हें उघड आहे. पण पाण्याचे चढउतार पाहूनच गलबत हांकारावयाचें असतें !

महायुद्धानंतर उत्पादन वाढलें असूनहि सर्व देशामध्यें बेकारी अधिकाधिक वाढतच आहे. याचें एक प्रमुख कारण म्हणजे नव्या महायुद्धाच्या तयारीसाठीं पाण्यासारखा पैसा खर्च होत आहे. गेलें महायुद्ध हें ' शेवटचें युद्ध ' ठरवावें असें म्हणणारीं राष्ट्रेंच रणदेवतेपुढें धूपदीप जाळण्यासाठीं इतका अवाढव्य पैसा खर्च करीत आहेत कीं, तेवढ्यानें जगांतील बेकारीचा समूळ नायनाट करणें सहज शक्य झालें असतें. १९१३ पासून १९२५ पर्यंत जगाची लोकसंख्या शें. ६ नें वाढली असली, तर जगांतील उत्पादनांत शें. १८ ची वाढ झालेली आहे. पण खजिन्याचा मोठा भाग स्वसंरक्षणासाठीं म्हणून रणदेवतेला बळी देण्यांत साऱ्या राष्ट्रांची कशी अहमहमिका लागून राहिली आहे तें पुढील आंकड्यांवरून दिसून येतें.

**जगांतील शस्त्रास्त्रासाठीं खर्च (डॉलर)**

| सन | कोटी | लक्ष |
|---|---|---|
| १९१३ | २५३ | १० |
| १९२५ | ३५२ | २० |
| १९३४ | ४९० | |

आगामी महायुद्धाची संक्रांत विमानावर बसून येणार आहे. यापुढील महायुद्धांत लष्कर किंवा आरमार यांच्यापेक्षां विमान दळावरच अधिक भर असणार. म्हणून ज्याची वैमानिक तयारी जास्त तेंच राष्ट्र युद्धांत यशस्वी होण्याचा संभव अधिक. त्यासाठीं जगांतील राष्ट्रें विमानें तयार करण्याचे कारखाने काढीत आहेत आणि शत्रूच्या विमानांचा विध्वंस करणाऱ्या व विमान हल्ल्यापासून बचाव करणाऱ्या साधनांची पैदास वाढवीत

आहेत. १९३५ सालीं इंग्लंड विमानदळावर २ कोटि ७० लक्ष पौंड खर्च करीत होतें पण तेंच १९३९ सालीं २० कोटि पौंड खर्चणार आहे. म्युनिच कराराचे वेळीं इंग्लंडजवळ २२०० विमानें तयार होतीं. ही संख्या जर्मनी–इटालीस तोंड देण्यास अपुरी पडेल असें वाटल्यामुळेंच मि. चेंबरलेन यांनीं नमतें घेतलें व उघड्या डोळ्यांनीं झेकोस्लाव्हाकियाचा खून होत असलेला पाहिला, एवढेंच नव्हे तर, अशा क्षुल्लक राष्ट्रासाठीं आम्ही महायुद्धाचें संकट ओढवून घेणार नाहीं असें पार्लमेंटमध्यें बिनदिक्कत जाहीर केलें ! आतां दरमहा २०० विमानें तरी तयार करण्याच्या प्रयत्नास इंग्लंड लागलें आहे. इतर देशहि विमान-वृद्धीसाठीं अतोनात पैसा खर्च करीत आहेत. त्यांचें सध्यांचें वैमानिक बळ पुढीलप्रमाणें आहे.

## वैमानिक दळ

| देश | विमानें |
|---|---|
| इंग्लंड | २२०० |
| अमेरिका | ३००० |
| फ्रान्स | ११५० |
| जर्मनी | १०००० |
| इटाली | ६००० |
| रशिया | १०००० |

केवळ विमानदळासाठीं जगांत पैशाचा चुराडा कसा वाढत्या प्रमाणांत होत आहे हें पुढील आंकड्यावरून दिसून येतें.

## जागतिक विमान–खर्च (पौंड)

| सन | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| १९२८ | ११ | ० |
| १९३२ | १५ | ० |
| १९३८ | ६६ | ६० |
| १९३९ | ७० | – |

एकंदर युद्ध-खर्चाचा पर्वतप्राय खर्च पाहिला. तर कोणाचीही छाती फाटूनच जाईल. नवल हें कीं, यंदाचीं डोईजड अंदाजपत्रकें सादर करतांना प्रत्येक देशाचा नेता अशीच साळसूद भाषा वापरीत आहे कीं, आम्ही केवळ स्वसंरक्षणासाठीं ही तयारी करीत आहों. प्रश्न असा कीं, प्रत्येक देश जर बचावाचीच तयारी करीत आहे आणि चढाई करण्याची वासना कोणालाच नाहीं; तर हा सारा खर्च अनाठायींच नाहीं कां? अमेरिकेचे अध्यक्ष मि. रूझवेल्ट यांनीं १९३९च्या फेब्रुवारींत जाहीर केलें कीं, आमची समशेर आर्तत्राणासाठींच आहे, लोकशाहीच्या रक्षणासाठींच आहे—कोणावर आक्रमण करण्यासाठीं नव्हे.* त्याच सुमारास इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. चेंबर्लेन हे इंग्रज लोकांना समजावीत होते कीं, आपलें अवाढव्य लष्कर चढाई करणार नाहीं, बचावच करील.§ हें खरें असलें तरी जपान, जर्मनी व इटाली हीं बुभुक्षित राष्ट्रं आपापलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं युद्धाची कटकट निर्माण केल्याशिवाय कसें राहतील? प्रत्येक देशाला युद्धाची चाहूल लागलेलीआहे, त्याची खात्री वाटत आहे आणि म्हणून सरकारच्या इतर कोणत्याहि खात्यापेक्षां युद्धखात्यावरच अधिक खर्च करणें भाग पडत आहे. त्याबद्दल सर जान सायमन यांनीं पार्लमेंटमध्यें मोठी हळहळ व्यक्त केली §

---

* We abhor any appeal to force except for repulse of aggression, but we say to all the world that in the Western Hemisphere the institutions of Democracy and Government with the consent of the governed must and shall be maintained.

§ Our armaments, vast as they are, are armaments of defence and defence alone and if it be true that others have no more intention of aggression than we have, then the conclusion we must come to is that we are all piling up these ruinous armaments under a misunderstanding.

§ It is deplorable, grievous and horrible that so large a part of the world resources should be devoted for the armament

## दररोज १० लाख पौंड

इंग्लंड केवळ शस्त्रवाढीसाठीं खर्च करीत आहे. त्यानें पुढील पांच वर्षांत १२० कोटी पौंड खर्चण्याची योजना यंदाच्या अंदाजपत्रकांत केली आहे, जपाननें चहा, कॉफी, फळें फार काय बंगले व मेजवान्या यांवरहि यंदा कर बसवून २० कोटि येन प्रजेपासून उकळण्याचें योजलें आहे. अमेरिकेचें अंदाजपत्रक ९ अब्ज डॉलरांचें; त्यांतील १ अब्ज १० कोटि डॉलर केवळ 'संरक्षण-खात्याला' जाणार. अमेरिकेनें ११० कोटि डॉलरांचें युद्ध-बजेट तयार केलें असून त्याशिवाय दोन वर्षांत विमानवृद्धि झपाट्यानें करण्यासाठीं ५५ कोटि डॉलर काढून ठेवले आहेत. रशियानें आपल्या खर्चापैकीं शें. २० म्हणजे ४०० कोटि डॉलर शस्त्रवृद्धीसाठीं काढून ठेवले आहेत. रशियाच्या युद्धखात्याचे कमिशनानें असें चक्क सांगितलें आहे कीं, 'आमचें सैन्य सर्वांपेक्षां अधिक यंत्रसंपन्न आहे; केव्हांहि आमची फत्तेच होणार!* अशा असंख्य द्रव्य-धारा अविरत ओतून जें तें राष्ट्र-युद्धाला तोंड देण्यासाठीं शस्त्रसंपन्न होत आहे. सतरा वर्षांपूर्वी 'वाशिंग्टन परिषदेंत' अमेरिकेनें गुआम बंदराचा बंदोबस्त करणार नाहीं असें अभिवचन दिलें होतें, पण आतां तें मोडून बंदोबस्ताला सुरवात झाली आहे, हें युद्धाच्या आगमनाचेंच गमक नव्हे काय? जपान फिलिपाइन्सवर झडप टाकील म्हणूनच ही तरतूद असावी असा अंदाज आहे. त्याच परिषदेंत रशियानें संपूर्ण निःशस्त्रीकरण करण्याची सूचना पाठविली होती, पण ती नियमबाह्य ठरविण्यांत आली व शस्त्रनियमनाचीच भाषा सुरू झाली. कोणत्या राष्ट्राजवळ किती युद्धसामुग्री सज्ज आहे याची कल्पना पुढील कोष्टकावरून येईल.

---

* "Soviet Russia to-day has the most highly mechanized army in the world. We will be victorious in any war in which we are compelled to participate."

## युद्ध–सामुग्रीची तुलना

| देश | खडें सैन्य | | राखीव शिक्षित सैन्य | | राखीव अर्धशिक्षित सैन्य | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाख | हजार | कोटि | लाख | कोटि | लाख |
| इंग्लंड | २ | १६ | ० | $१\frac{१}{२}$ | ० | २ |
| रशिया | २५ | ० | १ | ८० | १ | ३० |
| फ्रान्स | ७ | ० | ८ | ० | ० | ५५ |
| जर्मनी | ७ | ० | ७ | ८५ | ० | २२ |
| इटाली | ६ | ० | ० | ० | ० | ६५ |

विमान–दलाच्या खालोखाल आरमाराचें महत्त्व रहाणार. १९२१ सालीं वाशिंग्टन येथें आरमार परिषद भरली आणि लढाऊ जहाजांची संख्या नियमित करण्यांत आली. कोणत्या देशानें किती जहाजें ठेवावीं याचें प्रमाण त्या परिषदेंत ठरविण्यांत आलें तें पुढीलप्रमाणें—

अमेरिका—५, इंग्लंड—५,—जपान—३, फ्रान्स—१·६६, इटाली –१·६६. १९३६च्या लंडन येथील तहानें ३५००० टनांहून अधिक वजनाचीं जहाजें बांधूं नयेत असें ठरलें. पण या सर्व करारांची व परिषदांची फलश्रुति आजमितीला काय दिसून येते? सध्यां जगांतील आरमारी सामर्थ्य पुढीलप्रमाणें आहे.

## आरमारी सामर्थ्य

| देश | जहाजें | टन |
|---|---|---|
| अमेरिका | ४०३ | १४०८४२५ |
| इंग्लंड | ३८१ | १७५७७४३ |
| जपान | २३६ | ९५७००० |
| फ्रान्स | २०० | ६४८००० |
| इटाली | २९१ | ६२४००० |
| जर्मनी | १३९ | ४३९००० |

खुद्द अमेरिकेनें आतां ३५ हजार टनावरील जहाजें बांधण्यास सुरवात केलीच आहे! अशा स्फोटक परिस्थितींत महायुद्ध न होईल तरच आश्चर्य, होणें हें अगदीं स्वाभाविक.

# ६

# इंग्लंडची वाढती क्षीणता

ब्रिटिश साम्राज्याचा तंबू सर्व जगभर जो उभा आहे, त्याला कारण ठिकठिकाणीं असलेल्या वसाहतींच्या मेखा शाबूत आहेत हें होय. पण आतां एक एक मेख ढिली होऊन जमिनीवर पडत आहे व त्यामुळें चोहों-बाजूंचे तणावे सुटून मोठा घोळ उत्पन्न होत आहे. प्रत्येक वसाहतींत स्वराज्याचें व स्वयंनिर्णयाचें वारें आगेमागें पण शिरलें असल्यानें तेथील प्रजाजन आपल्या हक्कांची मागणीच काय पण अंमलबजावणीहि करूं लागले आहेत आणि त्यांना विरोध करण्याची शक्ति इंग्लंडच्या अंगीं नसल्यानें त्या त्या हक्कांना मान तुकविणें इंग्लंडला भाग पडत आहे.

ब्रिटिश साम्राज्याची टोलेजंग इमारत कोसळून पडूं नये म्हणून तिची डागडुजी करण्याचें काम बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. ब्रिटिश साम्राज्यां-तील राष्ट्रांना दृढ अशा प्रेमरज्जूनें निगडित करावें या हेतूनें १८८४ सालीं ' इंपीरिअल फेडरेशन लीग ' नांवाची संस्था अस्तित्वांत आली. तिच्या कांहीं सभा भरल्या व सैन्याच्या खर्चासंबंधीं आणि व्यापारांतील साटेंलोटें ( Reciprocal ) धोरण ठेवण्यासंबंधीं कांहीं योजना झाल्या. पण १० वर्षांतच ती संस्था विलयास गेली. तथापि तिनें आपला वंश दोन संस्थांच्या रूपानें चालू ठेवला. सैन्याच्या खर्चाचा विचार करण्यासाठीं ' इंपीरिअल डिफेन्स कमिटी ' निर्माण झाली. आणि दुसरें अंग जें व्यापाराचें, त्यासाठीं ' युनायटेड एम्पायर ट्रेड लीग ' या संस्थेची प्राण-प्रतिष्ठा करण्यांत आली. तिची फलश्रुति म्हणूनच कीं काय, ब्रिटिश

मालाला जादा सवलत ( Preferential Treatment ) देण्याचें तत्त्व न्यूझीलंड आणि दक्षिणआफ्रिका यांनीं १९०३ सालीं व ऑस्ट्रेलियानें १९०७ सालीं अमलांत आणलें. कॅनडानें १८९८ सालींच ती सवलत दिली होती आणि १९०७ मध्यें ती अधिकच वाढविली. १९११ मध्यें पहिली साम्राज्य-परिषद् भरविण्यांत आली आणि त्यानंतर तिच्या सभा अडी-अडचणीच्या वेळेस भरविण्यांत येत आहेत. त्या प्रत्येक सभेंत वसाहतीच्या स्वातंत्र्याची लाट पुढें पुढेंच जात आहे आणि त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याचा अधिकार मागेंमागें हटत आहे. १९१३ सालापासून ' इंपीरिअल डिफेन्स कमिटी ' मध्यें वसाहतीचे प्रतिनिधी घेण्यांत आले आणि वसाहतींतील न्यायाधिशांना प्रिव्ही कौन्सिलाच्या ज्युडिशिअल कमिटींत बसण्याचा हक्क मिळाला.

गेल्या वर्षापर्यंत वसाहतींतील कायदे हे दुय्यम समजले जात; त्यांच्यावर अखेरची सत्ता ब्रिटिश पार्लमेंटाची चाले. त्या पार्लमेंटाला वसाहतीकरितां कायदे करण्याचा अखत्यार असे. उलट वसाहतीनें मंजूर केलेल्या कायद्यावर ' व्हेटो ' चा सोटा उगारण्याची सत्ताहि गव्हर्नर-जनरलाला दिलेली असे. त्याशिवाय बादशहाच्या पसंतीकरितां म्हणून एखादा कायदा खुंटीला अडकवून ठेवण्याचा अधिकारहि ब्रिटिश पार्लमेंटाला असे. परराष्ट्रसंबंधाचें खातें तर वसाहतींना वर्ज्यच मानलें जात होतें. परंतु गेल्या ५-६ वर्षांपासून हा सर्व मनु पालटूं लागला. १९२६ सालीं बाल्फोरनें एक प्रसिद्ध तत्त्व प्रगट केलें. तें हें कीं, वसाहती या स्वयंसत्ताक असून त्यांच्यांत तरतमभाव असा मुळींच नाहीं. जो तो आपआपल्या नशिबाचा धनी होय. अर्थात् हिंदुस्थान देशाला या औदार्यांतून वगळण्यांत आलें होतें ! कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, आयरिश फ्रीस्टेट आणि न्यूफाऊंडलंड यांना या सर्व अधिकारांचीं वस्त्रें मिळालीं. वसाहतीच्या गव्हर्नर-जनरलाची नेमणूकदेखील बादशहाच्या हातीं न राहतां वसाहतीच्या इच्छेवर राहिली आणि त्या अधिकाराची अंमलबजावणी ऑस्ट्रेलियानें केली देखील. तेथल्या मुख्य प्रधानाच्या सल्ल्यावरून एका ऑस्ट्रेलियन माणसाची नेमणूक गव्हर्नरजनरलाच्या जागीं करण्यांत आली. तिला

ब्रिटिश प्रधान मंडळाच्या संमतीची जरुरी भासली नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटाचा कोणताहि कायदा आपल्या वसाहतीपुरता बदलण्याचा किंवा अजीबात रद्द करण्याचा अधिकार वसाहतींना १९३१ सालच्या वेस्टमिन्स्टर कायद्यान्वयें मिळाला आहे. हा कायदा म्हणजे एक प्रकारें साम्राज्याचें मृत्युपत्रच होय ! (हा परिशिष्टांत दिला आहे.) उलट वसाहतींनीं मागणी केल्याशिवाय व संमति दिल्याशिवाय ब्रिटिश पार्लमेंटाला स्वतः कोणताहि कायदा त्यांच्यावर लादतां येत नाहीं. कायदे करण्याच्या या अधिकाराची कुऱ्हाड चालवून वसाहतींना साम्राज्याचे संबंध सहज तोडतां येतील. अशा प्रकारें ब्रिटिश साम्राज्याच्या वसाहती तत्त्वतः विभक्त झालेल्या असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्य हें आज जगांतून उठलें म्हटलें तरी चालेल.

वसाहतींना एकेक अधिकार मिळत गेल्यानें आज 'वसाहतीचें स्वराज्य' व 'पूर्ण स्वातंत्र्य' यांमध्यें फारच थोडें अंतर राहिलें आहे. १९२५ च्या लोकार्नो करारांत असें कलम घालण्यांत आलें कीं, इंग्लंडनें केलेले करार वसाहतींना बंधनकारक नाहींत. त्याच्या पुढील वर्षींच वसाहतींच्या समानतेची स्पष्ट व्याख्या करण्यांत येऊन त्यांच्या स्वराज्याची कक्षा स्वातंत्र्यांशीं प्रायः समव्याप्त करण्यांत आली.* अंतर्गत व परकीय अशा सर्व कारभारांत वसाहतींची संपूर्ण स्वायत्तता मान्य केलेली असली, तरी राजाशीं एकनिष्ठ राहण्याचें व ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें नांदण्याचें बंधन या व्याख्येंत समाविष्ट आहे. पण साम्राज्याच्या मगरमिठींतून मुक्त झालेल्या राष्ट्रांना हीहि रेशमी गांठ नकोशी वाटूं लागली. आयर्लंडनें राजनिष्ठेचा निर्बंध तोडून टाकला व दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रधान जनरल हर्टझॉग यांनीं इच्छेस येईल तेव्हां ब्रिटिश कॉमनवेल्थमधून फुटून निघण्याचाहि हक्क वसाहतींना मिळावा अशी मागणी केली.

---

* Dominions are autonomous communities within the British Empire, equal in status, in no way subordinate to one another in any respect of their domestic or external affairs, though united by common allegiance to the Crown and freely associated as members of the British Commonwealth.

१९२६ व १९३० या सालांमध्यें भरलेल्या साम्राज्य–परिषदांतील कांहीं ठरावांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं १९३१ सालीं 'वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूट' तयार करण्यांत आला. तेराव्या शतकांतील महाशासनपत्रा-(Magna Charta) नें इंग्लंडांतील राजेशाहीला जसें मर्यादित केलें, तसें विसाव्या शतकांतील या 'वेस्ट मिन्स्टिर कायद्यानें' ब्रिटिश साम्राज्य-शाहीला संपुष्टांत आणलें. हा कायदा कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, आयरिश फ्री स्टेट व न्यूफाउंडलंड यांनाच लागू आहे. हिंदुस्थानाला खड्यासारखा त्यांतून वगळला आहे; एवढेंच नव्हे तर १९३५ सालच्या 'हिंदुस्थान सरकारच्या' सुधारणा–कायद्याला 'वसाहतीचें स्वराज्य' या शब्दाचा स्पर्शहि होऊं दिलेला नाहीं. 'वेस्टमिन्स्टर' कायद्यानें साम्राज्यांतील आपली राजकीय सत्ता गेली तर जावो, पण प्राण-भूत असलेली व्यापारी सत्ता तरी टिकावी म्हणून इंग्लंडनें पुढील वर्षींच, म्हणजे १९३२ सालीं, ओटावा येथें एक आर्थिक साम्राज्य परिषद भर-विली व आपल्याला व्यापारविषयक सवलती मिळविल्या. त्यांच्या बळावर इंग्लंडला जर्मनी, जपान वगैरे परराष्ट्रापेक्षां कमी जकातीनें आपला माल वसाहतींत नेऊन विकतां येऊं लागला. साम्राज्याचा कोलमडून पडणारा डोलारा सांवरून धरण्याचा हा एक प्रयत्न होता इतकेंच.

महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत त्याचा व्यापार वाढत्या प्रमाणावर होता, तो १९२० सालापर्यंत तसाच वाढत गेला; पण त्यानंतर मात्र तो एकसारखा घसरगुंडीसच लागला. हा व्यापारी ऱ्हास पुढील आंक-ड्यांमध्यें दिसून येतो.

इंग्लंडचा वार्षिक व्यापार. पौंड

| सन | कोटि | सन | कोटि |
|---|---|---|---|
| १७९१ | ३ | १९२० | ३४९ |
| १८९१ | ७ | १९२१ | १८९ |
| १९१३ | ११७ | १९३० | १५२ |

१९१३ सालापेक्षां १९३० साळीं व्यापाराचें उत्पन्न ३५ कोटि पौंडांनीं

वाढलेलें दिसलें, तरी मालाच्या किंमती वाढल्यामुळें मालाचें प्रमाण निर्यातींत शें. ३२ नें व आयातींत शें. १३ नें कमीच झालें. व्यापारांत घट पण खर्चांत वाढ होत असल्यामुळें एकाद्या माणसाची आजारीपणांत प्राप्ति तुटावी पण डॉक्टराचें बिल मात्र वाढावें तशी ओढाताण इंग्लंडची झाली आहे. या ओढाताणीचें एक ठळक उदाहरण म्हणजे इंग्लंडला सुवर्ण-परिमाण सोडावें लागलें. ता. २१ सप्टेंबर १९३१ रोजीं इंग्लंडचा पौंड, पदभ्रष्ट राजाप्रमाणें, निष्कांचन होऊन जो सैरावैरा पळत सुटला आहे, तो अजून आपल्या मुक्कामाला परत आला नाहीं.

लष्करी दृष्टीनें पाहिलें तर सध्यां तरी ब्रिटिश साम्राज्य हें 'बडा घर, पोकळ वासाच ' ठरेल. १९१४ सालाप्रमाणें युरोपखंडांत लढण्याला पाठविण्याइतकें सैन्य आज इंग्लंडजवळ नाहीं. १९१४ सालीं ३ लाख ४८ हजार राखीव सैन्य इंग्लंडजवळ होतें, पण आतां तीन लाखांच्या आंतच आहे. रोजीं शेंकडों विमानें तयार करण्यास सज्ज झालेला जर्मनी कोठें व विमानांचे कारखाने उघडण्यास आतां सुरुवात करणारें इंग्लंड कोठें! इंग्लंडजवळ आहेत तीं विमानें जुन्या पद्धतीचीं, कमी वेगाचीं व निरुपयोगी. विमानी हल्ल्याचा प्रतिकार करण्याची तयारीहि फारच अपुरी आहे. या दौर्बल्यामुळें सर नेव्ही चेंबर्लेन यांना हिटलेरच्या खाटीक–कामांत मदतनीस बनावें लागलें.

शस्त्रास्त्रासाठीं होणारा खर्च वीस वर्षांत जवळजवळ दुप्पटीवर गेला. एकट्या इंग्लंडची स्थिति पाहिली तरी, १९३२ सालीं तेथें १० कोटि ४० लक्ष पौंड या कामावर खर्च होत. पण १९३६ सालीं तो खर्च १६ कोटि पौंडांवर जाऊन पोंचला. शिक्षणासाठीं खर्च होणाऱ्या रकमेच्या सुमारें तिप्पट हा खर्च आहे. याशिवाय गेल्या महायुद्धाचें प्रायश्चित्त म्हणून दरसाल सुमारें ३५ कोटि पौंड राष्ट्रीय कर्ज इंग्लंडला फेडावें लागतें तें निराळेंच! महायुद्धांत इंग्लंडनें अमेरिकेपासून ४६० कोटि डॉलरांचें कर्ज काढलें. जर्मनी वगैरे ज्या राष्ट्राकडून इंग्लंडला फेड व्हावयाची होती, त्यांपैकीं बहुतेकांनीं खाका वर केल्याः पण इंग्लंडला अमेरिकेचें जें प्रचंड कर्ज द्यावयाचें आहे, तें त्याला इभ्रतीसाठीं नाकारतां

येत नाहीं आणि पैशाच्या चणचणीमुळें देतांहि येत नाहीं. महायुद्धानंतर जगांतील सुवर्णाचें पाट कर्जफेडीसाठीं अमेरिकेकडे वाहूं लागले आणि त्यामुळें अमेरिका अक्षरशः सुवर्ण–भूमि झाली. महायुद्धापूर्वी १९१३ सालीं १९२ कोटि ४० लाख डॉलर किंमतीचें सोनें जी अमेरिका बाळगून होती, तिच्याजवळच १९२४ सालीं ४४९ कोटि ९० लक्ष डॉलर किंमतीचें सोनें, म्हणजे साऱ्या जगांतील सुवर्णसंचयाचा निम्मा भाग, सांठलेला होता.

## जगातील सध्यांचा सुवर्ण—संचय

| देश | शेंकडा प्रमाण | देश | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| अमेरिका | ५८ | स्वित्झलँड | ३ |
| इंग्लंड | ११ | अर्जेंटाइन | २ |
| हॉलंड | ४ | स्वीडन | १ |
| बेल्जम | २ | हिंदुस्थान | १ |
| फ्रान्स | १० | इतर देश | ८ |

इंग्लंडच्या आर्थिक नाड्या अमेरिकेनें आखडलेल्या असल्यानें त्याचें राजकारण, किंबहुना साम्राज्यहि, अमेरिकेच्या तंत्रानेंच चालतें.§ झालेल्या युद्धाचें कर्ज डोईजड झालेलें आणि येणाऱ्या युद्धासाठीं होणारा शस्त्रास्त्रांचा खर्च भूमितिश्रेढीनें वाढत असलेला—अशा आर्थिक दौर्बल्यानें ग्रासलेल्या इंग्लंडला आपल्या अंकित देशावर पूर्वीइतकी शिरजोरी चालवितां येत नाहीं–साम्राज्यांतील देशांच्या मागण्यापुढें नमतें घेऊन, जरूर तेव्हांच पण, एक एक हक्क देणें ब्रिटिश सत्तेस भाग पडत आहे.

म्यूनिच येथील करारनामा झाल्यापासून ब्रिटिश, फ्रेंच व रशियन राष्ट्रांच्या सरकारांनीं युद्धाची तयारी वाढविली आहे असें बर्लिनमधील एका जबाबदार लष्करी अधिकाऱ्यानें प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें पुढीलप्रमाणें लढाईच्या सामुग्रीची सिद्धता आहे—

§ The British Empire is becoming mortgaged to the United States. —*Daily Mail*.

| | सैन्य | विमानें | टँक |
|---|---|---|---|
| ब्रिटन | २०००००० | ६००० | ६०० |
| फ्रान्स | ६१००००० | ५००० | ४५०० |
| रशिया | ११०००००० | ९००० | ६००० |

इंग्लंडच्या विमानांची संख्या ६ हजारांवरून १० हजारांवर लवकरच जाईल म्हणतात. हे आंकडे खरे मानले तर जर्मनी—इटाली या युद्ध–पिपासु राष्ट्रांशीं टक्कर देण्याला समर्थ काय तो रशियाच दिसतो. एक कोटीवर सैनिक त्याच्या सैन्यांत उभे असून तोफा–विमानेंहि फ्रान्स-इंग्लंडपेक्षां अधिक आहेत. त्यामुळें इंग्लंड–फ्रान्सला हिटलर–मुसोलिनीच्या बकासुरी अत्याचारांना तोंड देण्यासाठीं साम्यवादी रशियाशींहि संगनमत करावें लागेल आणि तसें होणें असंभवनीय नाहीं. जगाच्या बाजारांत कोण कोणाचा केव्हां सांगाती होईल याचा नेम नसतो. फ्रान्स व इंग्लंड यांचें हाडवैर शतकानुशतकाचें, पण आतां ते बनले आहेत पाठचे भाऊ. खुद्द रशियाशीं इंग्लंडनें व्यापारी तह केलाच कीं! तसाच व्यापारी तह कॅनडानें जर्मनीशीं व ऑस्ट्रेलियानें जपानशीं केलेला आहेच. तेव्हां युद्धाच्या आंचीनें इंग्लंड व रशिया हे सांधले जाणें संभवनीय नाहीं असें कोण म्हणेल?

राजकीय व आर्थिक या दोन्ही दृष्टींनीं पाहिलें तरी ब्रिटिश साम्राज्याचा विराट वटवृक्ष आज डळमळत आहे, जगाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पसरलेल्या त्याच्या मुळ्या तुटलेल्या आहेत आणि महायुद्धाचा झंझावात सुरू होतांच जमीनदोस्त व्हावें अशी दुर्बल स्थिति लष्करी दृष्ट्याहि त्याची झालेली आहे. १९ व्या शतकांत गोऱ्या राष्ट्रांनीं काळीं राष्ट्रें पादाक्रांत केलीं आणि विसाव्या शतकांत त्यांची वाटणी करण्याचें कार्य सुरू झालें आहे. ती होतांना गोरीं राष्ट्रें एकमेकांशीं भांडतील हें निश्चित. जर्मनीला इंग्लंडच्या हातून आपल्या वसाहती परत मिळवावयाच्या आहेत, इटालीला इजिप्त आणि पॅलेस्टाइन या देशांत आपलें आधिराज्य स्थापून इंग्लंडच्या आरमाराची भूमध्यसमुद्रांतून हकालपट्टी करावयाची आहे आणि जपानला चीन व हिंदुस्थान या देशांतून इंग्रजांचें

उच्चाटन करून व आस्ट्रेलियासारख्या इंग्लंडच्या वसाहती हस्तगत करून आपल्या व्यापाराला व लोकांना निर्वेध क्षेत्र मिळावावयाचें आहे.

मुसोलिनी– हिटलर यांनीं असें स्वच्छपणें जाहीर केलें आहेकीं, आमच्या देशांत वाढत्या प्रजेला रहावयास जागा नाहीं, म्हणून नवे नवे प्रदेश जिंकणें हें आमचें कर्तव्य आहे. ऑस्ट्रेलियासारखे अत्यंत विरळ वस्तीचे व विपुल सृष्टिसंपत्तीचे देश पाहिले म्हणजे आपल्या देशांत कोंडमारा होत असलेल्या प्रजेला असे प्रदेश रहावयास मिळावे अशा आशेचें पाणी तोंडाला सुटणें व हातांतील हत्याराच्या जोरावर ती आशा पूर्ण करावयास धांवणें या हिटलरच्या धोरणांत अमानुष किंवा अनैसर्गिक काय आहे ? महायुद्धानंतर बळजबरीनें आपल्या ज्या वसाहती छिनावून घेतल्या गेल्या, त्या परत मिळवाव्या म्हणजे तेथें आपल्या वाढत्या लोकसंख्येला वाट करून देतां येईल व तेथील कच्चा माल आपल्या उद्योगधंद्यांची भरभराट करील असें मनोराज्य हिटलरसारख्या सामर्थ्यवान् भीम–राजानें करूं नये तर कोणी करावें ? " गोरेलोक हे जगावर अधिराज्य करण्यासाठींच जन्मास आले आहेत व त्यांचा तो जन्मसिद्ध हक्क आहे, त्यांना तशी नैसर्गिक प्रेरणा आहे "* असें १९३६ सालीं त्यांनीं जे दर्पोद्गार काढले, त्यांच्या बुडाशीं वाढत्या लोकसंख्येचीच प्रेरणा खेळत होती हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. लोकवस्ती व भूप्रदेश यांच्या प्रमाणांत किती भयंकर विषमता आहे हें पहा.

## लोकवस्तीची घनता

( प्रत्येक चौरस मैलामध्यें माणसें )

| | | | |
|---|---|---|---|
| न्यू फाउंडलंड | १·७ | न्यूझीलंड | १५ |
| दक्षिण आफ्रिका | १७ ४ | आयर्लंड | ११३ |
| ऑस्ट्रेलिया | २·३ | रशिया | १९ |
| कॅनडा | २·८ | चीन | १०४·३ |

* The white race is destined to rule. It has the unconscious urge to rule.

| | | | |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | १९५ | जपान | ३५९ |
| अमेरिका | ३३ | जर्मनी | ३३७ |
| फ्रान्स | १९२ | इटाली | ३५७ |
| सयाम | ५९·७ | इंग्लंड | ४८६ |
| इंडो–चायना | ७५ | हॉलंड | १३५ |
| मलाया | ८१·८ | बेल्जम | १४४ |

भू–गोलाच्या या विषम वाटणीमुळें वाढत्या लोकसंख्येचे देश युद्धाला प्रवृत्त होणार यांत संशय नाहीं.§

भांडवलशाही राष्ट्रांना आपल्या मालाला बाजारपेठ मिळत रहावी म्हणून परक्या देशावर सत्ता चालविणें अवश्य वाटतें. दिवसेंदिवस प्रत्येक देशांतील कारखाने वाढत चालल्यानें त्यांतील उत्पादनहि वाढत्या प्रमाणावर आहे. आतांपर्यंत गिऱ्हाईक असलेलीं राष्ट्रेंहि स्वतः कारखाने काढून निरनिराळ्या पदार्थांच्या बाबतींत स्वावलंबी बनत आहेत. १९२९ पासून आर्थिक मंदी घर करून राहिली आहे हें त्याचेंच गमक. रशियानें तर सारीच उलटापालट केली आहे. दहा वर्षांपूर्वी परदेशांतून गहूं आणणारा तो देश आतां परदेशासच गहूं पाठवूं लागला आहे. तीच स्थिति यंत्रांची व शस्त्रांची. परतंत्र हिंदुस्थानाची गोष्ट घेतली तरी गेल्या महायुद्धापर्यंत हिंदुस्थानांत जेवढें गिरणीचें कापड खपे, त्याचा ⅔ हिस्सा परदेशांतून व त्यांतहि मुख्यतः इंग्लंडांतून येत असे; पण १९३४ सालीं शें. ५७ हिंदी गिरण्यांतून, शें. २८ हातमागावरील व फक्त शें. १५ जपान–इंग्लंड वगैरे परदेशचा असा कापड–माल हिंदुस्थानांत खपला. त्या वर्षीं हिंदुस्थानांतील खपलेल्या पोलादापैकीं शें. ७५ हिस्सा हिंदुस्थानांतच तयार झालेला होता. साखरेच्या बाबतींतहि हिंदुस्थान प्रायः स्वयंपुष्टच आहे. कापडाचे ४०–५० कोटि व साखरेचे २० कोटि असे ६०–७० कोटि रुपये हिंदुस्थानांतून व्यापाराच्या निमित्तानें हरण करून नेणें

§ German war preparation has been necessitated by the narrow economic imperialism of the British. --*Berens*.

इंग्लंडसारख्या परराष्ट्रास अशक्य झालें. याचें मुख्य श्रेय म. गांधींची खादीची चळवळ व स्वदेशीचा प्रसार यांस आहे अशी साक्ष मि. लिऑनार्ड बार्नेस यासारखे ग्रंथकार देत आहेत.

पण हिंदुस्थानांतील धंद्यांना संरक्षण देऊन त्याची औद्योगिक वाढ करण्यांतहि ब्रिटिश राज्यकर्त्यांचा स्वार्थी हेतु आहे हें विसरतां कामा नये. हुंडणावळीचा भाव लोकमताविरुद्ध अट्टाहासानें अठरा पेन्स ठेवून व व्याज, पेन्शन वगैरेंच्या रूपानें दरसाल दोनशें कोट रुपयांची लूट मारून ब्रिटिश राजवटीनें हिंदुस्थानाचें इतकें भयंकर अर्थशोषण केलें कीं, जीवनाच्या आवश्यक वस्तुहि खरेदी करण्याचें त्राण हिंदी जनतेंत राहिलें नाहीं. सोन्याची अंडीं घालणाऱ्या हंसीची हत्याच करण्याइतका कोता स्वार्थ इंग्रजाच्या चित्तांत नाहीं. आपल्याला हिंदुस्थानाची गिऱ्हाईकी कायमची लाभावी म्हणून तेवढ्यापुरती ऐपत हिंदुस्थानांत निर्माण करण्याची खबरदारी ब्रिटिश सरकार घेत असतें. गाईच्या आंचळांतून दुधाऐवजीं रक्तच निघूं लागलें तेव्हां तिला सकस चारा घालण्यांतलाच हा प्रकार! हिंदुस्थानांतील लोकांजवळ पैसा खेळता राहिला तरच त्यांच्याकडे आपला माल खपेल हें जाणून हिंदी जनतेला किंचित् संपन्न करणारें औद्योगिक धोरण ब्रिटिश सरकारानें महायुद्धांनंतर आंखलें. या धोरणाचे धागेदोरे महायुद्धाच्या काळापर्यंत गेलेले आहेत. १९१६ सालीं 'इंडस्ट्रिअल कमिशन' नेमण्यांत आलें व हिंदुस्थानांत उद्योगधंदे वाढीस कसे लावतां येतील याची पहाणी करण्याचें काम त्याजकडे सोंपविण्यांत आलें. दोन वर्षें चौकशी करून कमिशननें अशा शिफारशी केल्या कीं, सरकारानें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाला उत्तेजन द्यावें. शेतींत सुधारणा कराव्या व धंद्यांना संरक्षण द्यावें.

यानंतर मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्ट आला. त्यांत असें स्पष्टच म्हटलें आहे कीं, "हिंदुस्थानाला अधिक स्थैर्य आणण्याकरितां तेथें औद्योगिक सुधारणा करणें अत्यंत जरूरीचें आहे. तेथल्या विपुल खनिज संपत्तीचा फायदा घेणें

## साम्राज्यशाहीच्या दृष्टीनेंसुद्धां

हिताचें आहे. उद्योगसंपन्न हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्यांत बहुमोल भरच टाकील हें जाणून तेथें औद्योगिक वाढ घडवून आणण्याची जबाबदारी सरकारनें शिरावर घेतली पाहिजे."

यानंतर १९२१मध्यें सर इब्राहिम रहिमतुल्ला यांचे अध्यक्षतेखालीं फिस्कल कमिशन नेमण्यांत आलें. त्या कमिशननें संरक्षक जकाती बसविण्याची शिफारस केली. ती मान्य करून सरकारनें १९२३ पासून खुल्या व्यापाराचें (लोकमतास न जुमानतां हट्टानें वर्षानुवर्षें चालविलेलें) धोरण बदललें आणि संरक्षक जकाती बसविल्या. त्याच वर्षी टॅरिफ् बोर्डाची नेमणूक करण्यांत आली. त्याच्या पुढील वर्षी 'स्टील प्रोटेक्शन बिल' पास झालें आणि हिंदुस्थानांतील लोखंडी धंद्याला संरक्षण मिळालें. त्याशिवाय त्या धंद्याला सरकारनें देणगीहि( Bounty) दिली. असेंच संरक्षण साखरेलाहि देण्यांत आलें; आणि कागद, काड्याच्या पेट्या, काच, साबण, सिमेंट वगैरे धंदेहि संरक्षित करण्यांत आले. कच्च्या मालाचें कोठार म्हणून हिंदुस्थानचा इंग्लंडला उपयोग होण्याचे दिवस संपले. तेव्हां हिंदुस्थानानेंच पक्का माल तयार करून आपला फायदा करून घेण्याचें धोरण ब्रिटिश साम्राज्यशाहीनें आंखलें. यामुळें हिंदी जनतेच्या हातांत पैसा खेळूं लागला आणि तिची क्रयशक्ति वाढली. याचा परिणाम इंग्लंडचा माल खपण्यांतच होतो. जपानसारख्या राष्ट्रांची स्पर्धा हाणून पाडण्यासाठीं ब्रिटिश मालाला जादा सवलती ( Preferencial treatment ) देण्यांत आल्या आहेत.

हा झाला राजरोस फायदा. पण याशिवाय मागच्या चोरदरवाज्यानेंहि हिंदुस्थानची लूट करण्याचे पद्धतशीर प्रयत्न चालू आहेत. संरक्षक जकातींचा फायदा आपल्याला मिळावा म्हणून इंग्लंडांतील व्यापारी हिंदुस्थानांत भांडवल घालूं लागले आहेत आणि येथल्या स्वस्त मजुरीवर कारखाने चालवूं लागले आहेत व त्या कामीं कांहीं माजी व्हाईसरॉयहि पुढाकार घेत आहेत!

अशीच उद्योगधंद्यांची वाढ इतरहि गिऱ्हाईकी राष्ट्रांत झाल्यानें त्यांचें द्रव्यापहरण करण्यास सवकलेल्या व त्यावर जीवंत रहाणाऱ्या इतर भांडवलवाल्या राष्ट्रांच्याहि नाड्या आंखडत चालल्या आहेत. याचा परिणाम म्हणजे बाजारपेठा हस्तगत करण्यासाठीं भांडवलवाल्या राष्ट्रांत झोंबाझोंबी सुरू होणें. तशा झोंबाझोंबीचा काळ डोळ्यावर कातडें ओढून कितीहि पुढें ढकलला, तरी तो आतां जवळ आला आहे हें निश्चित.* शस्त्रास्त्रवाढीसाठीं प्रत्येक मातबर राष्ट्राचा होणारा विराट खर्च हें त्याचेंच एक गमक. तात्कालिक निमित्त कोणतेंहि घेतलें तरी, **वाढत्या लोकसंख्येचा व घटत्या व्यापाराचा असे दोन प्रश्न भांडवल-वाल्या राष्ट्रांना युद्धाच्या होमकुंडाकडे ढकलीत नेत आहेत.**

---

§ The drive of imperialism to war has reached an extreme stage of intensity.

—*R. Palme Dutt.*

# परिशिष्ट

## वेस्ट मिन्स्टर कायदा

ज्याअर्थी १९२६ व १९३० या सालीं वेस्ट मिन्स्टरमध्यें भरलेल्या साम्राज्यपरिषदेंत युनायटेड किंग्डम, डोमिनिअन ऑफ कॅनडा, कॉमन-वेल्थ ऑफ् ऑस्ट्रेलिया, डोमिनिअन् ऑफ् न्यूझीलंड, यूनिअन ऑफ साउथ आफ्रिका, आयरिश फ्री स्टेट व न्यूफाउंडलंड यांमधील सरकारच्या प्रतिनिधींचे सदर परिषदांच्या अहवालांतील ठराव व घोषणांचे बाबतींत ऐकमत्य आहे,

ज्याअर्थी या कायद्याला पुढील सरनामा असणें योग्य आहें,

ज्याअर्थी बादशहा हा ब्रिटिश कॉमनवेल्थ ऑफ नेशन्सच्या सभासदांच्या स्वतंत्र सहकारी घटकाचें प्रतीक आहे आणि ज्या अर्थी ते सर्व बादशहाच्या सरकारशीं एकनिष्ठेनें एकत्रित झाले आहेत त्याअर्थी कॉमन-वेल्थच्या सभासदांच्या प्रस्थापित सनदशीर घटनेप्रमाणें हें सुसंगत आहे कीं, बादशहाच्या गादीचा वारस किंवा दरबारी मान किवा पदव्या याबाबत कोणत्याहि स्वरूपाचा फरक करणें झाल्यास युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटप्रमाणें सर्व वसाहतींच्या पार्लमेंटांचीहि संमति असणें आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्थापित सनदशीर घटनेप्रमाणें युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटनें अतःपर केलेला कोणताहि कायदा त्या वसाहतींची विनंति व संमति यावांचून केला असल्यास त्याला वरील वसाहतींच्या कायद्यामध्यें स्थान मिळणार नाहीं,

ज्या अर्थीं सदर परिषदेंतील घोषणा व ठराव यांच्यांपैकीं कांहींना संमति देणें, ते कायम करणें व प्रस्थापित करणें यासाठीं युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटच्या अधिकारांत कायदा करून त्याला योग्य स्वरूप देणें अगत्याचें आहे,

ज्याअर्थीं डोमिनिअन ऑफ् कॅनडा, कॉमनवेल्थ ऑफ् ऑस्ट्रेलिया, डोमिनिअन् ऑफ् न्यूझीलंड, यूनिअन ऑफ साउथ आफ्रिका, आयरिश फ्री स्टेट व न्यूफाउंडलंड या सर्वांनीं व्यक्तिशः या कायद्यांतील पुढील बाबींसंबंधीं व्यवस्था करण्यास युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटला ठराव मांडण्याची विनंति व संमति दिली आहे,

त्याअर्थीं प्रस्तुत भरलेल्या पार्लमेंटमध्यें व तिच्या अधिकारांत पुढील स्वरूपाचा कायदा हाऊस ऑफ् लॉर्डस व हाऊस ऑफ कॉमन्स यांच्या सल्ल्यानें व संमतीनें बादशहाकडून करण्यांत यावा:—

( १ ) या कायद्यान्वयें 'वसाहत' म्हणजे डोमिनिअन ऑफ कॅनडा, कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया, डोमिनिअन ऑफ न्यूझीलंड, यूनिअन ऑफ् साउथ आफ्रिका, आयरिश फ्री स्टेट व न्यूफाउंडलंड यांपैकीं कोणतीहि वसाहत.

( २ ) [१] या कायद्याच्या अंमलाच्या सुरुवातीनंतर वसाहतीच्या पार्लमेंटनें केलेल्या कोठल्याहि कायद्यास 'दि कलोनियल लॉज व्हॅलिडिटि ॲक्ट १८६५' हा लागू होणार नाहीं.

[२] या कायद्याच्या अंमलाच्या सुरुवातीनंतर, वसाहतीच्या पार्लमेंटनें केलेला कोणताहि कायदा तो कायदा इंग्लंडच्या कायद्याचा विरोधी आहे म्हणून अगर युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटच्या सध्यांच्या व भावी कायद्याच्या अगर त्या कायद्यानुरूप केलेल्या नियमांच्या अगर हुकुमाच्या विरुद्ध आहे म्हणून बेकायदेशीर अगर व्यर्थ होणार नाहीं. आणि डोमिनियनच्या पार्लमेंटच्या अधिकारांत तसला कायदा सुधारणें अगर रद्द करणें या अधिकाराचा समावेश होईल.

(३) या कायद्यानें असें ठरविलें जात आहे व जाहीर केलें जात आहे कीं, वसाहतीच्या पार्लमेंटांना परदेशीय संबंधासंबंधीं कायदे करण्याचा पूर्ण हक्क आहे.

(४) या कायद्याच्या प्रारंभानंतर युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटनें, केलेला कोणताहि कायदा वसाहतीचा कायदा म्हणून वसाहतींना लागू करतां येणार नाहीं अगर लागू आहे असें समजलें जाणार नाहीं. तसा कायदा करण्याची विनंति वसाहतीनें केली होती असा उल्लेख करूनच फक्त तसला एकादा कायदा लागू करतां येईल.

(५) १८९४ च्या मर्चंट शिपिंगच्या कायद्याच्या ६३५ व ६३६ या कलमांचा अर्थ करतांना "ब्रिटिश मालकीच्या प्रांतांतील विधिमंडळें" यांमध्यें सध्यांच्या वसाहतींचीं पार्लमेंटें यांचा समावेश होणार नाहीं अशा तऱ्हेनें करावयाचा असून या कायद्याच्या वरील कलमांशीं तो अर्थ विसंगत असूं नये.

(६) या कायद्याच्या सुरुवातीनंतर व या कायद्याच्या वरील कलमाशीं सुसंगतपणें, १८९० चा कलोनियल कोर्ट्स ऑफ ॲडिमिरॅलिटी हा कायदा (या कायद्यानें कांहीं कायदे बादशहाच्या सहीसाठीं राखून ठेवावे लागतात अगर त्यांत तहकुबीचीं कलमें असावीं लागतात) व त्यांतील कलम सातपकीं ज्या भागास (कलोनिअल कोर्ट ऑफ अडिमिरॅलिटीचा व्यवहार व कार्यपद्धति ठरविणारे नियम) बादशहाची व त्याचे सल्लागार यांची संमती लागते अशा भागाचा वसाहतींतून अंमल चालणें बंद होईल.

(७) [१] १८६७ ते १९३० पर्यंतचे ब्रिटिश नॉर्थ अमेरिकेचे कायदे अगर त्याअन्वयें केलेले नियम व हुकूम बदलण्यासाठीं, सुधारण्यासाठीं अगर रद्द होण्यासाठीं या कायद्याचा कोणताहि भाग उपयोगांत आणतां येणार नाहीं.

[२] या कायद्यांतील कलम दोनचा अंमल कानडा प्रांतानें

केलेल्या कायद्यावर व त्या प्रांताच्या विधिमंडळांच्या अधिकारांवर होईल.

[ ३ ] कानडाच्या पार्लमेंटला व प्रांतीय विधिमंडळांना या कायद्यानें दिलेल्या हक्कांत त्या पार्लमेंटच्या व त्या त्या प्रांताच्या अधिकारांत असलेल्या गोष्टींचाच समावेश होतो असें समजावें.

(८) या कायद्यानें आस्ट्रेलियाच्या कॉमन वेल्थच्या घटनेचा कायदा अगर घटना, अगर न्यूझीलंड वसाहतीची घटना रद्द करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे असें समजलें जाणार नाहीं.

(९) [१] कॉमन वेल्थ ऑफ ऑस्ट्रेलियाच्या पार्लमेंटला आस्ट्रेलियन राज्याच्या अधिकारांतील व पार्लमेंटच्या अगर कॉमन वेल्थ सरकारच्या अधिकारांत नसलेल्या गोष्टींबाबतींत कोणताहि कायदा करण्याचा अधिकार आहे असें समजलें जाणार नाहीं.

[२] आस्ट्रेलियन राज्याच्या अधिकारांतील व ऑस्ट्रेलियन पार्लमेंट व कॉमन वेल्थ सरकारच्या अधिकारांत नसलेल्या व या कायद्यांत पूर्वीच्या घटना रूढीस धरून असलेल्या गोष्टींच्या बाबतींत युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटनें एकादा कायदा केल्यास त्याला आस्ट्रेलियन पार्लमेंटची अगर कामन्वेल्थ सरकारच्या संमतीची अगर सहमताची जरूरी नसून तसा कायदा युनायटेड किंग्डमच्या पार्लमेंटला करतां येईल.

[ ३ ] चौथ्या कलमांत उल्लेखिलेली विनंति व संमति म्हणजे आस्ट्रेलियन पार्लमेंटची अगर कॉमन वेल्थ सरकारची संमति होय.

(१०) [१] ज्या वसाहतींना हें कलम कायदा म्हणून लागूच आहे त्यांच्यावर या कायद्याच्या दोन, तीन, चार, पांच, सहा या कलमांचा अंमल चालणार नाहीं, पण पार्लमेंटमध्यें कायदा करून त्यांपैकीं कोणतेंहि कलम लागू करून घेतां येईल. व त्या कायद्या-

अन्वयेंच तें कलम या कायद्याच्या सुरुवातीपासून अगर पुढें कोणत्या एकाद्या तारखेपासून लागू व्हावयाचें तें ठरवितां येईल.

[२] अशा पार्लमेंटना कायदा करून लागू केलेलें कलम रद्द केलें असल्याचें ठरवितां येईल.

[ ३ ] हें कलम कॉमनवेल्थ ऑफ ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व न्यूफाउंडलंड या वसाहतींना लागू आहे.

( ११ ) १८८९ च्या इंटरप्रिटेशन ॲक्टमध्यें कांहीं जरी असलें तरी या कायद्यानंतर युनायटेड् किंग्डमच्या पार्लमेंटांत पास झालेल्या कायद्यामध्यें " कॉलनी " या शब्दांत वसाहत, त्यांतील राज्य व प्रांत यांचा समावेश होणार नाहीं.

( १२ ) या कायद्याला वेस्टमिन्स्टर स्टॅट्यूट १९३१ असें संबोधण्यांत यावें.

# ७

# समाजवादाचा शह

A second world war would not prevent the ultimate victory of the socialist revolution. —*World Politics*.

ऐन युद्धाच्या वेळीं कोणतीं राष्ट्रें कोणाची संगत धरतील व शेवटीं फत्ते कोणाची होईल हें जरी कोणास आगाऊ सांगतां न आलें, तरी या आगामी युद्धाचा एक परिणाम मात्र निश्चित व संशयातीत आहे याबद्दल राजनीतिनिपुणांमध्यें मतैक्य आहे. प्रत्येक राष्ट्रांतील मजूरपक्षाची संघटना वाढत आहे. उलटपक्षीं तेथें कायमचें ठाण मांडलेल्या बेकारीची भीषणताहि वाढत आहे. यामुळें मजूरशाही गर्भावस्थेंमध्यें हालचाल करीत आहे. ती पुढील महायुद्धाचे वेळीं प्रगट होणार असें जागतिक समालोचन करणारे मुत्सद्दी कबूल करीत आहेत. गेल्या महायुद्धानें घोंगड्यावर काढलेल्या भांडवलशाहीला चितेवर चढविण्याचें कार्य येतें महायुद्ध पार पाडील अशी ग्वाही पामे दत्त यांजसारखे इंग्लंडांतील लेखक ठामपणें देत आहेत. अशा वेळीं रशियांतील समाजशाही आपलें जागतिक क्रांतीचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं शिकस्त करील हें उघड आहे. समाजशाही व भांडवलशाही यांचें विळ्या–भोपळ्याचें नातें प्रसिद्धच आहे. तें लक्षांत घेऊनच इंग्लंडनें समाजवादाचा प्रतिकार करण्यासाठीं १९१९ सालीं १० कोटि पौंड खर्च केले म्हणतात. इटाली व जर्मनी हे तर समाजवादाचें वारेंहि आपल्या

देशांत शिरूं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून बसले आहेत. परंतु देशांतील अंतःस्थ शक्ती आणि परराष्ट्रांतील चळवळी या दोहोंच्या चिमटींत त्यांचे प्रयत्न चिरडले जाऊन प्रत्येक देशाच्या प्रकृतिमानाला मानवेल अशा पद्धतीनें समाजवाद सर्वत्र पसरल्याशिवाय रहाणार नाहीं. इंग्लंडमध्यें तर समाजवाद निश्चितपणें निर्माण होईल असा निर्वाळा ट्रॉट्स्की देत आहेत.* नव्या महायुद्धानंतर इंग्लंडमध्यें मजूरपक्ष अधिकारारूढ होऊन समाजशाही प्रस्थापित झाली म्हणजे ब्रिटिश साम्राज्य नष्ट होईल हें ओघानेंच येतें.

हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचें वचन इंग्लंडांतील मजूरपक्षानें आपल्या ब्रीदवाक्यांत घातलेलें आहे. पूर्वी मजूरपक्ष अधिकारारूढ झाला तेव्हांच लॉर्ड अर्विनच्या मुखानें 'वसाहतीच्या स्वराज्याचा' घसघशीतपणें उल्लेख झाला व गोलमेज परिषदा भरल्या गेल्या. उलट मजूर मंत्रिमंडळ गडगडलें जाऊन 'राष्ट्रीय' या नांवाखालीं हुजूरपक्षीय मंत्रिमंडळ सत्तारूढ होतांच सारें गाडें पालटलें. पहिल्या गोलमेज परिषदेचा रंग तिसऱ्या परिषदेला राहिला नाहीं आणि वसाहतीचें स्वराज्य पूर्णपणें वगळलेला घटनाकायदा तयार करून हिंदुस्थानाच्या तोंडास पानें पुसण्यांत आलीं. कार्ल मार्क्सनें 'बडा बदमाष' (That great robber) म्हटलेल्या क्लाइव्हसारखी 'उमीचंदी' फसवणूक पुनः करण्यांत आली! आजची इंग्लंडची राजसत्ता म्हणजे गुलाम–मालकांचा अड्डा बनला आहे हें ट्रॉट्स्की यांनीं केलेलें वर्णन कटु असलें तरी सत्य आहे.§ इंग्लंडांतील प्रत्येक माणसामागें नऊ परतंत्र माणसें साम्राज्यांतील देशांत आहेत. इंग्लंडमध्यें समाजवादी सत्ता निर्माण झाल्यावर कोणकोणते फेरफार होतील याचें शब्दचित्र ट्रॉट्स्की यांनीं आपल्या Whither England या पुस्तकांत सविस्तर दिलें आहे. ते म्हणतात, "राजाचे अधिकार संपुष्टांत येतील, लॉर्डांची सभा विसर्जन पावेल, मूलभूत उद्योग-

---

* The entire world situation and the role of the English Proletariat in production and in society assures it of the victory, provided its leadership be truly and resolutely revolutionary.

§ The London Parliament is a slave-holders' Parliament.

धंदे मजूरप्रधान राजसत्तेच्या हातीं जातील, जन्मामुळें व जिंदगीमुळें अधिकार व सवलती मिळणें बंद होईल, रशियाशीं सख्य जोडलें जाईल आणि हिंदुस्थान व ईजिप्त यांच्यांशीं स्वतंत्रतेचें, समानतेचें व बंधुतेचें नातें राहील."

डीन इंजसारख्या साम्राज्याच्या स्तुतिपाठकालाहि इंग्लंडांतील समाजवाद व हिंदुस्थानांतील स्वातंत्र्य यांचा संबंध नाकबूल करतां येत नाहीं. आंग्लसत्तेवर समाजवादाची साउली पडली कीं हिंदुस्थानांत गडबड उडालीच म्हणून समजा, असा इषारा देऊन ती गडबड जुलूमजबरदस्तीनें थांबविणारा कोणी महाभाग उपलब्ध होणार नाहीं याचीच हळहळ त्यांना वाटत आहे.†

जगांतील महायुद्धामुळें इंग्लंडांत समाजवाद व त्यामुळें हिंदुस्थानांत स्वातंत्र्याच्या चळवळीला सहानुभूति ही शृंखला ज्यांना दृष्टिगोचर होते, त्यांपैकीं डीन इंजसारखे कांहीं लोक जसे दडपशाहीचा पुरस्कार करतात; तसाच नॉर्मन ड्वाइट हॅरीससारखे कांहीं 'अर्धं त्यजति पंडित' सामोपचाराचा मार्ग सुचवितात. हिंदुस्थानाला वसाहतीचें स्वराज्य मिळेल पण पूर्ण स्वातंत्र्य यावच्चंद्रदिवाकरौ अशक्य आहे असें ते ठांसून प्रतिपादतात. § मि. जी. डी. एच्. कोल यांनींहि साम्राज्याचा व्यापार चालण्यासाठीं हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळ झोडपून न काढतां सामोपचारानेंच

---

† The mere advent of a Socialist *Government* to power *would* give the signal for disturbances in India which only a strong hand *could* quell and the strong hand would not be there.

§ The English are prepared to make even more concessions until India approaches the status of a self-governing Dominion. But it does not mean that British statesmen are prepared, or ever will be prepared, to permit India to leave the British Empire or to become an independant state. India still and will long remain the " brightest jewel" in Britain's Crown.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



नगर वाचनालय सातारा
८०६०० २१०-९३४ ७५ ९०४

आपला कार्यभाग साधेल असें सुचविलें आहे.§

याहिपेक्षां गोडीगुलाबीची व गुण्यागोविंदाची भाषा इंडियन पार्लमेंटरी कमिटीचे सेक्रेटरी मि. मार्डी जोन्स यांनीं पुढील वाक्यांत वापरली आहे.–

" The most satisfactory status for India is to be accepted within the Commonwealth of British Nations as an equal partner in every respect : and to be given the special duty of becoming the peace-maker between the East and the West.

समाजवाद हा साम्राज्यवादाशीं विसंगत असला तरी 'बंधुभावावर अधिष्ठित झालेल्या समान दर्जाच्या स्वतंत्र राष्ट्रांचा संघ' हा कांहीं समाजवादाला वावडा नाहीं आणि म्हणून अशा मित्रराष्ट्र–संघाचें स्वरूप ब्रिटिश साम्राज्याला येईल व त्यांत हिंदुस्थानाला राजकीय व आर्थिक समता प्राप्त होऊन पूर्व व पश्चिम यांमधील शांतिदेवता हें स्थान त्याला लाभेल असें भविष्य त्यांनीं वर्तविलें आहे.*

साम किंवा दंड यांपैकीं कोणत्याहि साधनांचा प्रयोग ब्रिटिश सरका-

§A large part of the trade in cheap cotton goods is already lost, and is most unlikely ever to be recovered; but there remains a sufficiently large volume of exports to India to exercise an important influence on the political policy of Great Britain in dealing with Indian Nationalist claims. The Diehards in Great Britain wish so to crush the Indian Nationalist movement as to keep the Indian market open to British goods by force; but the majority of British politicians and the exporters, interested in the Indian trade, strongly doubt the practicability of this course, and therefore favour more conciliatory methods.

*Europe Today*.

* Socialism is inconsistent with Empires as they are now conceived. It is not in the least inconsistent with the existence of federations of self-governing countries bound together solely upon a basis of mutual consent. In such a reformed Empire, India would have to be a member, if at all, on terms of political and economic equality.

रानें हिंदुस्थानावर केला; तरी त्यांना वश न होतां हिंदी प्रजा जर संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्रुवताऱ्यावरील आपली नजर चळूं न देतां महायुद्धाच्या संधीस आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करील तर तिची इष्टकामनासिद्धि झाल्याविना खचित रहाणार नाहीं. साम्राज्याच्या घटकांनीं युद्धांत भाग न घेणें म्हणजेच स्वातंत्र्य पुकारणें होय असें मि. एस. ई. स्टोक्स यांनीं स्वच्छपणें लिहिलें आहे.§

आणि राष्ट्रीय सभेनें या बाबतींत आंखलेलें धोरण हें या तत्त्वांस अनुसरूनच आहे. त्याचें महत्त्व यापुढील काळांत वाढतें असल्यामुळें तो चिरस्मरणीय ठराव पुढें समग्र दिला आहे.

## राष्ट्रीय सभेचा युद्ध–बहिष्काराचा ठराव

" जगावर पसरत चाललेल्या भावी भयंकर व सर्वभक्षक युद्धाच्या छायेमुळें राष्ट्रीय सभा ही परराष्ट्रीय संबंध व युद्ध यासंबंधींचें हिंदुस्थानांतील लोकांचें धोरण पुनः जाहीर करूं इच्छितेः—

हिंदुस्थानांतील लोक आपल्या शेजारीं असणाऱ्या राष्ट्रांशीं व इतर सर्व राष्ट्रांशीं शांततेचें व स्नेहाचें नातें ठेवूं इच्छितात व या उद्देशाच्या पूर्ततेसाठीं आपसांतील कलहाचीं बीजें नाहीशीं करण्याचें योजीत आहेत. राष्ट्र या नात्यानें स्वतःच्या स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा प्रयत्न करीत असतांना इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें महत्त्व ते ओळखतात. आंतर्राष्ट्रीय सद्भाव व सहकारिता यांच्या बळावर आपलें सामर्थ्य वृद्धिंगत करण्यास ते उत्सुक आहेत.

जागतिक शांतता हाच अशा सहकारितेचा पाया आहे. स्वतंत्र हिंदुस्थान अशा शांततेंत आनंदानें भाग घेईल. तसेंच निःशस्त्रीकरण व सामुदायिक संरक्षण यांचाहि तो पुरस्कार करील. जोंपर्यंत आंतरराष्ट्रीय कलहाचीं मुळें सर्वत्र पसरलीं आहेत, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर सत्ता गाजवीत आहे व साम्राज्यशाहीचा धिंगाणा चालू आहे; तोंपर्यंत जागतिक

§ " Colonial neutrality " when the Empire is at war with a First Class power, is simply another word for " Declaration of Independence.

सहकारितेची कल्पना सत्य–सृष्टींत उतरणें अशक्य आहे. म्हणून जागतिक शांतता चिरंतन स्वरूपाची स्थापन करण्यासाठीं साम्राज्यशाहीचा व एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची होणारी पिळणूक यांचा नाश झाला पाहिजे.

गेल्या कांहीं वर्षांपासून आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंधाला एकदम उतरती कळा लागत चालली आहे; फॅसिस्ट राष्ट्रांचें आक्रमण वाढत्या प्रमाणांत सुरू आहे. आंतरराष्ट्रीय हक्कांचा बिनदिक्कत धिक्कार करणें हें फॅसिस्ट राष्ट्रांचें उघड उघड धोरण ठरून गेलें आहे. ब्रिटिशांच्या परराष्ट्रीय धोरणांत विलंब, विसंगति व धरसोड असली तरी ते जर्मनी, स्पेन, जपान यांमधल्या फॅसिस्ट सरकारांना अव्याहत उचलून धरण्याचें व्रत अंगीकारीत आहेत; व त्यामुळें जागतिक परिस्थितींतील वाढत्या अनवस्थतेची जबाबदारी ब्रिटिशांच्या शिरावर मोठ्या प्रमाणांत येऊन पडत आहे. जर्मनींतील नाझी पक्षाशीं संगनमत करण्याचा व स्पेनमधील बंडखोरांशीं निकटवर्ती संबंध जोडण्याचा ते अद्याप प्रयत्न करीत आहेत. साम्राज्यशाहीच्या जागतिक युद्धाच्या होमकुंडाकडे राष्ट्रांना रेटण्यास इंग्लंड मदत करीत आहे !

असल्या साम्राज्यशाही युद्धांत हिंदुस्थान सहभागी होणें कदापि शक्य नाहीं व ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या हितासाठीं द्रव्यबल व मनुष्यबल यांचा बळी देण्यास हिंदुस्थान केव्हांहि तयार होणार नाहीं. जनतेच्या प्रत्यक्ष संमतीखेरीज हिंदुस्थान कोणत्याहि युद्धांत सामील होणार नाहीं. हिंदुस्थानांत चाललेल्या युद्धाच्या जंगी तयारीला व येथें आगामी युद्धाचें वातावरण फैलावण्यासाठीं चालणाऱ्या प्रचंड डावपेचांना व वैमानिक हल्ल्याबाबतच्या योजनेला ही राष्ट्रीय सभा कसून विरोध करीत आहे. भावी युद्धाच्या जाळ्यांत हिंदुस्थानला अडकविण्याचा प्रयत्न करण्यांत आल्यास तो हाणून पाडण्यांत येईल. ”

कोणत्याहि राष्ट्राशीं व कोणत्याहि तत्त्वावर पुकारलेल्या जागतिक युद्धांत इंग्लंड सांपडलें; तर त्या राष्ट्राच्या विपन्नावस्थेनें न द्रवतां व त्या तत्त्वाच्या उच्चत्वानें मोहून न जातां आपल्या स्वातंत्र्यसिद्धीसाठीं,

हिंदुस्थानानें 'साम्राज्याचा शत्रु तो आपला मित्र' हें सूत्र डोळयापुढें ठेवून एकजुटीनें व दृढनिश्चयानें प्रयत्नाची परमावधि केली पाहिजे. 'साम्राज्यांतील कामकरी जोंवर परतंत्र आहेत तोंवर ब्रिटिश कामकरी स्वतंत्र होणार नाहींत' हें कार्ल मार्क्सनें ऐंशी वर्षांपूर्वी सांगितलेलें सूत्र-वाक्य ध्यानीं ठेवून इंग्लंडांतील अधिकारारूढ समाजवाद हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देईल हें जरी सयुक्तिक असलें; तरी तापलेल्या लोखंडावर घण घालण्याचें मुख्य कार्य हिंदी प्रजेलाच करावयाचें आहे हें लक्षांत घेऊन पं. जवाहरलाल नेहरू यांचा पुढील मंत्र हिंदी प्रजेनें शिरोधार्य मानला पाहिजे.

*Such is Today,*
The making of Tomorrow lies with you and your generation.

India once an Empire, has become a dependency. She is on the way to autonomy and may ultimately separate from the British Empire. She may become a federation of equal partners or drift into an Empire dominated by powerful groups.

*—The British Empire—( Royal Institute of International Affairs.*

८

# हिंदुस्थानचा युद्धकालीन कार्यक्रम

Bear in mind that the Commerce of India is the commerce of the world, and that he who can command it exclusively is dictator of Europe.

—*Peter the Great.*

गेल्या वर्षीं एके दिवशीं सुप्रभातीं लंडनमधील सारी जनता एकाएकीं चकित झाली. चहाच्या टेबलाभोंवतीं खुर्चीवर घरांतील एक एक माणूस येऊन जों बसतो, तों त्या टेबलावर नेहमींच्या खाद्यपेयाशिवाय 'सेवन' करण्यासाठीं निराळाच 'पदार्थ' अकल्पित रीतीनें ठेवलेला आढळून आला. तो एक छापील कागद होता. कोणा तरी कंपनीची ती जाहिरात असेल अशा भावनेनें जो तो तो कागद उचलून वाचूं लागला. दोन-चार ओळी वाचून होतांच प्रत्येकाला कळलें कीं, ही 'जाहिरात' आहे पण कंपनीची नसून सरकाराची आहे व तिचा माल घेण्यासाठीं किंमत द्यावयाची आहे ती पैशानें नसून प्राणानें. येत्या महायुद्धासंबंधीची ही जाहिरात आहे हें प्रत्येकाला कळून चुकलें आणि त्याबरोबर त्यांना आठवली २९ सप्टेंबरची तारीख. तेव्हां महायुद्धाच्या भीतीनें सारें इंग्लंड आरपार हादरून गेलें होतें ! तीच भीतीची विद्युल्लहर त्या सरकारी पत्रकानें चहाच्या वेळीं लंडनकरांच्या शरीरांत खेळविली. सर जॉन अंडरसन या अधिकाऱ्यानें युद्धकालीं इंग्लंडांतील जनतेनें कसें वागावें याची तपशीलवार योजना त्या पत्रकांत दिली होती. कोणत्या वयाच्या माणसाला युद्धपोषक असा कोणता व्यवसाय

करतां येईल, स्त्रियांनाहि शुश्रुषेसारखीं कामें किती करतां येतील याची सविस्तर यादी त्या पत्रकांत दिलेली होती व कोणत्या घरांतील किती माणसें काय काम करूं शकतील याची ' लष्करी खानेसुमारी ' मागितलेली होती.

आपला स्वाभिमान गमावून व न्याय्य तत्त्वाचाहि अभिमान बाजूस सारून किंबहुना पूर्वींच्या करारांचें पावित्र्य भंगूनहि इंग्लंड युद्ध टाळण्याची जिवापाड आटापीट एकीकडे करीत असलें, तरी युद्ध पेटलेंच तर आपल्या देशाचें रक्षण कसें करावें याची तयारी करण्यांत तें गाफील राहिलेलें नाहीं. एकीकडे मि. चेंबर्लेन हे ऑस्ट्रिया–झेकोस्लाव्हाकिया यांकडे कानाडोळा करून म्युनिच–रोमच्या वाऱ्या करीत आहेत, इटालीची ॲबिसिनियावरील अन्याय्य सत्ता मान्य करीत आहेत आणि स्पेनमध्यें जनरल फ्रँकोलाहि मान्यता देत आहेत; पण त्याच वेळेस आरमारी मंत्री म्हणून लॉर्ड चॅटफील्ड यांस ते मंत्रिमंडळांत समाविष्ट करून घेत आहेत, सर जॉन अंडरसन यांच्या नेतृत्वाखालीं ' लष्कर–भरती ' ( Conscription )-ची तयारी करीत आहेत आणि विमानहल्ल्यापासून बचाव करण्यासाठीं दोन कोटि धूर–मुखवटे ( Gas-masks ), सात सात तटबंदीचीं भुयारें, विमान–विध्वंसक तोफा इत्यादि साधनें ( A.R.P. ) जमवीत आहेत. १९३९ च्या अंदाजपत्रकांत इंग्लंडनें संरक्षणासाठीं ८० कोटि पौंडांचें कर्ज काढण्याचें योजलें आहे. गेल्या वर्षापेक्षां यंदा आरमार व विमानदळ यांवर दुप्पट खर्च होणार आहे. ब्रिटिश सरकारच्या एकंदर खर्चाशीं हें प्रमाण सुमारे शें. ५० पडतें. पुढील पांच वर्षांत संरक्षणासाठीं १२५ कोटि पौंड खर्च करण्याची योजना पार्लमेंटनें मंजूर केली आहे. त्यावेळीं सर जॉन सायमन यांनीं कबूल केलें कीं, शांततेच्या काळांत युद्धसाहित्यासाठीं इतका पैसा या देशानें कधींच खर्च केला नव्हता. §

गेल्या सात वर्षांत इंग्लंडच्या युद्धखर्चानें कशी मजल मारली आहे हें पुढील तक्त्यावरून कळून येतें.

---

§ We have reached a stage of production never before touched by this country when at peace.

## इंग्लंडचा वाढता युद्धखर्च.

| | लष्कर | | आरमार | | विमान | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| १९३२ | ३ | ५५ | ५ | ० | १ | ७० | १० | ३० |
| १९३३ | ३ | ७५ | ५ | ३५ | १ | ६७ | १० | ८० |
| १९३४ | ३ | ९५ | ५ | ६५ | १ | ७७ | ११ | ३७ |
| १९३५ | ४ | ४५ | ६ | ४७ | २ | ७५ | १३ | ७० |
| १९३६ | ५ | ४७ | ८ | १० | ५ | ० | १८ | ६० |
| १९३७ | ८ | २० | १० | ५० | ८ | २५ | २६ | ९७ |
| १९३८ | १० | ६५ | १४ | ७७ | १२ | ६५ | ३८ | ७ |

इंग्लंडची युद्धाच्या दिशेनें ही जशी गति; त्याहून इतर प्रमुख राष्ट्रांची प्रगति किती अधिकच आहे हें त्यानीं युद्धखर्चासाठीं चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत मंजूर केलेल्या पुढील रकमांवरून कळून येण्यासारखें आहे.

## युद्धखर्चासाठीं मंजूर रकमा

| | कोटी | | कोटी |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ५८ पौंड | जपान | ३१ पौंड |
| अमेरिका | ११० डॉलर | रशिया | ४०० डॉलर |
| इटाली | २ पौंड | आस्ट्रेलिया | ४ पौंड (तीन वर्षांसाठीं) |

जगांतील चौसष्ट देशांच्या शस्त्रास्त्रखर्चाचे आंकडे उपलब्ध आहेत. यावरून एक चमत्कारिक गोष्ट दिसून येते ती अशी कीं, १९३५ सालीं शस्त्र–नियंत्रण परिषद् भरली तेव्हांपासूनच शस्त्रवाढीला जोरानें सुरुवात झाली. याचा अर्थच असा कीं, त्यावर्षी शस्त्रखर्च अवास्तव वाढूं लागला होता व तो कमी करण्याची योजना म्हणजे ती परिषद्. पण परिषदेबाहेरील राष्ट्रांनीं शस्त्रास्त्रें वाढविल्यामुळें तिच्यांतील ठराव कागदावरच राहिले. आपल्या देशांतील बेकारी मोडण्यासाठीं व लोकवस्तीची गर्दी हटविण्यासाठीं नवीन देश जिंकण्याची ओढ इटाली, जर्मनी व जपान

यांसारख्या ' उपाशी ' राष्ट्रांना लागली व म्हणून त्यांनीं आपलें लष्करी खातें पुष्ट करण्यास सुरुवात केली; उलट आपापले देश व आपली अंकित राष्ट्रें संभाळण्यासाठीं इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांसारख्या राष्ट्रांनींहि आपलें युद्धसामर्थ्य वाढविण्यासाठीं पाण्यासारखा पैसा ओतण्यास सुरुवात केली. १९२७ ते १९३२ या पांच वर्षांतील सरासरी पाहिली तर दरसाल ६४ राष्ट्रें शस्त्रासाठीं ४१० कोटि डॉलर खर्च करीत होतीं. पण १९३४ ते १९३८ हें वर्ष–पंचक घेतलें तर ६५० कोटी डॉलरांची सरासरी पडते. १९३७ त ८०० कोटि व १९३८ त ९५० कोटि अशा उड्या युद्धखर्चानें मारल्या. विशेष हें कीं, खर्चाची ही दुप्पट होण्यास सात प्रमुख राष्ट्रेंच मुख्यतः कारणीभूत आहेत. १९२९ सालीं ६४ राष्ट्रांचा युद्धखर्च ४२० कोटि डॉलर होता. त्यांपैकीं इंग्लंड फ्रान्सप्रभृति सात प्रमुख राष्ट्रांचा खर्च २८० कोटि होता; म्हणजे बाकीचीं ५७ राष्ट्रें १४० कोटि डॉलर खर्च करीत होतीं. १९३८ सालीं ९५० कोटि डॉलर जे खर्च झाले, त्यांतील ७४० कोटि डॉलरांचा खर्च फक्त सात राष्ट्रांनींच केलेला आहे; म्हणजे उरलेल्या ५७ राष्ट्रांनीं २१० कोटि डॉलर खर्च केला आहे. याचा अर्थ असा कीं, सप्तराष्ट्रांनीं आपला खर्च सुमारें तिप्पट व सत्तावन राष्ट्रांनीं दीडपट इतका वाढविला. पुढील कोष्टकावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

### युद्धखर्चाचे वांटेकरी

(कोटि डॉलर खर्च)

| सन | एकूण | ७ राष्ट्रांचा | ५७ राष्ट्रांचा |
|---|---|---|---|
| १९३८ | ९५० | ७४० | २१० |
| १९२९ | ४२० | २८० | १४० |
| शेंकडा वाढ | २२६ | २६३ | १५० |

युद्धाचें साहित्य किती खर्चाचें असतें याची सामान्य माणसाला कल्पनाहि करवणार नाहीं. ३५ हजार टन वजनाचें एक जहाज बांधण्यास ७ कोटि १० लाख डॉलर खर्च येतो आणि विमान-विध्वंसक अशीं आठ साधनें निर्माण करण्यास ५ लाख डॉलर खर्च येतो. शस्त्रास्त्रांच्या कार-

खानदारांना नफ्यापुढें देशाभिमान दिसत नाहीं. स्वदेशाच्या शत्रुराष्ट्रालाहि ते हत्यारें विकतात. अशा व्यापारी धोरणामुळेंच गेल्या महायुद्धांत हत्याराच्या एका अमेरिकन कारखान्यानें आपल्या स्टॉकवर शें. ४५८ डिव्हिडंड दिलें. जे. पी. मॉर्गन आणि कंपनी या ब्रिटिश कारखानदारानें त्याकाळीं २०० कोटी डॉलर नफा उकळला. या कृतांतकटकांचे ठिकाणीं खरें विश्वबंधुत्व दिसून येतें—' आपपर भाव ' न ठेवतां ते आपला व्यापार चालवितात!

युद्धखर्च वाढविण्यांत राष्ट्रा-राष्ट्रांची ही जी अहमहमिका दिसून येते, तिचें कारण काय हें इंग्लंडचे गेल्या महायुद्धांतील प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांनीं मालालंकार साधून निवेदन केलें आहे. ते म्हणतात, " जर्मनी व इटाली निःशस्त्र झाल्याशिवाय फ्रान्स व इंग्लंड निःशस्त्र होऊं शकत नाहीं, रशिया निःशस्त्र झाल्याशिवाय जर्मनीला आपलें शस्त्रसामर्थ्य कमी करतां येत नाहीं, जपान जोंवर शस्त्रसंपन्न आहे तोंवर रशियाला शस्त्रसंन्यास करतां येत नाहीं, चीनशीं तह झाला नाहीं ( म्हणजे तो गिळंकृत झाला नाहीं ) तोंवर जपानला शस्त्रनियंत्रणाची कल्पनाहि शिवत नाहीं; आणि जपान आपलें लष्कर, विमानदळ व नाविकदळ वाढवीत असतां अमेरिकेला आरमार व विमानें वाढविल्यावांचून गत्यंतरच नाहीं."

शस्त्रवाढीच्या शर्यतींत इंग्लंड आपलें अग्रस्थान ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीलच. पण तशी तयारी न झाली—आणि न होण्याचाच संभव अधिक—तर रशियासारख्या मनुष्यबल व शस्त्रबल यांनीं समृद्ध असलेल्या राष्ट्राशीं त्याला संधान जोडावें लागेल. रशियाचीं साम्यवादी मतें आजच्या ब्रिटिश सरकाराला मानवणारीं नसलीं, तरी त्याच्याशीं ब्रिटिश सरकारनें जसा व्यापारी तह केला; तसाच राजकीय तहहि करण्याची पाळी आल्यास इंग्लंड माघार घेईल असें नाहीं. रशियालाहि जर्मनी व इटली यांतील फॅसिझमशीं टक्कर द्यावयाचीच आहे, तें काम इंग्लंडच्या संगतीनें त्याला पार पाडतां येईल. इटाली व जर्मनी यांनीं युद्धासाठीं इतका अवाढव्य खर्च केला आहे कीं, देशांत बेकार लोकांची संख्या वाढत आहे आणि असंतोष सारखा धुमसत आहे. हिटलर किंवा मुसोलिनी यांना दंडुकेशाहीवर

उभारलेली आपली सत्ता दीर्घकाळ टिकवून धरतां येईल हें शक्य नाहीं. देशांतील क्षुधेला व क्षोभाला बाहेरचे नवे नवे बळी पकडून आणण्याचें कामीं त्यांनाहि हात टेकावे लागतील आणि त्यावेळीं त्या स्वजनांच्या क्षोभांत त्यांचीच आहुति पडणें स्वाभाविक आहे. घरांतील तें संकट टाळण्यासाठीं बाहेर युद्धाचा वणवा पेटविणें त्यांना अपरिहार्य होईल.

युद्धांत इंग्लंडला दुसरा आसरा हिंदुस्थानचा. कच्चा माल व माणसें यांचें कोठार या दृष्टीनेंच इंग्लंड हिंदुस्थानाकडे युद्धकालीं पहाणार. खुद्द हिंदुस्थानचें संरक्षण करण्याची आवश्यकता इंग्लंडला वाटते ती आपल्या साम्राज्याचें कोठार शाबूत रहावें म्हणूनच. हिंदुस्थानांतील सैन्याला यंत्र–संपन्न ( Mechanization ) करण्याचे किरकोळ प्रयत्न चालू आहेत; जबलपूरला तोफांचा कारखाना काढण्याची योजना शिजत आहे. पण हिंदी लोकांना दूरच ठेविलें जातें. जपाननें पॅसिफिक महासागरांत रणकुंड पेटविल्यास इंग्लंडहून शस्त्रसामुग्री व विमानें येणार आणि मग हिंदुस्थानचें रक्षण होणार; उलट भूमध्यसमुद्रांत इंग्लडची इटाली–जर्मनीशीं झुंज सुरू झाली, तर हिंदुस्थानांतील धान्य, मनुष्य व द्रव्य यांची त्रिविध रसद इंग्लंड पिळून घेणार ! सध्यां हिंदुस्थानचें लष्कर कसें बनलें आहे पहा.

## हिंदी सैन्य

| प्रकार | हिंदी | ब्रिटिश | ब्रिटिशांचें प्रमाण ( शेंकडा ) |
|---|---|---|---|
| पायदळ | ९७ तुकड्या | ४३ | ३१ |
| घोडदळ | २१ युनिट | ५ | १९ |
| तोफखाना | २३ | ५९ | ७२ |
| टँक्स | — | ८ कंपन्या | १०० |
| विमानदळ | — | ८ तुकड्या | १०० |

यांतील तोफखान्यामध्यें असणाऱ्या हिंदी सैनिकांना लहान लहान तोफांकडेच नेमण्यांत येतें. महत्त्वाच्या खात्यांत एकजात गोरे अधिकारी ठेवण्याचें सरकारचें धोरण अजून अबाधितच आहे. हिंदी सैन्य १ लाख ६० हजार व ब्रिटिश सैन्य फक्त ५५ हजार आहे. ब्रिटिश सैनिकाला लठ्ठ पगार व त्याशिवाय अविवाहित म्हणून, व विवाहित म्हणून,

पत्नीच्या बाळंतपणासाठीं म्हणून, पुत्राच्या जन्मासाठीं म्हणून अशा नानाप्रकारांनीं हिंदी शिपायाच्या चार पांचपट पैसा कसा चारला जातो हें कॅ. मोडकांच्या पुस्तकावरून कळून येतें.

ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणार्थ हिंदुस्थानानें आपलें वित्त-जीवित वेंचलें पाहिजे असें हिंदुस्थानांतील मवाळांतील मवाळहि आतां प्रतिपादणें शक्य नाहीं. ' अशा राणीसाठीं आणि तिच्या अशा साम्राज्यासाठीं एकदां नव्हे तर वीसदां मी प्राण देईन' अशी नाटकी स्वामिनिष्ठेची फुसकी प्रौढी मारणारे 'सुभेदार' पूर्वी होऊन गेले, एवढेंच नव्हे, तर खुद्द म. गांधीहि गेल्या महायुद्धांत इंग्रजाला बिनशर्त साहाय्य करण्यास सिद्ध होते ! शत्रु-पक्षाबद्दल द्वेषभाव बाळगावयाचा नाहीं हें सत्याग्रहाचें परम तत्त्व असल्यानें इंग्रजाला अडचणींत गांठून त्याला मदत न करणें हा सत्याग्रह-शास्त्राचे दृष्टीनें गुन्हा होईल अशी त्यांची विचारसरणी. पण गेल्या महायुद्धानंतर इंग्लंडनें जें स्वार्थी व निर्दय धोरण स्वीकारलें, त्यामुळें म. गांधींच्याहि मतांत परिवर्तन झालें आहे. " साम्राज्य हा शब्दच माझ्या नाकाला झोंबतो " ( The very word 'Empire' stinks in my nostril ) असें ते स्पष्टपणें म्हणत आहेत.

ब्रिटिश साम्राज्य हें न्याय, स्वातंत्र्य व लोकसत्ता या त्रिगुणांवर आधारलेलें आहे हा पुकारा अणुमात्रहि खरा नाहीं. हें सर्व पक्षांच्या पुरतें ध्यानीं आलें आहे. वसाहतमंत्री मि. माल्कम मॅक्डोनाल्ड यांनीं ऑक्सफर्ड विद्यापीठांतील ग्रीष्मविद्यालयांत आलेल्या वसाहतींतील १८० अधिकाऱ्यांपुढें ' आमचें साम्राज्य हें स्वातंत्र्याच्या प्रसारासाठींच जन्मास आलें आहे '* म्हणून बढाई मारली, पण तिच्यावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नाहीं. ब्रिटिश साम्राज्य कायद्यावर चाललेलें आहे, म्हणजे त्यांतील प्रत्येक नागरिकाला कायद्याचा आधार घेतां येतो, एवढेंच नव्हे तर कायदा घडविण्यांतहि तो अंशभागी होऊं शकतो अशी न्यायाची स्थिति

* What is the main purpose of the British Colonial Empire? It is the gradual spread of freedom among all His Majesty's subjects.

साम्राज्यांत नांदत आहे, ही बढाई खोडून काढण्यास एकट्या बंगालमधील दीडहजार विनाचौकशी अटकेंत ठेवलेले राजबंदीहि समर्थ आहेत. न्याय-दानांतील काळा–गोरा भेद तर जगप्रसिद्धच आहे; आणि जोंवर हिंदु-स्थानांत वट हुकूम जारी आहेत तोंवर कायद्यानें राज्य चाललें आहे असें कसें म्हणतां येईल? इंग्लंड स्वातंत्र्याचें पाठीराखें आहे आणि तें कार्ल मार्क्ससारख्यांना आश्रय देतें हीहि त्याची प्रौढी त्याच्या अंकित देशांतील वर्तनावरून सपशेल खोटी ठरली आहे. आयर्लंडला स्वातंत्र्य देण्याचे बाबतींत इंग्लंडनें किती कमालीचा विरोध केला, हें त्या देशाचा शतकानु-शतकाचा इतिहास कंठरवानें ओरडून सांगत आहे. १९१६मधील तो रक्तलांच्छित सोमवार (Bloody Easter Monday)! त्या एका दिवसांत ४५० स्वातंत्र्यप्रिय आयरिश ठार झाले व २६०० माणसें जखमी झालीं! रोज दोन याप्रमाणें सोळा वीर पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें ठार मारण्यांत आले!!

हिंदुस्थानांतहि एप्रिलमध्येंच तशीच कत्तल जालियनवाला बागेंत झाली; तितकेंच भयंकर पण सनदशीर कृत्य म्हणजे लॉर्ड अर्विनचा वचनभंग. ता. ३१ ऑक्टोबर १९२९ रोजीं त्यांनीं जाहीरनामा काढून असें निःसंदि-ग्धपणें प्रसिद्ध केलें कीं, 'बादशहांच्या प्रधानांनीं हिंदुस्थानच्या अंतिम साध्याविषयीं अनेकवार घोषणा केल्या असल्या, तरी त्याच्या अर्थाबद्दल हिंदुस्थान व इंग्लंड या देशांत संशय प्रदर्शित केले जात आहेत, म्हणून मी साम्राज्य सरकारच्या वतीनें असे स्वच्छपणें जाहीर करतों कीं, हिंदु-स्थानचें ध्येय वसाहतीचें स्वराज्य हेंच*!' चीड आणणारी गोष्ट अशी कीं, ब्रिटिश साम्राज्याच्या जबाबदार प्रतिनिधीनें दिलेलें हें अभिवचन ब्रिटिश सरकारानें बिनदिक्कत पायांखालीं तुडविलें. आणि १९३५ च्या घटना-कायद्यांत 'वसाहतीचें स्वराज्य' हे शब्द कोठेंहि येऊं दिले नाहींत. या एका दुष्कृत्यानें इंग्लंडनें आपल्याला न्यायाची चाड नाहीं, स्वातंत्र्याचें

---

* It is implicit in the Declaration of 1917 that the natural issue of India's coustitutional progress, as there contemplated, is the attainment of Dominion Status.

प्रेम नाहीं व लोकसत्तेची आवड नाहीं असेंच ठामपणें सिद्ध केलें. तरी हिंदुस्थानाचे आपण 'विश्वस्त' आहोंत हा इंग्रजांचा बहाणा. तो किती फोल आहे याची चटकन् कल्पना येण्यासाठीं दीडशें वर्षांच्या ब्रिटिश राजवटीचें नुसतें स्मरण केलें कीं पुरे त्यानें! आजवर झाले नाहींत अशा प्रकारचे व तीव्रतेचे हाल हिंदुस्थानाचे झाले.* स्वतंत्र व जनतेशी समरस असें सरकार किती प्रचंड सुधारणा अत्यंत अल्पावधींत घडवून आणूं शकते याचा दाखला रशियानें जगापुढें ठेवला आहे. त्याला पार्श्वभूमि शोभण्यासारखीच दुर्दशा इंग्रजांनीं हिंदुस्थानची केलेली आहे हें पुढील तुलनेनें चटकन् डोळयांत भरण्यासारखें आहे.

| १५० वर्षांतील **ब्रिटिश राज्याची फलश्रुति** | २० वर्षांतील **रशियन राज्याची फलश्रुति** |
|---|---|
| (१) शेंकडा ८ माणसें साक्षर. | शें. ९० माणसें साक्षर. (१९१७ त शें. २) |
| (२) २० हजार चौ. मैलांत १ दवाखाना. | क्षयरोगाचे दवाखाने ५०० (१९१८ ते ४) |
| (३) ५० खेड्यांत १ शाळा | बालजननांत हजारीं मृत्यु २७५ (१९३० त १४१) |
| (४) १५०० कोटि रुपये शेतकऱ्यांचें कर्ज | शेती सामुदायिक व यंत्रसमृद्ध. ना कर्ज, ना बेकारी. |

---

* There cannot remain any doubt but that the misery inflicted by the British on Hindostan is of an essentially different and infinitely more intensive kind than all Hindostan had to suffer before. The aristocracy wanted to conquer it, moneyocracy to plunder it and the millocracy to undersell it. —*Karl Marx*.

| | |
|---|---|
| (५) कामकऱ्यांना जीवन-वेतनहि नाहीं. | यंत्रोत्पादन जगाच्या शें. ३५ (१९३७ त शें. ४). |
| (६) हत्यारें वापरण्यास बंदी | युद्धाची तयारी जगांत सर्वोत्कृष्ट |
| (७) लष्कर, न्याय, रेल्वे वगैरे-मध्यें वर्गवैषम्य. | निर्वर्ग समाजरचना |
| (८) लष्कराची उधळपट्टी, न्यायाचे महागडेपण | नफेबाजी बंद |
| (९) दारू व शर्यती यांचा प्रसार. | कामकऱ्यांना करमणुकी |
| (१०) जातिनिर्णय, वटहुकूम, जादा अधिकार व हिंदुमुसलमान, संस्थानी खालसा असे भेद यामुळें खरी राजकीय सत्ता शून्य. | |

जी स्थिति हिंदुस्थानची, तीच इतर अंकित देशांचीहि. पॅलेस्टाइनचें उदाहरण घेतलें तरी तेथेंहि डायरशाहीचाच अवतार दिसतो. पॅलेस्टाइन-मध्यें एका इंग्लिश अधिकाऱ्यावर गोळीबार केल्याचें समजल्यावर ब्रिटि-शांनीं एक सबंध अरबी खेडें उध्वस्त केलें व तेथील सर्व खेडुतांना जबर दंड ठोठावला. एकंदर ४०० अरबांना त्या प्रकरणीं कैद करण्यांत आलें. अरबांनीं त्वेषानें ४२ इंग्लिश लोकांना ठार मारलें, त्याबद्दल इंग्लिशांनीं १०६९ अरबांना मारून आपली रक्तपिपासा शांत केली. लिओनार्ड बार्नेस यांनीं अनेक आधार देऊन असें ठामपणें म्हटलें आहे कीं, इंग्लंडनें लोकशाहीची घमेंड मारणें किती कुचकामाचें आहे हें त्यांच्या वसाहती-

तींल राज्यशासनावरून कळून येतें.§ जर्मनींतील ज्यू लोकांची जी दुर्दशा; तीच आफ्रिकेंतील रहिवाश्यांची असें जें वर्णन एका इंग्रज लेखकानें केलें आहे तें अतिशयोक्तीचें म्हणतां येणार नाहीं. आफ्रिकेंतील तांब्याच्या खाणींतून १९३७ सालीं १ कोटि २० लाख पौंड किंमतीचें तांबें निघालें पण त्यांतील ५० लाख पौंड गोऱ्या शेअरहोल्डरांच्या खिशांत गेले. तेथील तांब्याच्या धंद्यांत गोरे अधिकारी पाहिले तर १६९०, पण त्यांचा पगार ८ लाख रुपये; आणि त्यांच्या दसपट म्हणजे १७००० आफ्रिकनांना मुशाहिरा मिळतो दोन–अडीच लाख रुपये. भात गोऱ्यांना आणि पेज काळ्यांना हा 'न्याय' हिंदुस्थानांतच लागू आहे असें नव्हे! तशी विषमता इंग्रजी साम्राज्यांत ठेवीतच नाहींत!! धान्य पिकवावें आफ्रिकनांनीं पण त्याची विक्री युरोपियनांनींच करावी, अशी मक्तेदारी ईस्टइंडिया कंपनीप्रमाणें तेथें कायद्यानें चालू आहे! तंबाखूच्या व्यापारांतील ६॥ लाख उत्पन्नांपैकीं २॥ लाख पौंड पगार म्हणून व १ लाख रेल्वेचें उत्पन्न म्हणून युरोपियन उचलतात! केनियांत हिंदी लोकांना हवेशीर जागेंत रहाण्यालाहि मज्जाव आहे. हिंदुस्थानांतील धार्मिक अस्पृश्यता जात चालली तरी ब्रिटिश साम्राज्यांतील ही राजकीय अस्पृश्यता मात्र अंशमात्रहि कमी होत नाहीं.

इंग्लंडचा प्राणभूत असा व्यापार वसाहतींच्याच जिवावर चाललेला आहे. ने. ना. लॉर्ड मोर्ले यांनीं Political Quarterly च्या गुदस्ता प्रसिद्ध झालेल्या 'साम्राज्य–विशेषांकां' त असें स्पष्टच म्हटलें आहे कीं, 'ब्रिटिश साम्राज्याचा मूळ पाया आर्थिकच आहे व तो आतां ढांसळत चालला आहे.* तो मजबूत करण्यासाठीं ओटावा करार करण्यांत आला; पण दोन वर्षांपूर्वीं तेंहि बन्धन ढिलें करावें लागलें व वसाहतींवरील जकातीचीं बंधनें सैल करण्यांत आलीं. अत्यवस्थ अशा साम्राज्याला

---

§ The boast of British democratic rule in colonial territories is empty.

* The foundation of the British Empire was mainly economical in character. The economic links of Empire are tending to become weaker.

'ऑक्सिजन' देणाऱ्या ओटावा कराराचा फायदा कसा नाहींसा होत चालला आहे हें पुढील आंकडयावरून दिसतें.

## ओटावा कराराचा परिणाम.

साम्राज्यांत निर्यात होणाऱ्या मालाचें एकूण निर्यातीशीं शेंकडा प्रमाण.

| कोणत्या देशापासून | १९३१ | १९३५ | १९३६ |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ४३·८ | ४८ | ४९·२ |
| हिंदुस्थान | ४३·८ | ४६·१ | ४५·३ |
| दक्षिण आफ्रिका | ६२·३ | ५५.५ | ५३·१ |
| ऑस्ट्रेलिया | ५४·३ | ६२·५ | ५९·२ |
| न्यूझीलंड | ९३·२ | ८९·५ | ८५·९ |
| कॅनडा | ३८·१ | ५२·६ | ५०·४ |
| आयर्लंड | ९६·९ | ९३·१ | ९२·८ |

ओटावा कराराची कोंडी फोडून जगाचा व्यापार खुला केला तरच आर्थिक स्वास्थ्य जगांत नांदेल व आर्थिक स्वास्थ्य असेल तरच जागतिक शांतता राहील असे ठाम सिद्धांत लॉर्ड मोर्ले यांनीं मांडले आहेत. §

इंग्लंडचें वसाहतींवरील राजकीय वर्चस्व वेस्ट मिन्स्टर कायद्यानें नष्टप्रायच झालें आहे आणि आर्थिक वर्चस्व टिकविण्याचा ओटावा कराराचा प्रयत्नहि फोल ठरला आहे. तेव्हां केवळ बौद्धिक सहकार्यापुरताच साम्राज्याचा एकत्र संबंध राहिला ; ऐक्याचा दुसरा धागा कोणताच राहिला नाहीं असें मत टोरोंटो येथें भरलेल्या 'ब्रिटिश कॉमनवेल्थ रिलेशन्स' परिषदेमध्यें एका आफ्रिकन प्रतिनिधीनें प्रतिपादिलें होतें. वृत्तपत्रें, विद्यापीठें, बोलपट, आकाशवाणी इत्यादि बाबतींतील सहकार्य हेंच त्या वक्त्यानें ब्रिटिश साम्राज्याचे अवशेष म्हणून दाखविले.*

§ The "retreat from Ottawa" can well become the "advance from Ottawa" towards a more just and lasting international economy. Peace to be lasting must be based upon justice, which today means economic justice.

* It is just exactly these cultural relations on which the only kind of thing that is now possible depends.

'ब्रिटिश साम्राज्य' हा शब्ददेखील सरकारी कागदोपत्रीं राहिलेला नाहीं. त्याचा वारस आहे 'ब्रिटिश कॉमनवेल्थ!' पण तो नुसता शब्दच आहे. त्यांतील राष्ट्रें ब्रिटिश पार्लमेंटच्या सत्तेखालीं येत नाहींत, ब्रिटिश प्रिव्ही कौन्सिलाच्या कक्षेंत बसत नाहींत, वसाहत–मंत्र्याच्या सल्ल्यावाचून राजादेखील त्या राष्ट्रावर कांहीं सत्ता चालवूं शकत नाहीं कीं त्यांच्यातर्फें युद्ध पुकारूं शकत नाहीं. इंग्लंडच्या राजाला आयर्लंडतर्फें युद्ध पुकारावयाचें असेल तर आयरिश डेलची संमति घेणें जरूर आहे. आज स्थिति अशी आहे कीं, आयर्लंडचा नागरिक हा ब्रिटिश नागरिक नाहीं व आयर्लंडचें नागरिकत्व नसलेला ब्रिटिश नागरिक हा आयर्लंड मध्यें 'परका' मानला जातो. अशाच रीतीनें ब्रिटिशांच्या सत्तेची पकड इतर वसाहतींतहि सुटलेली आहे.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचेहि दिवस भरले आहेत हें खास. अराष्ट्रीय मुसलमान व अरेराव संस्थानिक यांच्या आधारानें 'संयुक्त घटनेंत ती सत्ता शाबूत राहिली तरी ती फारच थोडा वेळ राहील. मुसलमानांच्याहि डोक्यांत राष्ट्रीयत्वाचा प्रकाश पडेल व संस्थानिकहि लोकशाहीला शरण येतील आणि ब्रिटिश सत्तेचें सर्वभक्षक वर्चस्व झुगारून देण्यास सिद्ध होतील, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

कॅनडा किंवा ऑस्ट्रेलिया याप्रमाणें हिंदुस्थान इंग्लंडशीं तडजोड करून सख्यत्वाचे संबंध कायम ठेवील हेंहि शक्य दिसत नाहीं. त्या दोन देशांप्रमाणें इंग्लंड व हिंदुस्थान यांमध्यें एक वंश नाहीं, एक संस्कृति नाहीं कीं एक भाषा नाहीं. आहे तें पूर्ण वैषम्यच. आर्थिक बाबतींत तर हिंदुस्थानचा जो लाभ तो इंग्लंडचा तोटा अशी विपरीत स्थिति आहे. हिंदुस्थान हें आहे गिऱ्हाईक. तेव्हां त्याची औद्योगिक उन्नति होणें—तो स्वावलंबी होणें म्हणजे इंग्लंडला आपलें गिऱ्हाईक तुटल्यासारखें–आपल्या व्यापाराच्या नाड्या आंखडल्यासारखें वाटेल यांत नवल काय ? हिंदुस्थानांत १९३६ सालीं १२५ कोट रुपयांचा माल आयात झाला, त्यांपैकीं निम्मा म्हणजे ६२ कोटि रुपयांचा माल ब्रिटिश साम्राज्यांतून आलेला होता.

इंग्लंडांतून हिंदुस्थानांत होणारी आयात कशी घटतआहे पहा.—

| सन | शेंकडा | सन | शेंकडा |
|---|---|---|---|
| १९१३ | ६३ | १९२५ | ५१ |
| १९२२ | ६० | १९२६ | ५० |
| १९२३ | ५८ | १९२७ | ४७ |
| १९२४ | ५३ | १९३४ | ४० |

एवढें मोठें गिऱ्हाईक आपल्या हातून ब्रिटिश सरकार सुखासुखीं कसें जाऊं देईल ? तें ताब्यांत ठेवण्यासाठीं इंग्लंडनें अत्यंत नीच उपायांचाहि अवलंब केला, अशी साक्ष जोहान्स स्टॉय हा जर्मन लेखक पुढील शब्दांनीं देत आहे.

The most shameful methods were employed by the governors of the East India Company and later the British viceroys to keep the Indians in subjections.

राजकीय दृष्टीनेंहि हिंदुस्थान हें इंग्रजी लष्कराचें कुरण आहे. तें सोडून देणें त्याच्या जिवावर येणार नाहीं काय ? हिंदुस्थानांत एक कारखाना निघणें म्हणजे इंग्लंडचा एक कारखाना बंद पडणें होय ; तसेंच येथील सैन्यांतील एका जागेचें हिंदीकरण होणें म्हणजे इंग्लंडांतील एका कुटुंबाचा उदरनिर्वाह थांबणेंच होय.

इंग्लंडच्या या परावलंबी स्थितीचा फायदा हिंदुस्थानानें दक्षतेनें व निश्चयानें घेतला पाहिजे—आणि तसें करण्याला महायुद्धासारखी नामी संधि दुसरी कोणती ? 'साम्राज्याच्या गरजा येती आमच्या काजा' या सूत्राचा पुरपूर फायदा हिंदुस्थानांतील सर्व पक्षांनीं एक होऊन घेतला पाहिजे. इंग्लंडची अवशता पाहून डी व्हॅलेरानें आयर्लंडच्या मानेभोंवतालचे खंडणी, राजनिष्ठा, गव्हर्नरची नेमणूक वगैरे परवशतेचे एकएक पाश जसे तोडून टाकले, त्याप्रमाणें हिंदुस्थानानेंहि आपलें स्वातंत्र्याचे प्रयत्न शक्य तितके पुढें रेटले पाहिजेत. रौलट ॲक्टापासून आतांपर्यंतच्या गेल्या वीस

वर्षांत ब्रिटिश साम्राज्यानें हिंदुस्थानांत इतके वचनभंग केले आहेत, इतका दडपशाहीचा नंगानाच घातला आहे आणि अन्यायाचा घडा इतका भरला आहे कीं, त्या साम्राज्याविषयीं प्रेम, अभिमान किंवा आदर आसेतुहिमाचल कोठेंहि कोणाजवळहि सांपडणार नाहीं. म. गांधींच्या चळवळीमुळें अन्याय्य कायद्याचें भय जसें नष्ट झालें, तसेंच साम्राज्याविषयींचें प्रेमहि रसातळास गेलें. सर्वसामान्य समाजाच्या एका नाडींतून साम्राज्य-द्वेषाचें रक्त वाहत आहे आणि दुसऱ्या नाडींतून स्वातंत्र्य–लालसेचें रक्त वहात आहे. पण हा साम्राज्यद्वेष आज सुप्त आहे, निष्क्रिय आहे. 'इंग्रजांचें राज्य नसावें' ही भावना बहुजनसमाजांत पसरल्यामुळेंच त्या इंग्रजी सत्तेचा सर्वांत प्रबल प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसला लोकांनीं निवडणुकींत मतें दिलीं. मतें दिलीं, पण केवळ मतदानानें पारतंत्र्य हटत नाहीं व स्वातंत्र्य मिळत नाहीं. त्यासाठीं जनतेच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्य–प्रेम जागतें व कर्तें व्हावयास हवें. तसें होण्याला सर्वांत उत्तम संधि, सर्वांत शुभ मुहूर्त कोणता असेल तर इंग्लंडला ग्रासणारें जागतिक युद्ध. त्यावेळीं इंग्लंडला हिंदुस्थानांतून ज्या ज्या वस्तूंची गरज लागेल, त्या त्या हिंदुस्थाननें नाकारल्या तर इंग्लंडचें नाकच धरल्यासारखें होईल. शेतकऱ्यांनीं कर न भरला, कामकऱ्यांनीं सरकारी खातीं न चालविलीं आणि सर्व देशानें बहिष्कार टाकून इंग्लंडचा आर्थिक कोंडमारा केला; तर इंग्लंडला हिंदुस्थान संतुष्ट राखणें व त्यासाठीं त्याला जरूर ते सर्व अधिकार देणें भाग पडेल हें उघड आहे. इजिप्त- आयर्लंडप्रमाणें फौजेंत फितुरी करणें किंवा सशस्त्र बंड करणें या जालीम व अंतिम उपायांचा अवलंब न करतांहि केवळ बहिष्कार, असहकारिता व करबंदी या तीन पूर्ण सनदशीर मार्गांनींच हिंदुस्थान युद्धग्रस्त इंग्लंडला वाकवूं शकेल व आपल्या मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडूं शकेल यांत तिळमात्र शंका नाहीं.

हिंदुस्थानच्या या अंगभूत सामर्थ्याची व तें सामर्थ्य स्वातंत्र्य–संपादनार्थ खर्चिण्याच्या त्याच्या निश्चयाची जाणीव होऊन सर मायकेल ओड्वायर यासारख्या इरसाल साम्राज्यवाद्याचें धाबें दणाणलें आहे आणि काँग्रेसच्या युद्धविरोधी चळवळी नेस्तनाबूत करा अशा आरोळ्या ठोक-

ण्यास त्यांनीं लेखांचे द्वारें सुरवात केली आहे.§ गेल्या महायुद्धांत काँग्रेसनें सशर्त सहकार्य केलें होतें पण आतां ती उघड उघड विरोध करीत आहे आणि आतां ती पूर्वीपेक्षां फारच बलिष्ठ झाली असून अष्टप्रांतांची स्वामिनी बनली आहे व मध्यवर्ती असेंब्लींतहि प्रभावी आहे असा विरोध त्यांनीं भयभीत चित्तानें दाखविला आहे. त्यांना समाधानाची गोष्ट एवढीच कीं, गेल्या महायुद्धांत हिंदुस्थानानें ६ लाख ८० हजार सैनिक दिले; त्यांपैकीं ३ लाख ५० हजार माणसें एकट्या पंजाबनें पुरविलीं होतीं आणि आतांचे पंजाबच प्रधान सर शिकंदर हयातखान यांनीं इंग्रजांना युद्धप्रसंगीं मदत करण्याचें तोंडभर आश्वासन दिलें आहे. पण ओड्वायर महाशयांनीं हें ध्यानीं ठेवावें कीं, त्या 'भरंवशा'च्या मुस्लीम–प्रधान प्रांतांतच गेल्या वर्ष सव्वावर्षांत रिक्रूट भरतीच्या विरुद्ध २०० वर सभा झाल्या! आणि त्यांना प्रतिबंध करणारा कायदा घडविला गेला असला तरी शेतकऱ्याची–मग तो हिंदु असो वा मुसलमान असो–इतकी अन्नान्न दशा झालेली आहे आणि त्या दशेला इंग्रजी राज्यच कारणीभूत असल्याची खात्री त्याला इतकी बालंबाल झालेली आहे कीं, तो यापुढें स्वदेशाच्या स्वातंत्र्य–युद्धाखरीज अन्यत्र लढण्यास सिद्ध होणार नाहीं. गेल्या महायुद्धाचे वेळींहि दहा कोटि वस्ती असलेल्या बंगाल, बिहार, ओरिसा व मध्यप्रांत या चार प्रांतांतून पुरते २५ हजार 'रंगरूट' हि मिळाले नाहींत; तीच स्थिति सर्व हिंदुस्थानभर येत्या युद्धप्रसंगीं होईल. आला दिवस कसा घालवावा या राजकीय विवंचनेंत इंग्लंड नेहमीं असतें;* त्याला जिवावर बेतल्यावेळची ही नाकेबंदी कशी सहन होईल? समेट करून सहकार्य संपादण्यांत त्याचा हातखंडा. पण हिंदुस्थानानें पूर्ण असहकारिता पुकारली तर त्याची इच्छातृप्ति केल्याखेरीज इंग्लंडला गत्यंतरच

---

... the last war and in the future war.

*Indian Empire Review December 1938.*

* Politically he lives from hand to mouth.

नाहीं.§ ही एका जर्मन ग्रंथकारानें केलेली मीमांसा मत्सरग्रस्त नसून सत्यपूर्णच आहे. राष्ट्रीय सभेनें तूर्त आपल्यापुढें एकच एक कार्यक्रम ठेवून प्रत्येक खड्यांतील शेतकऱ्यांना युद्धकालच्या कर्तव्याची जाणीव दिली व त्यांची शिस्तशीर संघटना केली तर तिचें स्वातंत्र्याचें ध्येय हस्तगत झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

युद्ध यंदा होवो वा न होवो, किंबहुना तें मुळींच न होवो आणि झालेंच तर त्यांत स्वतःचें संरक्षण करण्यापुरती लष्करी तयारी इंग्लंड करो वा न करो; पण हिंदुस्थाननें बहुजनसमाज क्रांतिप्रवण केला, संघटित केला व स्वातंत्र्य-संपादनावर केंद्रित केला; तर इंग्लंडचें स्वामित्व झुगारलें जाईल एवढेंच नव्हे तर दुसऱ्या कोणत्याहि देशाचें वर्चस्व येथें स्थापन होणार नाहीं असेंहि सामर्थ्य जनतेंत उत्पन्न होईल.

केवळ वसाहतीचें स्वराज्यच नव्हे तर पूर्ण स्वातंत्र्यहि या मार्गानेंच हिंदुस्थान एकजुटीच्या बलावर मिळवूं शकेल. आपल्या सैन्यावर व परराष्ट्रसंबंधावर स्वतःची हुकमत तो चालवील, स्वतःचें लष्कर, स्वतःचें आरमार व स्वतःचें विमानदळ तो स्थापील, स्वतःचे परराष्ट्रमंत्री तो जगभर पाठवील आणि स्वतःचें स्वतंत्र निशाण तो फडकवील. लोकसंख्येनें समृद्ध व खनिज संपत्तीनें संपन्न असा हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर जपानच काय पण इंग्लंड–अमेरिकाहि त्याच्यापुढें थरथरां कांपू लागतील. वीस वर्षांत डोकें वर काढलेल्या रशियाच्या तिप्पट वस्ती हिंदुस्थानाची आहे व निसर्गाचा तर त्यावर वरदहस्तच आहे. हिंदुस्थानाइतकी प्रचंड लोकसंख्या साऱ्या जगांत चीनखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं. साऱ्या आशिया खंडाचेंच काय पण जगाचेंहि भवितव्य स्वतंत्र, सबल व संपन्न अशा हिंदुस्थानाचे मुठींत राहील. स्वातंत्र्याच्या उच्च व स्थिर अधिष्ठानावर आरूढ झाल्यावर, सतराव्या शतकांत इंग्लंडनें जसा लोकशाहीचा,

---

§ Where no cooperation is possible, the highly developed political instinct of the Englishman fails.—*Johannes Stoyes* ( British Empire )

अठराव्या शतकांत फ्रान्सनें जसा स्वतंत्रतेचा, एकोणिसाव्या शतकांत जर्मनीनें जसा आर्थिक समतेचा व विसाव्या शतकाच्या प्रथम चरणांत रशियानें जसा कामकरी सत्तेचा अभिनव संदेश मानवजातीला दिला; तसा अभ्युदय–निःश्रेयसाचा उभयविध संदेश हिंदुस्थान जगताला देऊन त्याची प्रगति करण्यास कारणीभूत होईल. हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं, ब्रिटिश साम्राज्य संपुष्टांत आलेंच व ब्रिटिश साम्राज्य नाश पावलें कीं जगांतील साम्राज्यशाहीच गाडली गेली असें होईल आणि त्यामुळें परतंत्र राष्ट्रें स्वतंत्र होतील, दीन व दुर्बल लोक संपन्न व सत्ताधीश बनतील आणि सर्व जग हें शांततेचें व सुखाचें माहेरघर होईल.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# विचार-सूत्रें

## लोकमान्य टिळक

ज्याचा एक भाग दुसऱ्या भागावर सदैव चरत आहे अशा प्रकारचें साम्राज्य कधींहि चिरस्थायी होणें शक्य नाहीं.

ø ø ø ø

स्वराज्याशिवाय हिंदुस्थान ही ब्रिटिश साम्राज्याच्या गळ्यांत धोंड आहे. ती स्वतः बुडेल व साम्राज्याला बुडवील.

ø ø ø ø

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न म्हणजे जगाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न झाला आहे. जगाच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ हिंदुस्थानास स्वतंत्र केलें पाहिजे.

ø ø ø ø

साम्राज्याचें कारण हेंच आमचें तारण होय. आणि आम्हीं उद्योग केल्यास तें तारण आम्हांस या कालींच प्राप्त व्हावें अशी ईश्वराचीच इच्छा दिसते.

पाने १०४ दा. नं. ८८८० राजा ३३४ शिरवरे दा. न.

## महात्मा गांधी

ब्रिटिश साम्राज्य हें हिंदुस्थानामुळेंच साम्राज्य या स्वरूपांत राहिलें आहे. हिंदुस्थानावरील साम्राज्यशाहीची पकड निघून गेली पाहिजे. इंग्लंडचीं आणि त्याच्या वसाहतीचीं जीं सुखदु:खें असतील त्यांचा वांटेकरी हिंदुस्थान होईल; पण बरोबरीचा भागीदार या नात्यानें.

( The British Empire is an Empire only because of India. The Emperorship must go and I should love to be equal partner with Britain sharing her joys and sorrows and equal partner with all Dominions. But it must be a partnership on equal terms. )

ø ø ø ø

ब्रिटिश प्रजाजन म्हणून स्वत:ला संबोधून घेण्याचे मी पुष्कळ वर्षां पूर्वींच सोडलें आहे. आतां माझी इच्छा साम्राज्यांतील प्रजाजन म्हणून राहण्याची नाहीं. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला सक्तीनें भागीदार केलें असतां त्यांत नागरिक म्हणून राहण्याची माझी इच्छा नाहीं. समान दर्जाच्या राष्ट्रसंघांतील एक प्रजाजन म्हणून मी राहूं इच्छितों. सध्यांच्या साम्राज्यांत बंडखोर म्हणवून घेणेंच मला अधिक आवडेल. ईश्वराची इच्छा असेल तर इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामध्यें अभेद्य असा स्नेहसंबंध समानतेच्या भूमिकेवर राहील.

( I have ceased for many years to call myself a British subject. I would far rather be called a rebel than a subject; but I have now aspired, I still aspire to be a citizen not in the Empire but in a Commonwealth in a partnership if possible, it God wills it–an indissoluble partnership, but not a partnership superimposed upon one nation by another.)

—गोलमेज परिषदेंतील भाषण.

## पं. जवाहरलाल नेहरू

ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां ब्रिटिश साम्राज्यशाही ही मृत झालेली आहे. आपल्या स्वातंत्र्यसंपादनाचे मार्गांत ब्रिटिश साम्राज्यशाही आड येऊं शकणार नाहीं किंवा आपल्याला प्रतिकार करूं शकणार नाहीं हें निःसंशय. त्या साम्राज्यशाहीला तोंड देण्यास आपण आतां समर्थ झालों आहों. मात्र आपण आपसांतील भेद काढून टाकले पाहिजेत.

( From the long point of view of history it is dead, I have not a shadow of doubt that British Imperialism can not keep us down or prevent us from achieving independance today. Today we are strong enough to face it, provided certain inner weaknesses do not come in our way. )

—अखिल भारतीय विद्यार्थि–परिषदेचें चौथें अधिवेशन.—

ø ø ø ø

ब्रिटिश साम्राज्यशाही आणि हिंदी स्वातंत्र्य यांच्यामध्यें तह किंवा समेट होणें शक्य नाहीं.

( Between British Imperialism and Indian freedom there is no meeting ground and there can be no peace. )

ø ø ø ø

इंग्लंडचें परराष्ट्रीय धोरण हें जगातील राष्ट्रांच्या सहकार्यास मोठेंच विघ्न होय. हिंदुस्थानचा प्रश्न हा आशिया खंडाचा प्रश्न आहे आणि तो सर्व जगाच्या प्रश्नाशीं निगडित आहे.

( The foreign policy of England has been the greatest stumbling block to international cooperation. The Indian problem is part of the Asiatic problem and is tied up with the problems of the world. )

—*Whither India ?*

# श्री. सुभाषचंद्र बोस

ब्रिटिश साम्राज्याला अनेक अंतर्बाह्य प्रश्न नाशाच्या मार्गाकडे ओढीत आहेत. ते म्हणजे आयर्लंडचें बंड, इजिप्तचा प्रश्न, पौर्वात्य राष्ट्रांत माजणारा असंतोष व ब्रिटिशांची सत्ता उलथून पाडण्यासाठीं हिंदुस्थानांत चाललेला झगडा हे होत. ब्रिटिश साम्राज्य अंतःकलहापासून मुक्त आहे असें जरी गृहीत धरून चाललें तरी इटाली, जर्मनीप्रभृति बाह्य शक्तींनीं अशी खळबळ माजविली आहे कीं, त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याच्या स्थैर्याला केव्हां धक्का बसेल याचा नेम नाहीं. इंग्लंडनें आपलें साम्राज्य हें जर स्वतंत्र राष्ट्रांचा संघ बनविलें नाहीं, तर त्याला आपल्या साम्राज्याचा अंत उघड्या डोळ्यांनीं पहावा लागेल.

( So far as the British Empire is concerned, there are a number of factors working from within and without in the directions of its ultimate dismemberment. These factors are the revolt of Ireland against Britain, the problem of Egypt, the ferment in the Near East and the struggle in India for removing British domination. Even assuming that the British Empire is free from internal conflicts there is no guarantee of its stability, because of the external factors at work. Considering these external dangers and the internal difficulties the inevitable conclusion is that if Britain does not follow the line of federation of free nations she would have to face dismemberment of the Empire.

# प्रमुख संदर्भ-ग्रंथ

( 1 ) The British Empire—Royal Institute of International Affairs.

( 2 ) The Crumbling of Empire—Dr. M. J. Bonn.

( 3 ) Expansion of England—Sir J. R. Seeley.

( 4 ) Whither England ?—Leon Trotsky.

( 5 ) World Politics—R. Palme Dutt.

( 6 ) The Empire of the Nabobs—L. Hutchinson.

( 7 ) My England—George Lansbury.

( 8 ) Europe and the East—Norman Dwight Harris.

( 9 ) Europe Today—G. D. H. Cole.

( 10 ) A short History of the World—C. Delisle Burns.

( 11 ) Glimpses of World History—Jawaharlal Nehru.

( 12 ) The Failure of European Civilization—S. E. Stokes.

( 13 ) Western Civilization in the Near East—Hans Kohn.

( 14 ) British Empire—Johannes Stoye.

( 15 ) The Dominions as Sovereign States—Prof. Keith.

# श्री. दा. न. शिखरे यांचें वाङ्मय

| प्रबंध | किंमत रु. आ. |
|---|---|
| १ सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म | ०-१२ |
| २ साम्राज्य व स्वराज्य | १—० |
| ३ आजकालचे साहित्यिक | १—० |
| **कांदबरी** | |
| ४ थोरली आई | १—८ |
| ५ आईची कृपा | १—० |
| **लघुकथा** | |
| ६ भावनांचा नाच | २—० |
| ७ क्रांति-किरण | १—० |
| **नाटक** | |
| ८ मान-बिंदु | ०-१२ |
| **काव्य** | |
| ९ दिव्यभाव | ०—४ |

**पुढील साहित्य**

१ अष्टपैलू टिळक
२ गांधीवाद

सर्व प्रसिद्ध पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल.